ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख ५ ऑक्टोबर, १९६० अंक ३९

## विविध माहिती

**मद्रास शहराचा दूधपुरवठा** – मद्रास शहराला करण्यांत येणाऱ्या शुद्ध दुधाच्या पुरवठ्यांत पुढील महिन्यापासून चौपट वाढ करण्यांत येणार आहे. पुरवठा वाढविण्यासाठी उघडण्यांत आलेलें नवें केंद्र मुंबईजवळील आरे येथील गौळवाड्याच्या धर्तीवर आहे. दूधपुरवठा करणारें पहिलें केंद्र गेल्या ऑक्टोबरमध्यें खोलण्यांत आलें. त्यांत ५०० गुरांचा समावेश आहे.

**राजस्थानांत खताचा कारखाना**—राजस्थान राज्यांत हनुमानगड ह्या ठिकाणीं रासायनिक खताचा कारखाना काढण्यासाठी भारत सरकारनें खाजगी भांडवलदारांकडून योजना मागविल्या आहेत. कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल ह्या ठिकाणीं मुबलक प्रमाणांत उपलब्ध आहे. परदेशीय कंपन्यांच्या साह्यानें कारखाना उभारण्याच्या कांहीं योजना सरकारकडे आल्याहि आहेत.

**गंधकाच्या मोठ्या खाणी**—बिहार राज्यांत गंधकाच्या खनिजांच्या मोठ्या खाणी सांपडल्या असून सर्व देशाची गरज भागविण्यास त्या पुरेशा आहेत असें म्हणतात. सध्यां भारताला गंधकाची आयात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करावी लागते. हा शोध भारत सरकारच्या खनिज खात्यानें लावला आहे.

**पत्नीसाठी डोळा देण्याची तयारी**—कानपूरमधील एका माध्यमिक शिक्षकानें आपल्या आंधळ्या पत्नीला दृष्टीचा लाभ व्हावा म्हणून आपला एक डोळा देण्याची तयारी दाखविली आहे. मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटलमधील डोळ्याच्या बँकेबद्दलची माहिती वाचून त्यानें मुंबई सरकारच्या आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून आपली इच्छा प्रदर्शित केली. पत्नीला आपलीं मुलें पाहतां यावीं म्हणून हा त्याग करण्याची तयारी त्यानें दाखविली.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनच्या नव्या इमारती**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें शहराच्या मुख्य रस्त्यावर ५ टोलेजंग इमारती बांधण्याचें ठरविलें आहे. इमारती बांधण्यासाठी १०४ कोटी रुपये खर्च येईल व त्यांच्यापासून दरसाल २५ लाख रुपयांचें उत्पन्न मिळेल. इमारती बांधण्याच्या कामास पुढील महिन्यांत सुरुवात होईल व तें तीन वर्षें चालेल.

**विजेची भारी यंत्रसामग्री**—हरद्वारजवळ ज्वालापूर ह्या ठिकाणीं विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्याचा एक कारखाना तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उभारला जाणार आहे. ह्या कारखान्यासाठी ४५ कोटी रुपये भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. कारखाना निघाल्यावर त्यांत २५ हजार लोकांना रोजगार मिळेल.

**वाशिम येथील सहकारी संस्था**—अकोल्यापासून ५० मैलांवर असलेल्या वाशिम ह्या ठिकाणच्या विणकरांच्या सहकारी संस्थेनें १५ यंत्रमाग चालू केले आहेत. ह्या संस्थेचें भांडवल रु. १०,००० असून राखीव निधि १८,००० रुपये आहे. सरकारनें संस्थेला ६८,००० रुपये कर्ज म्हणून व ३,२७० रुपये मदत म्हणून दिले आहेत.

**पेणगंगा योजना** – नांदेड जिल्ह्यांतील पेणगंगा योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पुरी करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी ७॥ कोटी रुपये खर्च येणार आहे. योजनेंत बांधण्यांत येणाऱ्या धरणावर पाण्याच्या साह्यानें ४६ हजार किलोवॅट विजेचें उत्पादन करण्यांत येईल.

**उत्तर-सरहद्दीवरील रस्ते**—भारताच्या हद्दींत चीननें आक्रमण केल्यापासून उत्तर-सरहद्दीवरील रस्त्यांच्या बांधणीकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येत आहे. रस्तेबांधणीचा कार्यक्रम झपाट्यानें पार पाडतां यावा म्हणून भारत सरकारनें जरूर ती यंत्रसामग्री परदेशांतून आणण्याचें ठरविलें आहे. कांहीं यंत्रसामुग्री रशिआकडूनहि घेण्यांत येणार आहे. रस्तेबांधणीच्या कामाच्या पहिल्या हप्त्यासाठी १२० कोटी रुपये खर्च येईल.

**मध्यप्रदेशांत वैद्यकीय कॉलिजें** – मध्यप्रदेश राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सार्वजनिक आरोग्याची एक २० कोटींची योजना समाविष्ट करण्यांत येण्याचा संभव आहे. मध्यवर्ती नियोजन समितीला राज्य सरकारनें तशी सूचना केली आहे. रायपूर व रेवा ह्या ठिकाणीं वैद्यकीय कॉलेज स्थापन करण्याचा अंतर्भाव योजनेंत आहे.

**नागपूर कॉर्पोरेशनला कर्ज**—महाराष्ट्र राज्य सरकारनें नागपूरच्या कॉर्पोरेशनला १५ लाख रुपयांचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी करण्यांत येईल. ४॥ टक्के व्याज घेण्यांत येणार असून तें ३० वार्षिक हप्त्यांनीं फेडावयाचें आहे. राज्य सरकारनें पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी पूर्वी ४० लाख रुपये कर्ज दिलेलें आहे.

**छोट्या बंदरांचा विकास** – छोट्या बंदरांच्या विकासाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या कमिटीनें महाराष्ट्राच्या ४० छोट्या बंदरांपैकी १३ बंदरांचा विकास करण्याची शिफारस केली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या बंदरांचा विकास करण्यांत येण्याची शक्यता आहे. ह्या कामासाठी ७८ लाख रुपये खर्च येईल. त्यांतील १९ लाख रुपये रत्नागिरी बंदराच्या विकासासाठी लागतील.

**आंध्र राज्यांत पोलादाचा कारखाना**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत आंध्र सरकारनें राज्यांत पोलादाचा एक छोटा कारखाना काढण्याचा विचार चालविला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ७ कोटी रुपये लागतील. संकल्पित कारखान्यांत विशेष प्रकारच्या पोलादाचें उत्पादन करण्यांत येईल. रोज १०० टन पोलादाचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. सध्यां आंध्रांतील लोखंडाची माती परदेशीं निर्यात करण्यांत येते.

**सहकारी साखर कारखाने**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत गुजरात राज्यांत आणखी तीन सहकारी साखर कारखाने काढण्यांत येण्याचा संभव आहे. सहकारी साखर कारखान्यांत भांडवल गुंतवून त्यांच्या विस्तारास मदत करण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे. राज्यांतील खाजगी मालकीचा एक जुना कारखाना सहकारी तत्त्वावर पुनर्घटित करण्यांत येणार आहे.

**मोटारसायकलींच्या कारखान्याची जागा**—झेकोस्लोव्हाकिआच्या तांत्रिक साह्यानें म्हैसूरजवळ मोटारसायकली तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्याची जागा, त्याला मिळूं शकणारा कच्चा माल व इतर सवलती ह्यांची पहाणी करण्यासाठी तीन झेक तज्ज्ञ म्हैसूरला आले आहेत. कारखान्यांत दरसाल १५,००० मोटारसायकली तयार होतील.

**जुहूचें आकर्षक वाळविणार**—मुंबईजवळील जुहूचा किनारा हें एक रम्य ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं येणाऱ्या हौशी प्रवाशांची सोय करण्यासाठी त्याचा विकास करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी महाराष्ट्र सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ५ लाख रुपयांची मागणी केली आहे. कामाचा कांहीं खर्च राज्यसरकार व मुंबई कॉर्पोरेशन ह्यांना द्यावा लागेल.

**टेल्को रेल्वे एंजिनांची किंमत**—रेल्वेबोर्ड आणि टेल्को कंपनी ह्यांच्या दरम्यान कंपनीतर्फे पुरविण्यांत येणाऱ्या वाफेच्या रेल्वे-एंजिनांच्या किंमतीबद्दल वाटाघाटी चालू होत्या. त्या यशस्वी होऊन टेल्को कंपनीनें आपली किंमत प्रत्येक एंजिनामागें सुमारें २,००० रुपयांनीं कमी केली आहे. भारत सरकारनेंहि ह्या किंमतीला मान्यता दिली आहे.

**गाड्यांतील गर्दी तशीच राहणार**—सौराष्ट्रामधील रेल्वे-गाड्यांच्या संख्येंत वाढ करण्याची मागणी राजकोट येथील व्यापाऱ्यांनीं व धंदेवाल्यांनीं केली होती. ही मागणी मान्य करतां येणार नाहीं, असें उत्तर रेल्वेमंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं दिलें आहे. रेल्वे गाड्यांतून प्रवाशांची होणारी गर्दी आणखी कांहीं काळ तरी अशींच राहील असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे.


किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळप करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी ( द. सातारा )



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४ [ टेलि. : २७०१४

महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. ८,५९,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. ९,७३,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. १,३२,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. २,६७,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.

स्त्रियांची शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

# अर्थ

बुधवार, ता. ५ ऑक्टोबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम

भारताच्या पोलादाच्या कारखान्यांतून आणखी नवीन भट्ट्या चालू करण्यांत येत आहेत. रूरकेला येथील कारखान्यांत एक व भिलई येथील कारखान्यांत एक अशा दोन झोतभट्ट्या बांधून तयार झालेल्या आहेत. दुर्गापूर येथील कारखान्यांतील नवी झोत-भट्टी पुढील महिन्यांत बांधून तयार होईल. पण ह्या झोतभट्ट्यांतून पोलादाचें उत्पादन चालू करण्याच्या कामीं कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्याची अडचण भासूं पाहात आहे. ह्या तिन्ही भट्ट्या आतां डिसेंबर १९६०च्या पूर्वीं चालू होण्याचीं लक्षणें दिसत नाहींत. तिन्हीं भट्ट्यांतून उत्पादन चालू करण्यासाठी रोज ५,००० टन कोळसा लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. पोलादाच्या कारखान्यांना आपलें उत्पादन सतत चालू ठेवण्यासाठी १५ ते २० दिवस पुरेल इतका कोळसा नेहमींच सांठवून ठेवावा लागतो. ह्यापूर्वीं चालू झालेल्या भट्ट्यांना लागणारा कोळसा निराळा. ज्या दिवसांपासून नव्या भट्ट्या चालू करण्यांत येतील त्या दिवसा-पासून रोज ५ हजार टन कोळसा मिळण्याची हमी मिळाली तरच भट्ट्या चालू करणें इष्ट ठरणार आहे. सध्यां रेल्वेकडून कारखान्यांना होणाऱ्या कोळशाच्या पुरवठ्याची गति बरी आहे. पण आतां हिवाळा जवळ आलेला आहे. ह्या ऋतूंत रेल्वेच्या मालवाहतुकीच्या डब्यावरील ताण वाढतो असा अनुभव आहे. कोळशाच्या वाघिणी भरण्याची नवीन पद्धत चालू करण्याचें रेल्वेखात्यानें ठरविलें आहे. ही पद्धत बहुधा नोव्हेंबर महिन्यापासून अमलांत येईल. ह्या पद्धतीमुळें वाघिणी भरण्याची गति वाढेल आणि रेल्वेवाहतुकीवरील हिवाळ्यांतील ताण लक्षांत घेऊनसुद्धां कारखान्यांना कोळशाचा पुरवठा होईल.

---

## अविकसित देशांच्या आर्थिक गरजांवर भार

ता. ३० जून, १९६० रोजीं संपलेल्या आर्थिक वर्षाचा जागतिक बँकेचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या बँकेच्या सभासदांची संख्या आतां ६८ आहे. अहवालाच्या वर्षीं करण्यांत आलेल्या कार्याचा आढावा घेतांना अहवालांत असें म्हटलें आहे कीं, १९६० सालीं आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांत बरेच बदल घडून आले. अविकसित अगर अर्धविकसित देशांच्या द्रव्यविषयक गरजा काय आहेत, ह्यासंबंधीची जाणीव अलीकडे वाढत चालल्याचें दिसतें. त्यामुळें देशांदेशांच्या आर्थिक संबंधांवरहि परिणाम झाला आहे. कमी उत्पन्न असणाऱ्या बऱ्याच देशांनीं व्यापारी पद्धतीवर कर्जे घेण्याची आपली ऐपत जवळ जवळ संपुष्टांत आणली आहे. त्याचा परिणाम होऊन औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले देश अधिक सवलतीच्या अटींवर आर्थिक विकासासाठी भांडवल निर्यात करण्यास तयार होऊं लागले आहेत. पुष्कळशा देशांतून आर्थिक व्यवहार चांगल्या रीतीनें पार पाडण्यांत आले. त्यामुळें भांडवल गुंतवणुकीचा कार्यक्रम फायदेशीर झाला. परंतु मूलभूत आर्थिक प्रश्न अजूनहि गंभीरच आहेत. पुष्कळसे अर्धविक-सित देश परदेशीय चलन मिळविण्यासाठी एक अगर दोन पदार्थांच्या निर्यातीवर अवलंबून असतात. ह्या पदार्थांचा साठा बराच असल्यानें जागतिक बाजारांतील त्यांच्या किंमती पडलेल्या आहेत. अर्थातच हे पदार्थ निर्यात करणाऱ्या देशांची कुचंबणा झाली आहे. कांहीं देशांना त्यांनीं पूर्वीं घेतलेल्या कर्जाचे हप्तेच देतां आलेले नाहींत; उलट, दीर्घ मुदतीच्या परदेशीय कर्जाची मागणी अजूनहि मजबूत आहे.

---

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी लागणारा पैसा

मुंबई येथील उद्योगपति व लोकसभेचे सभासद श्री. बाबूभाई चिनॉय ह्यांनीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणाऱ्या पैशाच्या उभारणीविषयीं आपले विचार व्यक्त केले आहेत. मुंबई येथील रोटरी क्लबांत ते बोलत होते. ते म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारा पैसा उभारण्याचें काम बरेंच अवघड आहे. भारत आज एका विशिष्ट आर्थिक परिस्थितींतून जात आहे. त्याला परदेशीय चलनाची टंचाई जाणवत आहे. निर्यातीपासून होणाऱ्या उत्पन्नांत फारशी वाढ होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत, आणि लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत अन्न-धान्याचें उत्पादन वाढविण्यांत अपयश आलेलें आहे. तथापि योग्य त्या दिशेनें प्रयत्न केल्यास पैसा उभारण्याचा प्रश्न सुटण्यासारखा आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी लागणारा पैसा मुख्यत: चार मार्गांनीं उभारावा लागेल (१) जादा कर, (२) सार्वजनिक मालकीच्या विभागांतून मिळणारा नफा, (३) परदेशीय मदत आणि (४) तुटीचें अंदाजपत्रक प्रत्यक्ष करांत वाढ करण्यास आतां फारसा वाव उरलेला नाहीं. सध्याची करपद्धति अशी आहे कीं तीमुळें ज्या विभागांत खुषीची बचत अधिकांत अधिक होण्याची शक्यता आहे त्याच विभागावर वाईट परिणाम घडून येत आहे. तेव्हां आतां अप्रत्यक्ष करांत वाढ करण्यावर अधिक भर देण्याशिवाय मार्ग नाहीं हें ओघानेंच आलें. ज्या वस्तूंचा पुरवठा अपुरा आहे त्यांचा खप वाढण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीनें नव्या अप्रत्यक्ष करांची पद्धत बसविली पाहिजे. मात्र असें करतांना लोकांच्या कर देण्याच्या पात्रतेचा विचार झाला पाहिजे.

---

## बँकांच्या एकत्रीकरणाची पूर्वतयारी

केरळांतील सुमारें ८० बिन-किफायतशीर बँकांची पाहणी रिझर्व्ह बँक लवकरच हातीं घेणार असून, त्यांचें २५ ते ३० बँकांत रूपांतर केलें जाणार आहे, असें समजतें. कोणत्या बँकेचें दुसऱ्या कोणत्या बँकेंत एकत्रीकरण करणें श्रेयस्कर होईल, हेंहि पाहणींत सुचविलें जाईल. बँकिंग ऑपरेशन्सचे चीफ ऑफिसर श्री. एम. एस. नाडकर्णी व एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर श्री. सी. एस. दिवेकर, हे केरळाकडे नुकतेच रवाना झाले आहेत. बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांत नुकत्याच केलेल्या दुरुस्तीनें दिलेले अधिकार वापरून, रिझर्व्ह बँक तातडीनें एकत्रीकरण घडवून आणूं शकेल. केरळमधील बँकांच्या एकत्रीकरणाचा अनुभव मिळाल्यावर, रिझर्व्ह बँक इतर राज्यांतील बिन-किफायतशीर बँकांकडेहि दृष्टि वळवील, हें उघड आहे.

## बँकेचीं चित्रपट-निर्मात्याला कर्जें

### १२ लक्ष रुपयांची फसवणूक ?

शिराझअली हकीम ह्या चित्रपटनिर्मात्याला मुंबईच्या पोलिसांनीं अटक करून कोर्टांत उभें केलें; त्याला जामिनावर सोडण्यांत आलें आहे. पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणें, आरोपीनें असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ( आतां लिक्विडेशनमध्यें ) स्वतःच्या नांवानें, त्याचप्रमाणें फेमस सिने लॅबोरेटरीच्या आणि फेमस फिल्म्सच्या नांवानें १९४६ मध्यें ओव्हरड्राफ्ट खातीं होतीं. त्यावेळीं आरोपी दोन्हींचा एकमेव मालक होता. १७ जून १९४६ रोजीं त्यानें बँकेकडून ४,२७,५९८ रुपयांचा ओव्हरड्राफ्ट मिळविला आणि त्याला तारण म्हणून तयार होत असलेली फिल्म दिली. एप्रिल, १९४४ मध्यें, आरोपीनें ए. बी. सी. बँकेच्या सँढर्स्ट रोड शाखेंत फेमस सिने लॅबोरेटरीच्या नांवानें ओव्हरड्राफ्ट खातें उघडलें. ह्या खात्यावरून त्यानें ७,७८,२६५ रु. उचलले आणि त्याला तारण म्हणून २० जून, १९४६ रोजीं लॅबोरेटरीची यंत्रसामुग्री, फर्निचर, इत्यादि लावून दिलें. एप्रिल, १९४८ मध्यें, बँकेच्या ऑफिशिअल लिक्विडेटरला कळून आलें कीं, बँकेला तारण दिलेल्या ह्या मालमत्तेवर आधींचा एक चार्ज आहे. मालमत्ता निर्वेध असल्याचें त्यानें खोटेंच सांगितलें होतें. ३ जुलै, १९४३ च्या हायपॉथिकेशननें, आरोपीनें लॅबोरेटरीची सर्व मालमत्ता सुमारें ६ लक्ष रुपयांना एक फर्मला गहाण टाकली होती, असें पोलिसांनीं कोर्टाला सांगितलें. २१ मार्च, १९४६ च्या एका पत्रानें, आरोपीनें स्वतःचे फिल्ममधील हक्कहि एकाकडे गहाण टाकल्याचें पोलिसांनीं सांगितलें. १ डिसेंबर, १९४६ च्या पत्रानें आरोपीनें त्याच फिल्मवर आणखीहि एक चार्ज निर्माण केला. १९४७ मध्यें मेसर्स गोविंदराम ब्रदर्सनीं आरोपीवर मुंबई हायकोर्टांत दावा लावून फेब्रुवारी, १९४८ मध्यें फेमस लॅबोरेटरीपुरती कन्सेंट डिक्री मिळविली.

आरोपी नंतर पाकिस्तानांत पळून गेला, त्याचा १२ वर्षें पत्ता लागला नाहीं. इकडे, ए. बी. सी. बँक लिक्विडेशनमध्यें गेली.

---

### पांढरी दोन आणेली व अर्धा आण्याचीं नाणीं

दोन आण्यांचीं आणि अर्धा आण्याचीं, तांबें व निकेलमिश्रित ( पांढऱ्या रंगांचीं ) नाणीं आपल्या जवळून काढून टाकावीं, असा जनतेला सल्ला देण्यांत येत आहे. हीं नाणीं दिनांक १ ऑक्टोबर, १९६० पासून कायदेशीर चलन म्हणून राहिलेली नाहींत.

तथापि, दिनांक ३१ मार्च, १९६१ पर्यंत हीं नाणीं रिझर्व्ह बँकेच्या सर्व कचेऱ्या, सरकारी व्यवहार चालविणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या सर्व एजन्सी बँका आणि सर्व ट्रेझऱ्या व सब्-ट्रेझऱ्या यांमध्यें थकबाकी भरतांना स्वीकारण्यांत येतील. तसेंच उपरोक्त ठिकाणीं ही नाणीं बदलूनहि देण्यांत येतील. याशिवाय, सर्व रेल्वे व पोस्ट आणि टेलिग्राफ कचेऱ्यांत, रेल्वेतिकिटांचें भाडें, रेल्वेमार्फत माल पाठविणें, पोस्टाचीं तिकिटें, इतर पोस्टल स्टेशनरी यांची खरेदी, रेडिओ लायसेन्स फी वगैरेंसाठींहि हीं नाणीं स्वीकारण्यांत येतील. त्यानंतर, मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, नवी दिल्ली, बंगलोर आणि नागपूर या सात ठिकाणीं असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या इश्यू डिपार्टमेंटमध्यें देखील हीं नाणीं स्वीकारण्यांत येतील.

### " अर्था " चा पुढील अंक

ह्यानंतरचा " अर्था " चा अंक " दिवाळी विशेष अंक " म्हणून प्रसिद्ध होईल. दि. १२ ऑक्टोबरचा अंक बंद राहील.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनांच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांनीं ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.
महत्वाचें पान

१८९९-१९६०
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

## दि कल्याण पीपल्स को. बँक लि.

### पुनर्रचनेचा यशस्वी कारभार

अहवालाच्या वर्षअखेर बँकेनें रुपये ४०,५६० चें नवीन शेअर भांडवल गोळा केलें आहे. पांच वर्षांचे आंत बँकेस रु. १,५०,००० चें नवीन शेअर भांडवल गोळा करावयाचें आहे. अहवालाच्या वर्षअखेरी बँकेकडे एकूण रु. १०,१७,३९४ च्या ठेवी आहेत. बँकेनें लोकांचा विश्वास लवकर संपादन करून नवीन ठेवी रु. ३,३५,१२७ च्या मिळविल्या आहेत. अहवालाच्या वर्षी ठाणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेनें या बँकेस एकूण सहा लाखांची कॅश क्रेडिट्स् मंजूर केलीं आहेत. याखेरीज सरकारी कर्जरोख्याचे तारणावर मुंबई स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि० यांनीं ४,७०,००० चा ओव्हर ड्राफ्ट् मंजूर केला आहे.

अहवालाच्या अखेरीस जुन्या कर्जाची बाकी रु. १४,१४,१०० आहे. वर्षअखेरीस नवीन दिलेल्या कर्जाची बाकी रु. ६,३०,६०० इतकी आहे. म्हणजे सालअखेरीस ताळेबंदांत दाखविलेलें एकूण कर्ज रु. २०,४४,७०० पैकी रु. १४,१४,१०० चीं जुनीं थकलेलीं कर्जे आहेत. नवीन दिलेल्या कर्जांपैकी सालअखेरीस कोणतेंहि कर्ज थकलेलें नाहीं. अहवालाच्या वर्षांत जुन्या थकलेल्या कर्जापोटीं रु. १,७०,००० वसूल आलेला आहे. जुन्या कर्जवसुलींचे अत्यंत कसोशीनें प्रयत्न चालू आहेत. कॅशक्रेडिट देण्याचा व्यवहार चालू वर्षींच सुरू केलेला आहे.

अहवालाच्या वर्षांत बँकेनें साखरेचे घाऊक लायसेन्स मिळविलें आहे. सप्टेंबर १९५९ मध्यें लायसेन्स मिळाले तेव्हांपासून ३० जून १९६० पर्यंत बँकेनें ३,१०० पोतीं साखर आणलेली असून त्यापैकी सालअखेर ३,०२७ पोतीं साखर विकली आहे. सालअखेर या व्यवहारांत बँकेस खर्च वजा जातां रु. ७,०४० निव्वळ नफा राहिला आहे.

ताळेबंदांत दाखविलेल्या एकूण दिलेल्या कर्जांपैकी रु. १४,१४,१०० चें कर्ज बऱ्याच वर्षांपासून थकलेलें असल्यानें व त्यांत बँकेस बुडीत कर्ज येणार असल्यानें सदर कर्जास त्या त्या खात्याला व्याज नांवें टाकून उत्पन्नांत धरतां येत नाहीं. सरासरी द. सा. द. शें. ६ टक्के व्याजाचे दरानें हिशोब केला तरी बँक दरवर्षी ८० ते ८५ हजार रु. व्याजास मुकली आहे. त्याशिवाय ज्या ठेवीदारांची रक्कम या जुन्या कर्जांत अडकलेली आहे, त्यांना बँकेनें रु. १९,९०० व्याज सालअखेर दिलेले आहे. वरील आंकड्यांवरून बँकेच्या उत्पन्नावर किती ताण पडत आहे, हें दिसून येईल. अहवालाच्या वर्षांत बँकेनें मालाचे व सोनेंचांदीचे तारणावर केलेल्या व्यवहारापासूनचें उत्पन्न व साखरेच्या व्यवहारापासून मिळविलेलें उत्पन्न यामुळेंच बँक-उत्पन्न व खर्च यांचा समन्वय राखूं शकली, व सालअखेर बँकेस रु. ८२ निव्वळ नफा झालेला आहे. ता. ३०-६-५८ अखेर बँकेस रु. २,७६६·७३ तोटा झाला होता. तसेंच ३०-६-५९ अखेर रु. १०,७५५·०९ तोटा झाला असून दिनांक ३०-६-५९ अखेरच्या ताळेबंदांत एकूण तोटा रु. १३,५२१·८२ दाखविला होता. हें लक्षांत घेतां चालू सालीं बँकेला आपला खर्च भागवून मामुली का होईना थोडा नफा झालेला आहे. यावरून निःसंशय बँक प्रगतिपथावर आहे, हें सिद्ध होतें.

पुनर्रचनेच्या योजनेप्रमाणें बँकेनें २५-१२-५८ रोजीं व्यवहारास सुरवात केली. योजनेप्रमाणें बँकेनें एकूण जुन्या ठेवीदारांच्या रु. १२,०७,८२६ ठेवीपैकी रु. ५,२५,५५९ च्या ठेवी व व्याज रु. ३८,५४६ वेळेवर परत केले आहेत. उरलेल्या तीन हप्त्यांची ठेवींची रक्कम रु. ६,५६,२१३ इतकी आहे व ती वेळेवर परत करूं अशी पूर्ण खात्री आहे.

## जनता सहकारी बँक लि., पुणें २.

वर्षाअखेर बँकेचे एकंदर सभासद ६४७ असून बँकेचें भागभांडवल ८९,८२५ रु. आहे. १९५८-५९ सालीं हेच आंकडे अनुक्रमें ५९९ आणि ६५,८५० रु. असे होते. एकूण ठेवींत गेल्या दोन वर्षांत ५ लक्ष रु. ची वाढ होऊन, आतां ठेवींची रक्कम १३,५२,३४२ रु. झाली आहे.

सभासद आणि नाममात्र सभासदांना अहवालाच्या वर्षी विविध तारणांवर रु. ८,८४,८७५ चीं कर्जे दिलीं आहेत. गतवर्षापेक्षा हा आंकडा रु. ३,०६,३५६ नें अधिक आहे. अहवालाच वर्षी कर्जाची वसुली व्यवस्थितपणें होत आहे. कर्जवसुलीसाठीं एकहि प्रकरण लवादाकडे पाठवावें लागलें नाहीं. तरीपण अन्नधान्य आणि इतर नित्यजीवनोपयोगी वस्तूंची महर्गता, यामुळें जनतेची ओढाताण होत असल्यामुळें कर्जाचे हप्ते भरण्यांत अहवालाचे वर्षी कांहीं कर्जदारांकडून दिरंगाई झाली, आणि त्यामुळें थकबाकीचें प्रमाण मागील वर्षापेक्षा थोडें अधिक वाढलें आहे.

बँकेस सुरुवात होऊन १० वर्षे पूर्ण होऊन बँक ह्या अहवालानें ११ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. पुणें शहरांत नागरी सहकारी बँकांत शाखा असणारी ही एकमेव नागरी सहकारी बँक आहे. बँकेस अहवालाचे वर्षी ८,०१५ रु. नफा झाला.

---

**कोळसा कामगारांचें हित**—कोळसा कामगार मजूर हित-संवर्धन संघटनेनें चालू आर्थिक वर्षांत कामगारांच्या हिताच्या कामासाठी १·६० कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. कामगारांच्या हितासाठी उभारण्यांत येणाऱ्या निधीची वाढ करण्यासाठी कोळशाच्या टनावर घेण्यांत येणारी पट्टी सहा आण्यांवरून आठ आण्यांपर्यंत वाढविण्याचें संघटनेनें ठरविलें आहे.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

**स्थापना : १९११**

टेलिफोन, नं. २५५४७४-७५	पोस्ट बॉक्स नं. ७७२ तारेचा पत्ता-कामर्सबॅंक

मुख्य कचेरी- ९, बॅक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

**ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.**

| | | |
|---|---|---|
| भरणाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

**मुंबई राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.

## महाराष्ट्र बँकेंतील कर्मचाऱ्यांचा सत्कार

### जिव्हाळा व्यक्त करणारीं भाषणें

बँकेची स्थापना दि. १६ सप्टेंबर १९३५ रोजीं झाली. शुक्रवार दि. १६-९-६० रोजीं बँकेस पंचवीस वर्षे पूर्ण होऊन ती सव्विसाव्या वर्षांत पदार्पण करीत असल्यामुळें त्या निमित्त यथायोग्य असे धार्मिक विधी पुर्णे येथें मुख्य कचेरीचे ठिकाणीं करण्यांत आले. कर्मचारी वर्गास व बँकेंत आलेल्या ग्राहकांस पेढे वांटण्यांत आले. दुपारीं संचालक मंडळाचे अध्यक्ष श्री. वा. पुं. वर्दे यांचे हस्ते सुरवातीपासून आतांपर्यंत असंडितपणें संचालक मंडळाचे सभासद असलेले श्री. धों. कृ. साठे, पहिले कर्मचारी श्री. वा. दा. खाडिलकर, श्री. कृ. गो. भोसले व श्री. अयोध्याप्रसाद मिसार यांचा गौरव करण्यांत आला. त्यानंतर अध्यक्षांनीं बँकेच्या आजवरच्या कार्याबद्दल व पुढील उद्दिष्टांबद्दल भाषण केलें व कांहीं कर्मचारी बंधूंनी आपले विचार व्यक्त केले. सभेस सर्व संचालक व स्थानिक शाखांतील कर्मचारीवर्ग बहुसंख्येनें उपस्थित होता. रौप्य महोत्सवाचा प्रकट समारंभ येत्या डिसेंबरमध्यें महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखालीं करण्याचें संचालकांनीं ठरविलें आहे.

### चेअरमन श्री. वा. पुं. वर्दे

*मी आपल्या सर्वांना सहकारी म्हणतों, कारण संचालक मंडळ नोकरवर्गाकडे नोकर म्हणून पहात नसून सहकारी म्हणून बघत आहे याची पुष्कळांना जाणीव आहे. बँकेच्या गेल्या २५ वर्षांतील प्रगतीस सर्व सेवक वर्गानें हातभार लावलेला आहे. आपल्या सेवक वर्गाचा मोठा भाग बँकेनें लहान असल्यापासूनच मान्य केलेला आहे; तिच्या कारभारांत वाढ झाल्यावर पगारांत व अन्यत्र वाढ न मागता दिली आहे. आपल्यांत कुठलीहि कटुता निर्माण झाली नाहीं. आपण सर्वांनीं एक दिलानें, तंटेबखेडे न होता, वाढवलेली अशी संस्था, थोडासा आत्मगौरवाचा दोष पत्करूनहि मी म्हणेन, एकादीच असेल. ही एक लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे.*

( श्री. वर्दे ह्यांचें भाषण अधिक विस्तारानें मागाहून देण्यांत येईल. )

### चीफ इन्स्पेक्टर श्री. वा. दा. खाडिलकर

आज आपण सर्वांनीं माझा व माझ्याच वेळीं या संस्थेंत नोकरीस लागलेल्या श्री. कृष्णराव गोपाळ भोसले व श्री. अयोध्याप्रसाद सुरजबली मिसार भय्या यांचा जो गौरव केला त्याची पोंच म्हणून दोन शब्द या प्रसंगीं बोलणें मी माझें कर्तव्य समजतों.

मी आपल्या बँकेंत नोकरीला लागून जवळ जवळ २५ वर्षे झालीं. मी १९३६ च्या जानेवारींत नोकरीला लागलों. अर्थात माझ्या इतकींच म्हणजे जवळ जवळ ५।६ महिन्याच्या अंतरानें श्री. केळकर आले. त्यानंतर श्री. मराठे व त्यानंतर श्री. हळवे व श्री. प्रचंड आले. याचा अर्थ, थोडक्याच दिवसांत या सर्वांचे नोकरीसहि पंचवीस वर्षे पुरी होतील. योगायोगानें माझा पहिला नंबर लागला इतकेंच.

मला आपल्या बँकेबद्दल काय वाटतें हें जर कोणीं विचारलें तर थोडक्यांत मी त्याला सांगेन कीं आपली बँक, आपली संस्था म्हणजे एक एकत्र कुटुंबच आहे.

बाहेरील नोकरींचा मला स्वतःला अनुभव नाहीं पण जें कांहीं इतरांचेकडून ऐकतों त्यावरून व जे दुसरीकडून आपल्याकडे आले त्यांच्याहि बोलण्यांत नेहमीं असें येतें कीं, आपल्या बँकेच्या अधिकारीवर्गाची वागणूक हाताखालील कर्मचाऱ्यांशीं अत्यंत प्रेमळ अशीच आहे व दुधांत साखर म्हणूनच कीं काय आपल्या बँकेचे संचालक मंडळहि त्यानुरूपच आहे.

या ठिकाणीं एका प्रसंगाचा उल्लेख केला असतां तो अनुचित होईल असें वाटत नाहीं तो प्रसंग असा—

१९३८ सालीं संचालक मंडळानें मुंबईस शाखा काढण्याचें ठरविलें व ध्यानी मनीं नसतांना त्याकरतां शाखाधिकारी म्हणून माझी निवड केली. माझा बँकिंगच्या धंद्यांतील अनुभव फक्त १॥-२ वर्षांचा व मनाला सारखी धाकधुक वाटत होती कीं ही जबाबदारी पेलवेल किंवा नाहीं पण वरिष्ठांनीं विचारल्यावर 'हो' म्हणून तर बसलों. पण श्री. वर्दे शेठ व श्री. माधवराव गोखले ( त्यावेळचे मॅनेजर ) यांच्या पाठिंब्यामुळेंच सदर जबाबदारींतून मी पार पडलों. अर्थात् वेळोवेळीं कामाच्या नाविन्यामुळें म्हणा किंवा अनुभव नसल्यामुळें म्हणा, माझ्या हातून कांहीं चुका झाल्या असतील; नाहीं असें नाहीं. पण वेळोवेळीं अधिकारीवर्गाकडून मार्गदर्शन होत गेल्यामुळें मुंबईचें काम करणें मला सुलभ झालें.

वरील जबाबदारी पार पाडूं शकलों किंवा नाहीं याची दख्खल माझ्या वरिष्ठांचे जवळ आहेच.

या प्रसंगाचा उल्लेख करण्याचें कारण कीं, माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसाला मुंबईस पाठवून मला जो कांहीं अनुभव मिळाला त्याचा मला पुढेंहि पुष्कळ उपयोग झाला. यांत माझ्या कर्तृत्वापेक्षा मला मिळालेल्या योग्य मार्गदर्शनाचाच अधिक भाग आहे.

दुसरी एक सांगावयाची गोष्ट म्हणजे बँकिंगबाबत असलेल्या परीक्षेसंबंधीं. ज्यावेळीं माझे सहाध्यायी श्री. केळकर व श्री. प्रचंड हें बँकेत आले त्यावेळीं आमची इतर बँकांच्या नोकरांबरोबर चर्चा होत असे. त्यांत आपण बँकिंगच्या परीक्षेस बसावें व आपला भविष्यकाल उज्वल करावा असें वाटल्यावरून इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स या संस्थेला मी प्रथम पत्र लिहिलें. त्यांचें उत्तर आले कीं, तुमची बँक प्रथम इन्स्टिटयूटनें मान्य करावयास हवी व जर मान्यता मिळवावयाची तर प्रथम बँकेनें वर्गणी भरावयास हवी. लगेच मी याबाबत मॅनेजर साहेब व संचालक मंडळाचे अध्यक्ष कै. प्रो. वामनराव काळे यांची अनुमति मागितली व ती त्यांनीं आनंदानें दिली. योग्य वेळीं संचालक मंडळाचा ठराव होऊन वर्गणी भरली गेली व आपल्या बँकेलो इन्स्टिटयूटकडून मान्यता मिळाली. आपल्या बँकेंतून प्रथम परीक्षा उत्तीर्ण होण्याचा मान माझे सहकारी श्री. एम्. ए. केळकर यांना मिळाला व बँकेनें त्यांना अनुक्रमें ७५ रुपये पहिला पार्ट पास झाल्यावर व १५० रुपये दुसरा पार्ट पास झाल्यावर उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून दिले. अशा तऱ्हेनें बक्षीस देण्याची पद्धत त्यावेळीं फारच थोड्या बँकांतून होती.

वरील दोन उदाहरणें देण्याचें कारण कीं, संचालक मंडळाची कर्मचाऱ्यांचेकडे बघण्याची दृष्टि कशी सहानुभूतीची व उत्तेजन देण्याची आहे हें दिसून येईल.

खाजगी अगर वैयक्तिक अडचणी केव्हां केव्हां वरिष्ठांपुढे मांडण्याचा प्रसंग माझ्याप्रमाणें इतरांनाहि आलेला आहे व त्या त्या वेळीं अडचण ऐकून त्यावर मार्गदर्शन अगर मदत आली नाहीं असें कधींच झालें नाहीं हें मला येथें मुद्दाम नमूद करावेसें वाटतें.

माझ्यासंबंधींच बोलावयाचें झालें तर माझा सर्व देह—नव्हे माझा सर्व संसारच—बँकेच्या अन्नावर पोसलेला आहे. बँक, महाराष्ट्र बँक; ही माझी सर्वस्वच झाली आहे यांत नवल तें कसलें ?

सरते शेवटीं आपल्या बँकेची सेवा करण्याची संधि मला अधिक काळ लाभो व त्यामुळें मला महाराष्ट्र बँकेची, महाराष्ट्राची, नव्हे

पर्यायानें भारताची अल्पशी कां होईना पण सेवा करण्याची परमेश्वर शक्ति देवो येवढी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों व आपण आमचा जो गौरव केला आहे त्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानून माझें भाषण पुरें करतों.

सह नाववतु, सह नौ भुनक्तु; सह वीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै।

### श्री. कृ. गो. भोसले

माझ्या सारख्या दुय्यम दर्जाच्या सेवकानें आपणांसमोर बोलण्याचें धाडस मी करीत आहे तें केवळ माझ्यावर बँकेनें केलेल्या कृपेचें उतराई व्हावें म्हणूनच. बोलण्यापेक्षा करणें हाच आमचा धर्म असावयास पाहिजे हें खरें. पण माझ्यावर झालेल्या कृपेमुळें भारावून गेल्यामुळें बोलल्यावांचून राहवत नाहीं; क्षमा असावी.

अगदीं ल्हानपणींच म्हणजे १९३६ सालीं ही बँक स्थापन होतांच मला त्यावेळचे अध्यक्षमहाराज कैलासवासी प्रोफेसर काळे साहेब आणखी मॅनेजर राजेश्री गोसलेसाहेब यांनीं मला कामावर घेतलें. आज कनिष्ठ सेवकवर्गाला आरंभीं जेवढा महागाई भत्ता मिळतो त्याच्या चतकोरापेक्षाहि कमी, म्हणजे महिना सात रुपये पगार मला सुरुवातीला मिळूं लागला. बँक हलके हलके वाढीला लागली. तसतसें काम वाढूं लागलें. सांगावयाला संतोष वाटतो कीं वेळोवेळीं अधिकारावर असलेल्या अध्यक्ष साहेबांच्या आणखी मॅनेजर साहेबांच्या भलेपणानें कामाचें चीज होऊं लागलें. कारभारी लोकांच्या कृपाछत्राखालीं मी वाढूं लागलों. प्रोफेसर काळेसाहेब, श्रीयुत मामासाहेब साठे आणि सध्यांचे कार्याध्यक्ष मेहेरबान वर्दे शेठ, यांच्याप्रमाणेंच सध्यांचे मॅनेजर श्रीयुत जोग साहेब यांच्या भलेपणामुळें मला आपलें काम करण्यास उत्तेजन मिळत आहे. इतर बँकांमधून काय किंवा सार्वजनिक ऑफिसांतून काय आपलेपणाचा ओलावा चालकवर्ग आणखी सेवकवर्ग यांच्यामध्यें अगदींच तुरळक आढळून येतो. ह्या आमच्या बँकेंत मात्र आपण सारेजण एकाच कुटुंबाचे घटक आहों असें प्रेमाच्या हक्कामुळें म्हणतां येतें.

आज जवळ जवळ पंचवीस वर्षें मी या बँकेची सेवा करीत आहे. थोर अधिकाऱ्यांची सेवा वरच्या थरांतून होत असली तरी खालच्या थरांतील सेवा करण्याची संधि मिळत राहिल्यानें आपलें कार्य कितीहि ल्हान दर्जाचें असें सामान्य लोकांनीं गणलें तरी तें निष्ठापूर्वक करीत आलों आहे. त्या सर्वांचे आपल्यासारख्या थोर लोकांनीं आज चीज केलें आहे. काम चांगलें केलें आणखी कोणी पाठीवर मायेनें हात फिरविला तर मूठभर मांस चढतें म्हणतात त्याचा मला आज अनुभव येत आहे. पूर्वीपासून एकनिष्ठपणानें सेवा करीत आलों आहे तशीच अखंड चालू ठेवीन असें नम्रपणानें सांगण्याची परवानगी घेतों. बँकेनें म्हणजे अध्यक्षमहाराज वर्दे शेठ आणखी मॅनेजर जोगसाहेब यांनीं माझें गुणग्रहण करून मला जें पारितोषिक दिलें आहे त्याबद्दल मी शतशः आभारी आहे. बँकेच्या सुवर्णमहोत्सवाचे वेळीं आपण पुनः जमूंच. तेव्हां पुढल्या टप्प्याचे वेळीं अशीच संधि पुनः मिळेल अशी आशा व्यक्त करून आपणां सर्वांस अभिवादन करून मी आपलें भाषण संपवितों.

### श्री. अयोध्या प्रसाद मिसार

मी बँकेंत लागल्यापासून म्हणजे गेलीं २५ वर्षें इमानें इतबारें नोकरी केली. व त्याचेंच हें फळ आहे. तरी मला बँकेंतील प्रत्येक घटकास अशी विनंती करावयाची आहे कीं आपण इमानें इतबारें नोकरी केल्यास आपणांस त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहणार नाहीं, याची मला खात्री आहे. तरी आपण आपलें काम उत्तम रीतीनें करावें अशी विनंती आहे. मला अधिकारी वर्गानें उत्तम रीतीनें वागविल्याबद्दल व कोणतीहि उणीव भासूं न दिल्यामुळें मी सर्वांचा अत्यंत आभारी आहे. आपल्या बँकेची जी भरभराट चालू आहे ती अशीच चालू राहो व हिंदुस्थानांत व जगांत प्रसिद्ध होवो एवढीच परमेश्वराचे चरणीं विनंती करतों व पुन्हा एकदां मी आपल्या सर्वांचे आभार मानून मी माझें भाषण पुरें करतों.

---

### अर्बन को. बँक लि., सांगली

अहवालाचे वर्षीं बँकेची सर्व दृष्टींनीं प्रगति झाली आहे. सभासद संख्या २७५ नें वाढली, भाग भांडवलांत २०,४६० रु. ची भर पडली. रिझर्व्ह व इतर फंड ३,५८,८३१ रु.चे ४,२०,१७२ रु. वर गेले. नफावांटणीनंतर बिल्डिंग फंडाची रक्कम मुख्य कार्यालयाचे इमारतींत गुंतलेल्या रकमेपेक्षा अधिक झाली आहे. बॅड डेट फंड, थकबाकी व बुडीत कर्जाच्या रकमेइतका झाला आहे. सरकारी रोख्यांची बाजारभावानें होणारी किंमत गुंतविलेल्या रकमेपेक्षा २० हजार रु. नीं जास्त आहे. ठेवी ४१½ लक्ष रु. च्या ५२ लक्ष रुपयांवर गेल्या. भावनगर शाखेच्या कार्यालयाच्या इमारतीचें बांधकाम चालूं आहे; त्यांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय होणार आहे. बँकेस ५४,०२८ रु. नफा झाला. २,८०७ सभासद, ६,३२५ ठेवीदार, ५६३ कर्जदार, ६० लक्ष रु. खेळतें भांडवल, महाराष्ट्र राज्यांत (मुंबई शहर व नगर जिल्हा म. अ. बँक वगळून) राज्यांतील अर्बन बँकांत पहिला नंबर, चेअरमन, श्री. म. ह. गोडबोले ह्यांचें सहकारी क्षेत्रांतील कार्य, इत्यादि दृष्टीनें बँकेचें रौप्यमहोत्सव वर्ष चालकांना अभिमानास्पद आहे.

---

### दि इसलामपूर को. पीपल्स बँक लि.

५३० सभासद; २७,०७५ रु. शेअर भांडवल; २५,५०५ रु. रिझर्व्ह फंड; १३,७०५ रु. इतर फंडस; २,३५,९४९ रु. ठेवी; १,५९,७६९ रु. दिलेलीं कर्जे; २,२९,३७१ रु. खेळतें भांडवल; रु. ५,७४२ रु. नफा; असे ह्या बँकेचे प्रमुख आंकडे आहेत. त्या सर्वच बाबतींत बँकेची प्रगति होत आहे.

---

### कोल्हापूर डि. इंडस्ट्रि. को. असोसिएशन लि.

असोसिएशनचें हें दुसरेंच वर्ष आहे. अहवालसालीं रंग वगैरे १,१०० रु. चा माल पुरविला. २७,५०० रु. ची चमक सोसायट्यांना पुरविण्याचें काम चालू आहे. "वडगांव, मलकापूर व जयसिंगपूर हातमाग कापड विक्रीकेंद्रें उभारणें, कोल्हापुरांत लेदर डेपो चालविणें, रंग, केमिकल्स, सूत व चमक मागणी प्रमाणांत पुरविणें, लोखंड व पोलाद औद्योगिक कार्यास पुरविणें, कोल्हापूर शाहू मिल चालविण्यास मिळविण्याचा प्रयत्न करणें," ही भावी स्थूल रेषा आहे.

---

### दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल १०,६४,७०० रु. असून गंगाजळी व इतर निधी १,०१,६५७ रु. चे आहेत. बँकेला रिझर्व्ह बँक, बॉबे स्टेट को. बँक, इ. कडून ३१,१०,००० रु. कर्जाऊ मिळालेले आहेत. बँकेनें ५४,३९,५०७रु. चीं शेतीविषयक कर्जे दिलेलीं आहेत. ठेवी २४ लक्ष रुपयांवर आहेत. ४२ च्या ह्या अहवालाचे वर्षी बँकेनें राहिलेल्या दोन तालुक्यांसाठी स्वतंत्र शाखा उघडल्या.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकनें सेव्हिंग्ज ठेवी-वरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २$\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | : | २$\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३$\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेडयूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

## ( शिडयूल्ड बँक ) दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )

मुंबई शाखा :—८९ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर-कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—वी. वाय्. पाठक, अॅ. मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें येथें प्रसिद्ध केलें.

किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434- Licence No. 53
Licensed to post without prepayment

# अर्थ

ऑक्टोबर
१९६०

दिवाळी
विशेषांक




त्यासाठीं अल्प बचत भेट कुपनांची निवड
करणें हेंच सगळ्यांत उत्तम. त्यामुळें राष्ट्रविकासाच्या
कार्यक्रमालाहीं तुम्हीं सहाय्य करूं शकाल.

दिवाळी, लग्नसमारंभ
अथवा वाढदिवस अशा कोणत्याही प्रसंगीं भेट देण्यासाठीं
आपण अल्प बचत कुपनांचीच निवड करा.

## अल्प बचत भेट कुपनांची
## सर्वोत्कृष्ट भेट द्या

तुमच्या जवळच्या पोष्ट ऑफिसांत ५ रु,
५० रु, १०० रु. व १००० रु. या किमतीची
भेट कुपनें मिळूं शकतील

[illegible] संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र
## शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

हें सारस्वताचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड ।
तरी अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥
मध हें रसभाव फुलीं फुलेल । नानार्थ फळभारें फळा येईल ॥
[ ज्ञानेश्वरी ]

**महाराष्ट्रांतील जनतेचें सहाय्य व सहकार्य**
**कै. श्री. आगाशे यांचे अविरत श्रम आणि**
त्यांनीं ठरवून दिलेल्या धोरणाप्रमाणें संचालक मंडळानें चालविलेला कंपनीचा कारभार यामुळेंच सिंडिकेटचा कारखाना यशस्वी झाला आहे.

कंपनीच्या रौप्यमहोत्सवाचे वर्षीं ऑर्डिनरी शेअरवर २० टक्के ( करपात्र ) डिव्हिडंड देऊन कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांची इच्छा पुरी करतां आली याबद्दल संचालक मंडळास आनंद होत आहे.

## नवीन हंगाम दिवाळीनंतर सुरू होईल

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !

**संचालक मंडळ**

श्री. शंकर लक्ष्मण लिमये, B. Sc , LL. B., वकील.
: अध्यक्ष :

श्री. शं. भ. कोंडे देशमुख, व्यापारी.
श्री. ग. ह. सवनीस.
श्री. रामराव देशमुख, M. A., LL. B. ( Cant. ), Bar-at-Law, M. P.,
श्री. ज. चं. आगाशे.
श्री. भ. ग. भाडुले, B. Sc., LL. B , वकील.
श्री. श्री. र. केसकर, वकील.
श्री. वि. कृ. साठे, B. A., (टिळक) माजी पुरवठामंत्री, मुंबई राज्य.
श्री. गो. न. जोशी, B. Sc ,

**श्री. के. व्यं. चांफेकर,** B. E., A. M. I. E., मॅनेजर.

॥ श्री ॥

# अशोक सहकारी साखर कारखाना लि., अशोकनगर

पोस्ट व तालुका—श्रीरामपूर, जिल्हा—अहमदनगर.

रजिस्टर नंबर-१६४　　दि १-११-१९५४

टेलिफोन नं. श्रीरामपूर एक्सचेंज १००

रेल्वे स्टेशन—बेलापूर

टेलिग्राम-'शर्करा' श्रीरामपूर सायडिंग-ए. एस. के. जी.

**दिनांक १० ऑक्टोबर १९६० रोजीं नवा हंगाम जोमानें चालू झाला आहे**

१. अधिकृत भांडवल　रु. ५०,००,०००
२. विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५०,००,०००
३. खपलेलें भांडवल　रु. ४३,४२,०००
४. वसूल झालेलें भांडवल　रु. ३३,६५,२००

१९५९-६० चे हंगामांत कारखान्यानें १,७०,२४९ पोतीं साखर उत्पादन केलें व पुढील वर्षी २,००,००० चे वर साखर पोतीं उत्पादन करण्याची कारखान्यास उमेद आहे.

आमचे सहकारी बंधू, सभासद व ग्राहकांस नूतन वर्ष आनंदाचें व भरभराटीचें जावो.

**★ संचालक मंडळ ★**

१. श्री. भा. स. गलांडे, अध्यक्ष.
२. श्री. य. ह. कवडे, उपाध्यक्ष.
३. श्री. ग. मु. बसकर, संचालक. ४. श्री. वाय. नवारे, संचालक
५. श्री. ज्ञा. रा. थोरात, ,,　६. श्री. रा. वि. भांड, ,,
७. श्री. नि. ना. पाटील, ,,　८. श्री. व. शं. खंडागळे, ,,
९. श्री. पं. खं. पाटील, ,,　१०. श्री. स. बा. भोसले, ,,
११. श्री. श. मा. आगाशे ,,
१२. श्री. एस्. एम्. आचार्य, स्पे. डे. र. को.-ऑ. शुगर फॅक्टरीज, पुणें.
१३. श्री. आर. आर. महाजन, स्पे. ऑडिटर फॉर शुगर फॅक्टरीज, अहमदनगर.
१४. श्री. व्ही. डी. मुजुमदार, आय. एफ. सी. प्रतिनिधि, मुंबई.
१५. श्री. जी. एम्. लाड, मॅनेजिंग डायरेक्टर, बॉम्बे स्टेट को. ऑ. बँक प्रतिनिधि, मुंबई.
१६. श्री. पी. जी. पानसे, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, अहमदनगर.
१७. श्री. ए. आर. उपाध्याय, मॅनेजिंग डायरेक्टर, कार्यकारी संचालक, अशोक स. सा. का. लि., अशोकनगर.



# दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक

पोस्ट बॉक्स नं. ३२
फोन नं. ११७

## लिमिटेड, सोलापूर
(स्थापना १९१८)

तारेचा पत्ता—कृषी बँक
हेड ऑफिस : सोलापूर

शाखा:—पंढरपूर, कुर्डूवाडी, करमाळा, मंगळवेढा, अक्कलकोट, अकलूज, नातेपुतें, सिद्धार्थ (सोलापूर), वैराग, बार्शी व मंद्रूप

—[पे ऑफिसः—मोहोळ, मोडलिंब, माढा, सांगोला.]—

१. खपलेलें शेअर भांडवल　रु. ११,८५,७३०
२. रिझर्व्ह व इतर फंडस्　रु. १३,०३,२३९
३. सर्व प्रकारच्या ठेवी.　रु. १,५७,८५,४५१
४. एकूण खेळतें भांडवल　रु. २,०९,५६,६००
५. सन १९५९-६० चा नफा रु.　१,६१,६३६

जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केन्द्रस्थान असलेल्या, व ठेवीदार व संबंधित गिऱ्हाईकांच्या विश्वासास पात्र झालेल्या व सतत ४२ वर्षे प्रगतिपथावर असलेल्या ह्या बँकेतून पुढील प्रकारचे व्यवहार केले जातात.

१. सर्व शेतकरीवर्गाला सोसायट्यांमार्फत अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जें दिलीं जातात.
२. खत, लोखंड व साखर वाटपकाम केलें जातें.
३. सर्व शाखांमार्फत बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
४. सोलापूर येथील हेड ऑफिसमध्यें मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केलेली आहे.
५. ठेवींवरील व्याजाचे दर आकर्षक ठेवणेंत आले आहेत.
६. मोठ्या रकमा ठेवणारांनीं समक्ष ऑफिसांत येऊन चौकशी करावी. त्यांना सवलतीचा व्याजाचा दर दिला जातो.

के. के. परबत, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर

मच्छेन्द्र लक्ष्मण पाटील
चेअरमन

ही दिवाळी व नूतन वर्ष बँकेचे ठेवीदार व हितचिंतक यांना आनंदाचें व सुखसमृद्धीचें जावो.

— रौप्य महोत्सवी वर्षांत —

## ☆ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली ☆

फोन ५३] मुख्य कार्यालय—हरभट पथ, सांगली. ★ शाखा—माधवनगर, द. सातारा [तार—अर्बन बँक

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० | रिझर्व्ह फंड | रु. १,६८,४६२ |
| वसूल भांडवल | रु. २,०१,९१० | इतर फंडस् | रु. २,५१,७११ |

ठेवी ... रु. ५३,१६,९९१

[ आमचीं वैशिष्ट्यें ]

★ मुख्य कार्यालयांत माफक भाड्यांत सेफडिपॉझिट लॉकर्सची सोय.

★ माधवनगर शाखेच्या होत असलेल्या अद्ययावत् इमारतींतहि सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय करीत आहोंत.

★ चांगल्या व्याजानें घरबसल्या अल्प ठेवींची ' बचतनिधि ' सोय.

★ रौप्यमहोत्सव ठेव रोख्यांची विक्री चालू आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. म. ह. गोडबोले,
बी. ए., एलएल. बी.,
चेअरमन.

श्री. ल. य. लागू,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर.

नूतन वर्ष भरभराटीचे जावो !

## दि बेळगांव बँक लिमिटेड

शेड्यूल्ड बँक ] मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव [ स्थापना : १९३०

महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत एकूण २७ शाखा.

बँकेचें स्थैर्य दर्शविणारे आंकडे

वसूल भांडवल : रुपये आठ लाख
रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हस : रुपये चार लाख, अडतीस हजार
ठेवी : रुपये एक कोटी, सत्याहत्तर लाख

[ संचालक-मंडळ ]

श्री. गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी., चेअरमन. श्री. श्री. वा. कलघटगी, व्यापारी, व्हा. चेअरमन.
श्री. अ. रा. नाईक, बी., ए.; बी. एससी., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर. श्री. लिं. वि. देशपांडे, व्यापारी.
श्री. भि. बा. पोतदार, बी. ए., एलएल. बी., श्री. म. गो. हेरेकर, बँकर.
श्री. सि. म. मुत्तूर, व्यापारी. श्री. ना. शां. शिराळी, रिटायर्ड टेलिग्राफिक सुपरिंटेंडेंट.

*बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

बेळगांव, निपाणी व गोकाक ह्या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्कृष्ट सोय.

अल्प बचतयोजना : आकर्षक व्याज व अल्प बचत करण्यासाठीं, आम्ही सुरू केलेल्या एक, दोन, तीन व चार वर्षें मुदतीच्या क्युम्युलेटिव्ह खात्यामध्यें गुंतवणूक करा.

विशेष माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. एच्. एस्. कुलकर्णी, बी. ए.,
जनरल मॅनेजर.

# अर्थ

दिवाळी अंक

१९ ऑक्टोबर, १९६०





स्थापना : १९३२

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

**ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस व वाचकांस सुखाचें जावो !**

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ कृषिसमाजाच्या व्यापक संघटनेचें स्वरूप ( व. रा. गाडगीळ ) | ६ |
| २ धार्मिक व नैतिक कल्पनांचें शुद्धीकरण ( शं. वा. किर्लोस्कर ) ... | ७ |
| ३ बँकांमधील ठेवींच्या विम्याची योजना (तज्ज्ञ बँकर) ... | ९ |
| ४ सहकारी संस्था व त्यांचा नोकरवर्ग (द. दि. चिनके) ... | ११ |
| ५ अमेरिकेतील बँकिंगच्या धंद्यांतील बदल ... | १३ |
| ६ भारतामधील वृत्तपत्रांची सद्यःस्थिति ... | १५ |
| ७ व्यापार–उद्योगविषयक संघटना ... | १८ |
| ८ कांहीं संघटनांच्या उपयुक्ततेचें स्वरूप ... | १९ |
| ९ तिसरी पंचवार्षिक योजना व लघु–उद्योग ... | २१ |
| १० सहकारी क्षेत्राला असें नेतृत्व हवें ( र. गो. काकडे ) ... | २३ |
| ११ महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखाने ... | २५ |
| १२ केरोसीन, पेट्रोल व डीझेल तेल ... | २७ |
| १३ परदेशी प्रवाशांना आकर्षण्याची योजना ... | ३३ |
| १४ कंपनी व भागीदारी ह्यांतील फरक ... | ३५ |
| १५ डॉक्टरचा अभ्यासासाठी प्रवासखर्च ... | ३९ |
| १६ पुण्याजवळ नव्या कारखान्यांना वाव ... | ४० |
| १७ रशिआंतील शेतीच्या पद्धतीचें स्वरूप ... | ४१ |
| १८ आयात आणि निर्यात व्यापार ... | ४२ |


**"अर्था"चा ह्यापुढील अंक नेहमीप्रमाणें दोन सुट्यांनंतर दि. ९ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.**


महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

(शिड्यूल्ड बँक) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** (स्थापना १९३६)

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )

मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर–कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्स्पोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड काच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी मामवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—वी. वाय. पाठक, ॲ. मॅनेजर.

# कृषि समाजाच्या व्यापक संघटनेचें स्वरूप

[ लेखक : ध. रा. गाडगीळ ]

मध्यवर्ती सरकारनें अगर नियोजन मंडळानें कांहीं कायम ठशाचे कार्यक्रम निरनिराळ्या क्षेत्रांत ठरवावयाचे व त्यांच्याबरहुकूम देशभर जिल्ह्याजिल्ह्यांत अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करावयाचा, असें बहुतांशीं आजच्या भारतीय आर्थिक नियोजनाचें स्वरूप आहे. यामुळें शेती व एकंदर ग्रामीण अर्थव्यवस्था यांची प्रगति हवी तशी, इष्ट दिशेनें आणि खर्च व मेहनत यांच्या प्रमाणांत होऊं शकत नाहीं, हें आज सर्वमान्य झालें आहे व वरून कार्यक्रम लादण्यापेवजीं स्थानिक स्थिति व गरजेनुसार ते घडवले गेले पाहिजेत, अशा घोषणाहि नियोजन मंडळ व भारतीय सरकार यांनीं केल्या आहेत. परंतु खऱ्या अर्थी अजून प्रत्येक राज्याच्या विशिष्ट नियोजनास सुरुवातहि झालेली नाहीं, त्यामुळें याहून लहान प्रदेश अगर विभाग दुर्लक्षिले गेल्यास नवल नाहीं. नवें महाराष्ट्र राज्य हें फार मोठ्या प्रमाणावर कृषि–उत्पादनावर अवलंबून आहे व हें उत्पादन वाढविणें, त्याचा पाया जास्त व्यापक विस्तृत करणें व ग्रामीण अर्थव्यवस्था सर्व बाजूंनीं विकसित करणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. हें काम एका दृष्टीनें सरकारचें आहे; परंतु हें खरोखर सर्वव्यापी व सर्वदर्शी व्हावयाचें असल्यास व राज्याच्या सर्व कानाकोपऱ्यांत विकासयोजनांचा प्रभाव दिसावयाचा असल्यास यांत लोकांनीं पूर्णपणें सहभागी झालें पाहिजे, एवढेंच नव्हें तर अनेक बाबींत लोकनेत्यांनीं पुढाकार घेतला पाहिजे व मार्गदर्शन केलें पाहिजे. असें झालें तरच स्थानिक परिस्थिति व लोकांच्या गरजा व आकांक्षा या योजनेंत योग्य रीतीनें प्रतिबिंबित होतील.

हें घडवून आणणें, तत्प्रीत्यर्थ झटून संघटित प्रयत्न केल्याशिवाय होणार नाहीं. या कार्याचे मुख्यत्वें दोन टप्पे मानतां येतील. पहिला म्हणजे जिल्ह्यानिहाय जेवढी उपलब्ध असेल तेवढी सर्व आवश्यक माहिती गोळा करून प्रादेशिक व विभागीय अर्थव्यवस्थेचें यथार्थ रूप प्रदर्शित करणें आणि या पायावर आणि भारताच्या नियोजित उद्दिष्टांच्या अनुरोधानें राज्याच्या आर्थिक धोरणांबाबत व प्रदेशांच्या संभाव्य योजनांबाबत निश्चित विचार सरकारपुढें मांडणें. दुसरें उद्दिष्ट म्हणजे ही प्राथमिक तयारी करण्याकरितां व मुख्यतः पुढें सतत योजनाक्षेत्रांत काम करण्याकरितां उत्पादक, सहकारी कार्यकर्ते, तज्ज्ञ, इत्यादींची जिल्हानिहाय कायम संघटना निर्माण करणें. पहिला टप्पा औरंगाबाद येथील महाराष्ट्र राज्य शेतकी व ग्रामीण विकास परिषदेनें व तिच्या पूर्वतयारीनें गांठला आहे.

संघटनेच्या स्वरूपाबाबत दोन पर्याय संभवतात. पहिला पर्याय म्हणजे संघटनेचें स्वरूप पूर्णपणें व्यावसायिक असणें. म्हणजे ज्याप्रमाणें व्यापारी–कारखानदार यांचीं सर्वसाधारण अगर विशिष्ट व्यवहाराबाबत मंडळें किंवा संघ असतात त्याप्रमाणें शेतकऱ्यांची संघटना करणें. दुसरा पर्याय म्हणजे संघटनेचें स्वरूप केवळ व्यावसायिक न ठेवतां व्यावसायिक उत्पादकांबरोबरच इतर संबंधितांचा या संघटनेंत समावेश करणें. शेतकऱ्यांच्या केवळ व्यावसायिक संघटनेच्या मार्गांत संभाव्य अडचणी कोणत्या व अशा संघटनेची उपयुक्तता काय, या प्रश्नांचा मी येथें विचार करीत नाहीं. कारण, माझ्या मतें समर्थ व्यावसायिक संघटना होऊं शकली तरी दुसऱ्या प्रकारच्या व्यापक संघटनेची जरुरी कायमच राहील. याचें कारण थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्यासारख्या कृषिप्रधान गरीब देशांतील शेतकरी समाजाचें सामर्थ्य हें कांहीं झालें तरी तोटकेंच पडणार, व सर्व प्रकारें बाहेरची मदत घेतल्याखेरीज या समाजास हल्लींची कोंडी फोडतां येणार नाहीं.

उदाहरणार्थ, सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांकरितां सहकारी संघटनेचा शेतकऱ्यांस आश्रय घ्यावा लागणार, आणि या संघटनेच्या उभारणीकरितां शासनसंस्थेची आर्थिक व इतर मदत हरकामीं लागणार. परंतु सहकारी संघटना राबवावयाची म्हटल्यास पूर्णपणें व्यावसायिक दृष्टिकोण ठेवून चालावयाचें नाहीं; व्यापक समाजहिताचा अल्प तरी विचार बाळगला पाहिजे. असें न केल्यास समाजाची प्रतिक्रिया प्रतिकूल होते व त्याचा शेतीसमाजहितविरोधी गैरफायदा घेतात. सर्वच अप्रगत व गरीब समाजांस शास्त्रीय ज्ञान व भांडवल यांच्या पुरवठ्याबाबत इतरांची मदत घ्यावी लागते, आणि कृषिसमाज तर तौलनिक दृष्ट्या गरीब, आपल्या देशांत तर त्यांतल्या त्यांत गरीब. तेव्हां व्यापक संघटना करणें हेंच शेतीसमाजाच्या हिताचें; आणि शेतीची आणि शेतकरी समाजाची प्रगति होणें राष्ट्रदृष्ट्या फार महत्त्वाचें असल्यामुळें ज्यांना शक्य असेल त्या सर्वांनीं अशा संघटनेस हातभार लावणें हें त्यांचें कर्तव्य ठरतें.

भावी संघटनाव्यवस्थेचीं मुख्य लक्षणें मला दिसतात तीं खालीलप्रमाणे: संघटनेची सुरुवात स्थानिक घटकांपासून होऊन संघरूपानें तिचा विस्तार विभाग, राज्य, देश, असा झाला पाहिजे. संघटनेंत उत्पादकाचें स्थान मुख्य महत्त्वाचें व मानाचें हवें, पण त्याबरोबरच इतर संबंधित कार्यकर्ते व तज्ज्ञ यांस योग्य जागा तींत मुद्दाम दिली पाहिजे. संघटनेचें लक्ष व्यावसायिक हिताबरोबरच, सबंध समाजाच्या हितावर केंद्रित झालें पाहिजे व तिचा रोख कोणतेंहि विशिष्ट हितसंबंध टिकविण्यापेक्षा प्रगतिपर सर्वांगीण विकासावर पाहिजे. अशा संघटनेचा पाया क्रमाक्रमानें रचल्याखेरीज आपल्या विकास कार्यक्रमास खऱ्या अर्थानें सुरुवात होऊं शकणार नाहीं.

[ परिषदेंतील भाषण ]

श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांचे गुजराती अनुवाद

सुखी जीवननी पगदंडी
(तिसरी आवृत्ति)
[ कण आणि क्षण ]

सदाचारने पगले
(दुसरी आवृत्ति)
[ पुढे पाऊल ]

मधुमालती
(छापत आहे)
[ तुमचें स्थान कोणतें ]

# बँकांमधील ठेवींच्या विम्याची योजना

## अमेरिकेचा अनुभव भारताला मार्गदर्शक

[ लेखक : एक तज्ज्ञ बँकर ]

पलाई बँकेचें दिवाळें निघाल्यामुळें बँकांमधील ठेवींचा विमा उतरण्याच्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष पुन्हा एकदा गेलें आहे. १९२९ च्या मंदींत अमेरिकेंतील लोकांचा बँकांवरील विश्वास उडाला होता. त्या वेळीं अमेरिकन सरकारनें फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनची स्थापना करून अमेरिकेंतील बँकांना स्थैर्य प्राप्त करून दिलें आणि लोकांचा बँकांवरील विश्वास पुन्हा बसविण्याच्या कामीं मदत केली. अमेरिकेच्या ह्या बाबतींतील अनुभवाची हिंदमध्यें चर्चा होऊं लागली आहे. असेंच कॉर्पोरेशन भारतांत स्थापन करण्यांत यावें असें सुचविण्यांत येत आहे. त्यामुळें अमेरिकेच्या कॉर्पोरेशनची घटना व त्याचें कार्य ह्यांचा थोडक्यांत अभ्यास करणें इष्ट ठरेल.

### बोर्डाची घटना कशी असावी ?

फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनची स्थापना १९३३ सालीं करण्यांत आली. त्याचें एकूण भांडवल २८९ कोटी डॉलर्स होतें. त्यापैकीं १५ कोटी डॉलर्स फेडरल सरकारनें व १३·९ कोटी डॉलर्स फेडरल रिझर्व्ह बँकांनीं भरणा केलेलें होतें. त्याशिवाय अमेरिकेच्या ट्रेझरीकडून कॉर्पोरेशनला ३ अब्ज डॉलर्सचें कर्ज देण्यांत आलें होतें. डायरेक्टर बोर्डावर तिघेजण असतात. त्यांपैकीं दोघांची नेमणूक अमेरिकेचा अध्यक्ष ६ वर्षांच्या मुदतीची करतो. एक डायरेक्टर हा चलनाचा अधिकारी असतो. त्यांपैकीं एकजण बोर्डाचा अध्यक्ष असतो. इंडिअन बँक्स असोसिएशननें अशी सूचना केली आहे कीं, अशाच प्रकारचें एक कॉर्पोरेशन भारतांत स्थापन करण्यांत यावें. त्याचें वसूल भांडवल ५ कोटी रुपयांचें असावें व आणखी ५ कोटी रु. रक्कम कर्जाऊ घेण्याचे अधिकार कॉर्पोरेशनला असावे. भांडवल उभारण्याचे कामीं रिझर्व्ह बँक, आयुर्विमा कॉर्पोरेशन व शेड्यूल्ड बँका ह्यांनीं सहकार्य करावें व कॉर्पोरेशनच्या डायरेक्टर बोर्डावर सर्वांचे प्रतिनिधि असावे. फेडरल डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशन राजकीय प्रभावापासून अलिप्त राहावें म्हणून अशी कायदेशीर तरतूद करण्यांत आली होती कीं, कॉर्पोरेशनचे दोघांपेक्षा अधिक डायरेक्टर्स एकाच राजकीय पक्षाचे सभासद असूं नयेत. राजकीय प्रभावापासून कॉर्पोरेशन दूर ठेवण्यासाठी केलेली ही तरतूद लक्षांत घेतां भारताच्या संकल्पित कॉर्पोरेशनच्या बोर्डावर शेड्यूल्ड बँकांना प्रतिनिधित्व देण्याची कल्पना अयोग्य वाटल्यावांचून राहात नाहीं. त्यापेक्षा निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या व द्रव्यविषयक संस्थांच्या प्रतिनिधींची एक सल्लागार कमिटी नेमण्यांत यावी. ह्या कमिटीनें बोर्डापुढें येणाऱ्या प्रश्नांवर तज्ज्ञ ह्या नात्यानें सल्ला द्यावा. बोर्ड जर कोठल्याहि प्रकारच्या दडपणापासून मुक्त असेल तरच त्याला आपलें काम प्रामाणिकपणें व कार्यक्षमतेनें करतां येईल. शेड्यूल्ड बँकांना प्रतिनिधित्व दिलें तर बोर्डाला आपल्या स्वातंत्र्याची योग्य जाणीव राहणार नाहीं. अमेरिकेच्या कॉर्पोरेशननें १९४८ सालीं सदस्य बँकांची स्वतंत्ररीत्या पाहणी करण्याची सुद्धा मागणी केलेली होती. पण फेडरल रिझर्व्ह बँकांनीं केलेल्या तपासणीच्या कामाचीच पुनरावृत्ति करण्याचा हा प्रकार होईल असा आक्षेप त्या वेळीं घेण्यांत आला होता.हा प्रश्न अमेरिकेंत उत्पन्न झाला होता. त्यावरून भारताचें संकल्पित कॉर्पोरेशन आणि खुद्द रिझर्व्ह बँक ह्यांच्यांतहि ह्या बाबतींत विरोध उत्पन्न होण्याचा संभव आहे असें दिसून येईल. मग ज्या बँकांनीं ठेवींचा विमा उतरला असेल त्यांच्याविषयीं तर बोलावयासच नको. म्हणून बोर्डावरील सर्व सभासद सरकारनेंच नेमलेले असावे आणि अमेरिकेंतील कॉर्पोरेशनप्रमाणें त्यांची मुदत ५ ते ६ वर्षांची असावी.

### कॉर्पोरेशनच्या सदस्यत्वाची सक्ती

कॉर्पोरेशनचें सदस्यत्व सक्तीचें असावें कीं ऐच्छिक असावें ह्याबद्दल मतभेद असणें शक्य आहे. अमेरिकेंत ज्या बँका फेडरल सिस्टिमच्या सभासद असतात त्या कॉर्पोरेशनच्या सभासद आपोआपच होतात. त्यांना सभासदत्वाचा अर्जसुद्धा करावा लागत नाहीं. ज्या बँका फेडरल रिझर्व्हच्या सभासद नसतात त्यांना मात्र अर्ज करावा लागतो. हीच पद्धत हिंदुस्थानांत अंमलांत आणण्यास कांहीं हरकत नाहीं. सर्व शेड्यूल्ड बँकांना कायद्यानेंच ठेवींच्या विमायोजनेचे सभासद होण्यास लावावें. त्यांना रिझर्व्ह बँकेकडून मोबदल्यांत सवलती मिळत असतात. स्टेट बँक ऑफ इंडिआ व तिच्या उपसंस्था ह्यांना निराळ्या वर्गांत बसवून योजनेच्या बाहेर राहण्याची परवानगी देण्यांत यावी असें म्हणतां येईल. केवळ बँकिंगच्या व्यवसायाच्या दृष्टीनें पाहिलें तर स्टेट बँक व तिच्या उपसंस्था ह्यांच्यांत ठेवलेल्या ठेवी, इतर मोठ्या बँकांतील ठेवींपेक्षा अधिक सुरक्षित असतात असें मानण्याचें कारण नाहीं. त्यांची सार्वजनिक मालकी ही त्यांना योजनेच्या बाहेर राहण्याची परवानगी देण्यास पुरेसें कारण होऊं शकत नाहीं. स्टेट बँक व तिच्या उपसंस्था ह्या योजनेच्या बाहेर राहिल्या तर त्यांना एक फायदा मात्र जरूर मिळेल. ठेवींच्या विम्याकरतां इतर बँकांना जे हप्ते द्यावे लागतील ते स्टेट बँकेला द्यावे लागणार नाहींत. इतर बँकांना हा बोजा सहन करावा लागेल. १९५७ च्या अखेरीस अमेरिकेंतील ज्या बँकांनीं ठेवींचा विमा उतरला होता अशा बँकांची संख्या १३,४०४ पर्यंत वाढली होती. अमेरिकेंतील एकूण बँकांच्या ९५ टक्के एवढें हें प्रमाण आहे. विमा उतरलेल्या बँकांतून एकूण ठेवी २२६ अब्ज डॉलर्सच्या होत्या. त्यांपैकीं १२५ अब्ज डॉलर्सच्या ठेवी विम्यानें संरक्षित अशा होत्या. बँकांतील खात्यांपैकीं ९८ टक्के खात्यांत १० हजार डॉलर्सपेक्षा कमी रकमा होत्या. त्या सर्व रकमा संरक्षित अशा होत्या.

### विम्याचा हप्ता किती असावा ?

अमेरिकेंतील कॉर्पोरेशनचे विम्याचे हप्ते ठरवितांना एकूण ठेवी + ट्रस्टफंड – वटविण्यासाठी आलेले चेक्स ह्या हिशेबानें होणाऱ्या रकमेचा विचार करण्यांत आला व ह्या रकमेवर १ टक्क्याच्या एकबारांश ह्या दरानें हप्ते ठरविण्यांत आले. १८६३ ते १९३३ ह्या कालांतील आर्थिक अरिष्टांचीं वर्षें सोडून इतर वर्षांत ज्या बँका बंद करण्यांत आल्या त्यांच्या ठेवीदारांना आलेल्या नुकसानीचा विचार हप्ते ठरवितांना करण्यांत आला होता. विम्याच्या निधीमध्यें जसजशी वाढ होत गेली तसतसे विम्याचे दरहि हळूहळू कमी करण्यांत आले. विमा उतरलेल्या बँकांना हप्त्यापोटीं जमा झालेल्या रकमेपैकी ६० टक्के रक्कम परत देऊन हें करण्यांत आलें. भारतांत बँका बंद पडल्यामुळें ठेवीदारांना

आलेल्या नुकसानीसंबंधीं दीर्घकालावधीत पसरलेले आंकडे सहज मिळण्यासारखे नाहींत. त्यामुळें गणितीपद्धतीनें विम्याचे हप्ते ठरवितां येण्यासारखे नाहींत. तथापि इंडिअन बँक्स असोसिएशननें १ टक्क्याच्या एकसोळांश इतका दर पुरेसा होईल असें सुचविलें आहे. अमेरिकेंत प्रत्येक ठेवीदारामागें १० हजार डॉलर्स-पर्यंतच ठेवींचा विमा स्वीकारला जातो. पण हप्ते मात्र विमा उतरणाऱ्या बँकांच्या एकूण ठेवींच्या रकमेचा विचार करून ठरविले जातात.

### मोठ्या व लहान बँका

भारतांत ज्या ठेवींचा प्रत्यक्ष विमा उतरला असेल त्यांच्या एकूण रकमेचाच विचार विम्याचे दर ठरवितांना करण्यांत यावा; बँकांच्या एकूण ठेवींवर तो ठरविण्यांत येऊं नये; कारण असें केल्यानें अधिक खातीं असलेल्या मोठ्या बँकांवर हप्त्यांचा अधिक बोजा पडेल असें सुचविण्यांत आलें आहे. मोठ्या बँकांना कॉर्पोरेशनकडून मिळणाऱ्या विम्यासेरीज इतर एका प्रकारचें संरक्षण मिळत असतें. कोठल्याहि मोठ्या बँकेला अतिशय अडचणीच्या परिस्थितीला तोंड घावयास लावणें हें कोठल्याहि देशाच्या सरकारला परवडण्यासारखें नसतें. एखादी मोठी बँक बंद पडली तर देशाच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचे फार वाईट परिणाम होतात. अशा बँका अडचणींत सांपडल्या तर सरकार त्यांच्या मदतीला धावून येतेंच येतें. मग असें करतांना बँकांनीं तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या पलीकडे जावें लागलें तरी सरकार तसें करतें. आतां ह्या प्रकारच्या संरक्षणासाठी मोठ्या बँकांना कांहीं हप्ते द्यावे लागत नाहींत. म्हणून मोठ्या बँकांकडून घेण्यांत येणाऱ्या हप्त्यांत कपात करावी हें म्हणणें न्यायाचें होणार नाहीं.

### एक्स्चेंज बँकांचा प्रश्न

अमेरिकेंत धंदा करणाऱ्या ज्या परदेशांच्या बँका आहेत त्यांच्याकडे असणाऱ्या ठेवींचा विमा कॉर्पोरेशन घेत नाहीं. परदेशीय बँकांना लोकांकडून ठेवी घेण्याची परवानगी नाहीं. फक्त कांहीं विशिष्ट प्रकारच्या ठेवी कांहीं अटींवर त्यांना घेतां येतात. ह्या बँका फक्त परदेशीय हुंडणावळीचाच धंदा करतात. अमेरिके-मधील द्रव्यविषयक व्यवहारांत त्यांचें स्थान अगदींच गौण आहे. भारतांत स्थापन करावयाच्या ठेवींच्या विमासंस्थेनें परदेशीय बँकांना विम्याचें संरक्षण देऊं नये असें इंडिअन बँक्स असोसिएशननेंहि सुचविलें आहे. पण असें करणें बरोबर होणार नाहीं. भारतांत ज्या एक्स्चेंज बँका धंदा करीत आहेत, त्या अलीकडे आपल्याजवळील पैशाचा उपयोग करण्यासाठी देशांतर्गत कर्जे अधिकाधिक प्रमाणांत देऊं लागल्या आहेत. त्यांना ठेवींच्या विमायोजनेंतून वगळण्यांत आलें तर त्यांच्याकडील कांहीं ठेवी कमी होतील व त्या ठेवी विमा उतरणाऱ्या बँकांकडे ठेवल्या जातील. पण उलटपक्षीं ठेवींचा विमा उतरण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या विम्याच्या हप्त्यांचा बोजाहि त्यांच्यावर पडणार नाहीं, व हा बोजा अधिक प्रमाणांत हिंदी बँकांवर पडेल. तेव्हां एक्सचेंज बँकांना विमायोजनेंतून वगळण्याची सूचना हिंदी बँकांच्या हिताच्या दृष्टीनेंसुद्धां योग्य ठरणार नाहीं.

### एकत्रीकरणाची सोय

ज्या बँका अडचणींत सांपडल्या असतील त्यांचें अधिक बळकट बँकांशीं एकत्रीकरण करतां यावें म्हणून मालमत्तेच्या तारणावर कर्ज देण्याचे व तीं विकत घेण्याचे अधिकार अमेरिकेच्या डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनला आहेत. बँकांचें स्थैर्य राखण्या-साठी रिझर्व्ह बँकेला जे अधिकार देण्यांत आले आहेत त्यांत बँकांच्या अस्थैर्याला कारणीभूत होणाऱ्या एका कारणाशीं मुकाबला करण्याचे प्रत्यक्ष अधिकार नाहींत. ठेवीदारांतील घबराट हें तें कारण होय. ठेवीदारांनीं धावरून एकदम पैसे काढून घेण्याची घाई केल्यामुळें ज्या बँकांचें दिवाळें निघतें, अशा बँकांवरील आपत्ति ठेवींच्या विमा योजनेमुळें टाळतां येईल. बंद झालेली बँक पुन्हा चालू करण्यासाठी तिला कर्ज देण्याचे, किंवा विमा उतरलेल्या बँकांना कर्ज देण्याचे किंवा त्यांची मालमत्ता विकत घेण्याचे अधिकार अमेरिकेच्या कॉर्पोरेशनला आहेत. मध्यवर्ती बँकिंग संस्थां-पेक्षा कॉर्पोरेशनला असलेले अधिकार बरेच व्यापक आहेत. शिवाय कॉर्पोरेशन बँकिंगच्या संस्थेवरील बंधनापासूनहि मुक्त असते. बँकांचें एकीकरण करण्याच्या कामांत कांहीं वेळां रिझर्व्ह बँकेनें पुढाकार घेतलेला आहे. पण, अशीं उदाहरणें फार थोडीं आहेत. बँकांचें दिवाळें काढण्याची पाळी आल्यास रिझर्व्ह बँकेबरोबरच स्टेट-बँकेलाहि ह्या कारभारांत भाग घेतां यावा म्हणून बँकिंग कंपनीज ॲक्टमध्यें दुरुस्त्या सुचविण्यांत आल्या आहेत. पण खरा प्रश्न बँकांचीं दिवाळीं निघण्याचें कसें थांबेल, हा आहे. १९३४ ते १९५७ ह्या कालांत अमेरिकेंत २५१ बँका रिसीव्हरच्या ताब्यांत देण्यांत आल्या आणि डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशननें ९·५३ कोटी डॉलरचे क्लेम दिले. ह्याच काळांत कॉर्पोरेशननें १८१ बँकांना कर्जे दिलीं अगर त्यांची मालमत्ता विकत घेतली. ह्या बँका फार अडचणींत होत्या. पण कॉर्पोरेशननें त्यांना दिलेल्या मदतीमुळें त्यांच्याकडील ठेवी विमा उतरलेल्या बँकांत समाविष्ट करणें सोयीस्कर रीतीनें शक्य झालें. ह्या कामासाठी कॉर्पोरेशनला १९·७८ कोटी डॉलर्स लागले. देशाच्या मध्यवर्ती बँकेपेक्षा डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशन बँकांच्या एकत्रीकरणाचें कार्य अधिक नेटानें करूं शकतें हें ह्यावरून दिसून येतें.

### सरकारची मदत

ज्या २५१ बँकांच्या बाबतींत कॉर्पोरेशनला जबाबदारी स्वीकारावी लागली त्यांच्यापुरतें बोलावयाचें झाल्यास कॉर्पोरेशननें ठेवींपैकी ८९ टक्के ठेवी परत केल्या. ह्यावरून कॉर्पोरेशननें केलेल्या कामाची कल्पना येईल. आणखी १० टक्के ठेवी देण्या-घेण्याची वजावट करून देण्यांत आल्या. फक्त १ टक्के ठेवी परत केल्या गेल्या नाहींत. ठेवी परत करण्याच्या १८१ प्रकरणांत ठेवीदारांना ठेवी संपूर्णपणें परत करण्यांत आल्या. त्यासाठी कॉर्पोरेशनला १९·७८ कोटी डॉलर्स द्यावे लागले व १·३ कोटी डॉलर्स नुकसान सोसावें लागलें. पण हा तोटा वसूल करतां येण्यासारखा होता. कॉर्पोरेशननें लक्षांत ठेवण्यासारखी कामगिरी केली असली तरी आपल्या १९५७ च्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, बँकांचें स्थैर्य राखण्यांत मध्यवर्ती सरकारकडून मिळालेली मदत दुर्लक्ष करण्यासारखी नाहीं. १९३४ ते १९५० ह्या कालांत अमेरिकन सरकारच्या मध्यवर्ती द्रव्यविषयक संस्थांकडून अडचणींत आलेल्या बँकांना मदत करण्यासाठी २ अब्ज डॉलर्स देण्यांत आले. ज्या देशांत खाजगी मालकीला पूर्ण वाव आहे त्या देशांत बँकिंगचा धंदा सुस्थिर राखण्यासाठी मध्यवर्ती सरकारी संस्थांना २ अब्ज डॉलर्स द्यावे लागतात ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. म्हणून भारतांत डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा उपक्रम करणें हें देशांत अतिशय बळकट अशी बँकिंगची पद्धत उभार-ण्याच्या कामांतील पहिलें पाऊल आहे. हें पाऊल जितकें लवकर टाकलें जाईल तितकें हवें आहे.

# धार्मिक व नैतिक कल्पनांचें शुद्धीकरण

## वैयक्तिक ध्येयापेक्षां सामुदायिक ध्येयाचें महत्त्व

[ लेखक : शं. वा. किर्लोस्कर ]

कांहीं व्यक्ति जन्मानें महाराष्ट्रीय असल्या तरी त्यांच्या आयुष्यांतील बराच काळ दुसऱ्या प्रांतांत गेल्यानें त्यांच्या कार्याची अथवा विचारांची महाराष्ट्रास व्हावी तशी ओळख होऊं शकत नाहीं. त्यामुळें अशा आपल्याच माणसाची केव्हां केव्हां दुसऱ्यानें परिचय करून देण्याची पाळी येते. "विवेक व साधना" या पुस्तकाचे लेखक श्री. केदारनाथजी यांच्या बाबतींत असा प्रकार झाला आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

केदारनाथ यांचें मूळ नांव अप्पाजी बळवंत कुलकर्णी. कुलाबा जिल्ह्यांतील पाली या गांवीं त्यांचा जन्म १८८३ सालीं झाला. गृहस्थिति मध्यम. वयाच्या दहाव्या वर्षी ते पुण्यास राहावयास आले व तेथेंच त्यांच्या शिक्षणास सुरुवात झाली. पुढें वडिलांची बदली खानदेशांत झाल्यानें शिरपूर व धुळें येथेंहि त्यांचें कांहीं शिक्षण झालें. पण वयाच्या १७ व्या वर्षी इंग्रजी ५ वींत असतांना शिक्षणाला रामराम ठोकून ते देशकार्याकडे वळले.

त्या वेळीं देशांतील तरुणांच्या मनांत इंग्रजांविरुद्ध असंतोषाचें वारें जोरानें वाहूं लागलें होतें. गुलामगिरीमुळें देशावर ओढवणारी दुर्दशा व परकी सत्तेचा जुलूम त्यांना सहन करणें अशक्य होत चाललें. याच धामधुमींत रँड व आयर्स्ट या गोऱ्या अधिकाऱ्यांचे खून पडले. अप्पाजींनीं शाळा सोडण्याचें हेंच कारण.

त्यांनीं स्वदेशीचें व्रत घेतलें व तें व्रत इतरांस देण्यास सुरुवात केली. तालीम करून शरीर बळकट केलें. शस्त्रास्त्रें वापरण्याची विद्याहि त्यांनीं गुप्तपणें हस्तगत केली. शिवाजी महाराज, रामदास, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, अशा थोर पुरुषांच्या चरित्रांची त्यांना लहानपणापासून आवड. या चरित्रांपासून त्यांना फार मोठी स्फूर्ति मिळाली.

तथापि, आपलें उद्दिष्ट घराच्या आवारांत राहून सफल होणें कठीण असें दिसून येतांच ते वडिलांस न विचारतां १९०४ सालीं घराबाहेर पडले. दीडशें मैल पायीं प्रवास करून त्यांनीं सज्जनगड गांठला व ते साधुवेषानें राहूं लागले. या परिभ्रमणांत त्यांना हें विचारांतीं कळून आलें कीं, बॉम्ब-पिस्तुलासारख्या साधनांनीं देशाला स्वातंत्र्य मिळविणें शक्य नाहीं. त्यापेक्षा स्वतःची मानसिक शक्ति वाढविल्यानें आपल्या प्रयत्नांना यश येण्याची आशा अधिक. हें ओळखून ते त्या उद्योगाला लागले. तेवढ्यासाठी २-३ वेळां हृषिकेशच्या बाजूला जाऊन गंगोत्री, जमनोत्री, बद्रीनारायणपर्यंतचा त्यांनीं प्रवास केला. अशा प्रकारें त्यांनीं अध्यात्मशास्त्रांत पुष्कळ वरची पायरी गांठली. तथापि त्यांनीं अशीं १० वर्षे अत्यंत व्याकुळतेनें काढलीं, तरी त्यांच्या मनाचें खरें समाधान होईना. आपल्या देशाच्या विमोचनासाठी कोणता उपाय परिणामकारक ठरेल हें त्यांच्या लक्ष्यांत येईना.

त्यांच्या दृष्टोत्पत्तीस हें आलें कीं, ज्याला कांहीं जण ईश्वराचा साक्षात्कार म्हणतात, तो माणसानेंच स्वतःच्या कल्पनेनें निर्माण केलेला आभास असतो. किंबहुना जगाला व्यापून टाकणाऱ्या तत्त्वाचाच आपण एक अंश असल्यानें, अथवा तीच शक्ति आपण असल्यानें, आपलें आपल्यास दर्शन होणें शक्य नाहीं.

यापेक्षा त्यांना जेव्हां हें दिसून आलें कीं, कांहीं व्यक्ति आपणच ईश्वर आहों असा बहाणा करून जनतेच्या अंधश्रद्धेचा फायदा घेतात, तेव्हां त्यांस फारच वाईट वाटलें. इतकेंच नव्हे तर जेव्हां त्यांना पुढें असाहि शोध लागला कीं, आपल्या सर्व धार्मिक कल्पनांचा रोख केवळ स्वार्थ साधण्याकडेच आहे, तेव्हां ते फारच बुचकळ्यांत पडले. माणसांनीं सारी धडपड कशासाठी करावयाची? तर जन्ममरणाच्या फेऱ्यांतून बाहेर पडून स्वतःला मोक्ष मिळविण्यासाठी! एवंच, संसारांत गुरफटून जाणारा काय अथवा परमार्थाच्या मार्गे लागणारा काय, स्वार्थापलीकडे कुणाचीहि दृष्टि नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें.

अशा प्रकारें शोधक व चिकित्सक दृष्टीनें आपल्या जीवनाचा अभ्यास त्यांनीं एकदां सुरू केल्यावर समाजाच्या उत्कर्षासाठी वैयक्तिक ध्येयापेक्षा सामुदायिक ध्येयाचें महत्त्व व आवश्यकता किती आहे, हें त्यांच्या स्पष्ट लक्षांत आलें. मनुष्याचा मनःसामर्थ्याचा प्रभाव किती अफाट आहे हेंहि त्यांनीं आकलन केलें. त्यामुळें त्यांच्या मनांत उठलेल्या सर्व शंकांचें समाधान होऊन, मानवी जीवन यशस्वी व समाधानपूर्ण करण्याची एक गुरुकिल्लीच हस्तगत झाल्याचें त्यांच्या प्रत्ययास आलें. कुठल्याहि समाजाची असो अथवा देशाची असो, खरी प्रगति व उत्कर्ष घडवून आणावयाचा असेल, तर अगोदर त्याच्या विचारांत क्रांति घडवून त्याला ढोळस बनविलें पाहिजे ही त्यांची खात्री झाली.

अप्पाजींनीं हें तत्त्वज्ञान केवळ स्वतःपुरतेंच न वापरतां तें त्याच्या प्रसाराच्या प्रयत्नाला लागले; तेव्हांपासून त्यांचें हेंच कार्य अव्याहत चालूं आहे. त्यांचें वास्तव्य गेलीं अनेक वर्षे गुजरातेंत झाल्यानें त्यांचीं बहुतेक प्रवचनें गुजरातीमधूनच होत. केदारनाथ हें नांव त्यांनीं तिकडेच धारण केलें. त्यांच्या थोर समाजसेवेमुळें गुर्जर देशांत त्यांनीं फार प्रेमाचें व आदराचें स्थान संपादन केलें आहे.

"विवेक व साधना" हें केदारनाथजींनीं लिहिलेल्या गुजराती पुस्तकाचें मराठी रूपांतर असलें, तरी त्याला भाषांतराचा मुळींच वास येत नाहीं.

सध्यां साऱ्या जगांत मोठमोठीं स्थित्यंतरें फार झपाट्यानें घडून येत आहेत. अनेक जुनीं तत्त्वें व कल्पना ढासळून जमीनदोस्त होत आहेत. अखिल मानवजातीच्या जीवनाचा जुना साचाच बदलण्याची पाळी आल्याचीं हीं चिन्हें. अशा वेळीं नवीन समाजवादी व समतेवर आधारलेल्या समाजाला अनुसरून आपल्या धार्मिक व नैतिक कल्पनांचें शुद्धीकरण करणें आपल्यास क्रमप्राप्त आहे. जुनीं मूल्यें व जुन्या निष्ठा बदलण्याची वेळ आल्यावर त्यांना बाजूला केलें पाहिजेच; पण तेवढ्यानें कार्य संपत नाहीं. तर त्यांच्या ठिकाणीं नव्या मूल्यांची व निष्ठांची स्थापना केली पाहिजे. नाहींपेक्षा त्यांच्या अभावीं मानवी जीवनांत एक अनिष्ट व घातुक पोकळी निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीं.

"विवेक व साधना" या पुस्तकांतील विचार कोणा नवमतवादी तरुणाचे नसून, एका ८० वर्षांच्या जुन्या परंपरेंत वाढलेल्या व पूर्वीच्या पारमार्थिक मार्गाचा भरपूर अनुभव घेतलेल्या एका व्यक्तीचे आहेत हें समजल्यावर जुन्या मंडळीकडूनहि त्यांचें योग्य

स्वागत होईल अशी आशा आहे. तरुण पिढीनें तर हा ग्रंथ अवश्य वाचण्यासारखा आहे. त्यांच्या विचारांना तर तो योग्य वळण लावीलच, पण त्यांचें मानसिक सामर्थ्य वाढविण्यासहि तो साह्य करील.

या पुस्तकाचें वैशिष्ट्य व महत्त्व लक्षांत येण्यासाठी पुढील उतारे उपयुक्त ठरतील.—

"आपली शारीरिक शक्ति जशी मनुष्य कांहीं योग्य प्रमाणांत वाढवूं शकतो, त्याचप्रमाणें योग्य प्रयत्नानें मानसिक शक्तीहि वाढवूं शकतो. त्या शक्तीचे कार्यकारणभाव गूढ व सूक्ष्म असल्यानें आपण तिला दैवी शक्ति म्हणतों. परंतु सूक्ष्म विचार करतां तसें म्हणण्याचें कारण नाहीं. अथवा ज्यांच्यांत ती शक्ति आहे, त्याला दैवी पुरुष अथवा ईश्वर मानण्याचीहि जरूर नाहीं. केवळ तात्त्विक दृष्टीनें विचार करतां, कोणती शक्ति अथवा क्रिया ईश्वरी नाहीं? एकाच चिच्छक्तींतून विश्वशक्तींतून दृश्य-अदृश्य पसारा निर्माण होऊन त्याचा कारभार चालला आहे."

* * *

"परलोकाच्या काल्पनिक सुखापेक्षा इहलोकाच्या कर्तव्याला व त्यापासून मिळणाऱ्या सात्त्विक आनंदाला आपण आतां अधिक महत्त्व दिलें पाहिजे. व्यक्तिगत सुखाला किंवा श्रेष्ठतेला महत्त्व न देतां व्यापक रीतीनें जीवनाविषयीं विचार करायला आपण शिकलों ......... समुदायाविषयीं आपलेपणा वाटण्याइतकी विशालता आपल्या हृदयांत प्रकट झाली ...... तर जीवनविषयक सारे क्षुद्र आदर्श आपल्या जीवनांतून मावळून जातील."

* * *

"प्रत्येक काळाला योग्य अशी ईश्वरविषयक कल्पना त्या त्या काळांत माणसाला लाभली, तर मानवजातींतील किती तरी अनर्थ टळतील. परंतु मानवजातीच्या दुर्भाग्यामुळें ही गोष्ट अजून आपल्या लक्षांत येत नाहीं. आजच्या काळांतहि कोणी पांच हजार, तर कोणी दोन हजार वर्षांपूर्वीच्या, कोणी एक हजार, तर कोणी पांचशें किंवा शंभर वर्षांपूर्वीच्या ईश्वरविषयक कल्पनांना व त्याभोवतीं रचलेल्या धर्मकल्पनांना घट्ट धरून बसलों आहों. मानवजातीचें कल्याण कशांत आहे याचा विचार न करतां जुन्याच कल्पनांत दिव्यता मानण्याचा आपणां सर्वांचा स्वभाव आहे. पूर्वी अनेक वेळां जर ईश्वरविषयक कल्पना बदलल्या व प्रत्येक वेळीं त्यापासून आपलें कल्याण होत आलें तर आजहि पूर्वीच्या बदलून नव्या धारण करण्यास काय हरकत आहे."

* * *

"सुंदर मानवी शरीराइतकी दुसरी सुंदर जिवंत वस्तु व निर्दोष मानवी मनाइतकी पवित्र सचेतन वस्तूहि जगांत दुसरी मिळणार नाही, हें जाणून त्या बाबतींत आपण प्रयत्नशील राहिलें पाहिजे. आज आपण सौंदर्याचे खरे उपासक नाहीं. बाहेरून रंग लावून सौंदर्याचीं सोंगें आणीत असतों. आपल्या शरीरांत भरपूर रक्त नाहीं, अंगांत बळ नाहीं, स्फूर्ति नाहीं, तेव्हां सौंदर्य कोठून दिसणार? आपण आपलें व आपल्या मुलामुलींचीं शरीरें सुदृढ, निरोगी, चपळ व कार्यक्षम बनविण्याचा प्रयत्न केला व त्याबरोबर आपलीं मनें शुद्ध, स्थिर, स्वाधीन, प्रसन्न व आनंदी राखण्याचें आपल्याकडून साधलें, तर सौंदर्याबरोबर मानवतेचीहि उपासना आपल्याकडूनं घडत राहील."

* * *

"विवेक आणि साधना" या ३८७ पानांच्या ग्रंथांत सुमारें ५० विषयावर केदारनाथजींनीं आपले वरील नमुन्याचे विचार सोप्या व रसाळ भाषेंत पुढे मांडले आहेत. वाचकाच्या विचारशक्तीला चालना देऊन त्याच्या बुद्धीचा विकास करण्यास व आज प्रत्येकाला आवश्यक असणाऱ्या मानवधर्माची ओळख करून देण्यास हें पुस्तक फार उपयोगी पडूं शकेल. किं. रु. ४. प्रकाशक : नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.

पुण्यांतील प्राप्तिस्थान : श्री. कांतिलाल परीख, ३८७ रविवार पेठ.

फोन नं. ४१४८४

# माधवाश्रम प्रा. लि.

तार : माधवाश्रम बॉम्बे

भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.

तसेंच ● उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था. ● विवाह-कार्यांची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय. ● कुटुंबासह राहणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.

★ माधवाश्रम प्रा. लि., गिरगांव, मुंबई ४. ★

# शिवदर्शन लॉज

डेक्कन जिमखाना कॉर्नर, पुणें ४.

फोन नं. ७९८६

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत.

[२] सर्वांनीं वाखाणलेलें.

[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खालीं

[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच.

[५] स्वच्छता, टापटीप कटाक्षानें ठेवली जाते.

[६] हवेशीर खोल्या, व प्रत्येक खोलींत पंखा.

शिवाजीराव शिरोळे,
मॅनेजिंग पार्टनर

पत्रानें आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.

# सहकारी संस्था व त्यांचा नोकरवर्ग

## सेक्रेटरींच्या जिल्हानिहाय केडरची योजना

[ लेखक:–द. दि. चितळे ]

कोणत्याहि प्रकारची सेवा करणाऱ्या संस्थेकडून तिच्या सभासदांची तसेंच इतरांची होत असलेली सेवा ही सामान्यतः तिच्या नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेच्या प्रमाणावर अवलंबून असते असें दिसून येतें. सहकारी संस्थांच्या बाबतींत व विशेषतः खेड्यापाड्यांत काम करणाऱ्या प्राथमिक सहकारी संस्थांच्या बाबतींत तर, ही परिस्थिति आपणांस नेहमींच दिसून येते. प्राथमिक सहकारी पतपेढीची कार्यक्षमता तिच्या सेक्रेटरीच्या कार्यक्षमतेवर व त्याच्या हुशारीवर फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून असते. सबब अशा संस्थांकडून खेडुतांची सेवा योग्य प्रकारें व्हावी असें वाटत असेल तर त्यांना योग्य व लायक सेक्रेटरी सातत्यानें मिळत राहील अशी व्यवस्था होणें फार जरूर आहे. प्राथमिक संस्था आपली कामगिरी योग्य प्रकारें व आपली जबाबदारी ओळखून पार पाडीत असतील तरच त्यांचा उपयोग होऊन त्यांच्या सभासदांची व इतर घटकांची त्यांचेकडून योग्य प्रकारें सेवा घडूं शकेल व मग त्यांची अपेक्षित आर्थिक व सामाजिक सुधारणा होऊं शकेल हें उघड आहे.

प्राथमिक संस्था आपल्या मध्यवर्ती संस्था तालुका पातळीवर, जिल्हा पातळीवर व राज्य पातळीवर जरुरीप्रमाणें स्थापन करीत असतात. या मध्यवर्ती संस्थांचा कारभार पाहणाऱ्या मंडळावर अर्थातच प्राथमिक संस्थांचे प्रतिनिधि बहुसंख्येनें असतात. हे प्रतिनिधि ज्या संस्थांच्या कार्यकर्त्यांमधून निवडले जातात ते कार्यकर्ते ज्या प्रमाणांत कार्यक्षम असतील त्या प्रमाणांतच या मध्यवर्ती संस्थांकडून केली जाणारी कामगिरी प्रभावी ठरणार हें उघड आहे. यावरून पायाभूत म्हणून ठरणाऱ्या प्राथमिक संस्था जितक्या प्रमाणांत कार्यक्षम असतील तितक्या प्रमाणांत त्या त्या प्रांतिक विभागांतील मध्यवर्ती संस्था कार्यक्षम ठरतात असें दिसून येतें. या प्राथमिक संस्थांची कार्यक्षमता त्यांच्या सेक्रेटरीच्या कार्यक्षमतेवर बऱ्याच मोठ्या प्रमाणांत अवलंबून असल्यानें ज्या भौगोलिक क्षेत्रांतील प्राथमिक संस्थांच्या सेक्रेटरीच्या हुद्यावर काम करणारे इसम योग्य व लायक असे सातत्यानें नेमले जाण्याची तजवीज अगर व्यवस्था निर्माण करण्यांत आलेली असेल तो भौगोलिक विभाग सहकारी चळवळीच्या दृष्टीनें अधिक प्रभावी व प्रगत झालेला दिसतो. अशा परिस्थितींत आपल्या विभागांतील अगर राज्यांतील सहकारी चळवळ विशेष प्रभावी व्हावी असें वाटत असेल तर तेथील प्राथमिक सहकारी संस्थांना लायक व योग्य असे सेक्रेटरी सातत्यानें कसे मिळत राहतील याची जरूर ती व्यवस्था तेथील सहकारी पुढाऱ्यांनीं व विचारवंतांनीं तसेंच तेथील सहकारी खात्यांतील अधिकाऱ्यांनीं करणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें.

आपला सेक्रेटरी कोण असावा तें ठरविण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य प्राथमिक सहकारी संस्थेच्या साधारण सभेस किंवा तिच्या कार्यकारी मंडळास हल्लीं आहे. त्यामुळें सेक्रेटरीच्या जागीं नेमला जाणारा इसम हा त्याच्या शैक्षणिक व इतर लायकीवरून नेमला न जातां तो इतर बाबींवरूनच पसंत केला जातो आणि नेमला जातो असें दिसून येतें. या कामीं वशिलेबाजीस बराच वाव मिळतो व तें स्वाभाविकहि आहे; परंतु त्याचा परिणाम संस्थेच्या कार्यक्षमतेवर घडून येतो व मग त्या संस्थेंत अनेक प्रकारचे घोटाळे किंवा अंतर्गत कलह निर्माण होतात असें दिसून येतें. या व्यवस्थेंत कांहीं फेरफार करणें जरूर आहे किंवा कसें याकडे निदान आपल्या राज्यांत तरी सहकारी पुढाऱ्यांचें थोडेंफार लक्ष लागलें आहे असें दिसून येतें.

कोणत्याहि संस्थेस योग्य व लायक असाच नोकरवर्ग सातत्यानें मिळावा असें वाटत असेल तर नेमल्या जाणाऱ्या इसमास आपल्या नोकरीची शाश्वतता व योग्य तें किमान वेतन व मग पुढें योग्य ती बढती मिळण्याची पुष्कळ अंशीं खात्री वाटेल अशी परिस्थिति असली पाहिजे. त्याची नोकरी चालू ठेवणें हें सालोसाल बदलणाऱ्या कार्यकारी मंडळावर वेळोवेळीं निवडून येणाऱ्या भिन्न भिन्न पक्षांतील लोकांच्या लहरीवर अवलंबून राहणार असेल तर त्या सेक्रेटरीकडून निस्पृह अशी कामगिरी होईल अशी अपेक्षा न करणेंच बरें. कारण, त्याला आपलें काम करतांना तें बहुसंख्य पंचांना पसंत पडेल असेंच करीत राहणें भाग आहे; मग तें काम नियम व तत्त्व यास सोडून होत आहे याची त्यास जाणीव होत असली तरी देखील त्याकडे त्यास जाणूनबुजून दुर्लक्ष करणें क्रमप्राप्त आहे. सबब, हल्लींच्या परिस्थितींत कांहींतरी फेरफार करणें फार जरूर आहे असें आम्हांस वाटतें.

या कामीं आमची एक सूचना अशी आहे कीं, सहकारी पतपेढ्या व इतर प्राथमिक ग्रामीण संस्था यांचे सेक्रेटरी नेमण्याचा अधिकार त्या संस्थांच्या साधारण सभा किंवा कार्यकारी मंडळ यांचेकडे न ठेवतां तो एका स्वतंत्र अशा नेमलेल्या (नॉमिनेटेड) समितीकडे कायदा अगर कानू अन्वयें सोंपविण्यांत यावा. या समितीनें जिल्ह्यांतील सर्व सेक्रेटरींचें एक केडर निर्माण करावें व त्या केडरमध्यें दाखल केल्या जाणाऱ्या इसमांमधूनच समितीनें आपल्या मर्जीप्रमाणें योग्य त्या त्या इसमांस वेगवेगळ्या संस्थांकडे सेक्रेटरीचें काम करण्यासाठी पाठवावें. केडरमध्यें दाखल केल्या जाणाऱ्या इसमांचा किमान शैक्षणिक दर्जा काय असावा, तें समितीनें ठरवावें. अशा दर्जाचे लोकांकडून वेळोवेळीं जरुरीप्रमाणें या समितीनें अर्ज मागवावेत व त्या अर्जदारांची तोंडी परीक्षा घेऊन त्यांतील लायक अशा व जरूर तितक्या इसमांची केडरमध्यें भरती करून घ्यावी. केडरमध्यें समाविष्ट करण्यांत आलेले सर्व लोक हे या समितीचे नोकर म्हणून समजले जावेत; त्यांना किमान वेतन किती द्यावें, त्यांच्या वेगवेगळ्या कोणत्या वेतनश्रेणी ठरवाव्या, वगैरे अधिकार या समितीस असावेत. तसेंच रजा, प्रॉव्हिडंट फंड, भत्ते, वगैरे ज्या सवलती सरकारी अगर तत्सम नोकरांना मिळतात त्या सर्व या केडरमधील इसमांना मिळाव्या. वेगवेगळ्या संस्थांकडे पाठविल्या जाणाऱ्या सर्व सेक्रेटरी व तत्सम नोकरांचा पगार, भत्ता, प्रॉव्हिडंट फंड वगैरेंची होणारी एकूण रक्कम जिल्ह्यांतील सर्व प्राथमिक सहकारी संस्थांकडून त्यांच्या खेळत्या भांडवलाच्या प्रमाणांत समितीनें वसूल करावी. असें केल्यानें या योजनेनुसार होणारा सर्व खर्च हा संबंधित सर्व संस्थांवर सम प्रमाणांत विभागला जाईल. या योजनेमुळें या सर्व संस्थांना लायक व योग्य असे नोकर सातत्यानें मिळून त्यांच्या नेमणुकीबाबत वशिलेबाजीस फारसा वाव राहणार नाहीं. या व्यवस्थेमुळें सहकारी संस्थांना आपापले सेक्रेटरी नेमण्याचें हल्लीं

असलेलें संपूर्ण स्वातंत्र्य कांहीं प्रमाणांत मर्यादित होईल अशी परिस्थिति असली तरी या कामासाठी नेमली जाणारी समिति ही वेगवेगळ्या सहकारी कार्यकर्त्यांचीच राहणार असल्यानें या योजनेमुळें लोकशाही तत्त्वास बाध येईल असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय सेक्रेटरींचें एक जिल्हानिहाय केडर करण्यांत यावें अशी मागणी आजवर अनेक परिषदांतून व विशेषतः सेक्रेटरींच्या परिषदांतून करण्यांत आलेली आहे. सबब आपल्या राज्यांतील सहकारी चळवळ अधिक प्रभावी व कार्यक्षम व्हावी यासाठी आमच्या वरील सूचनेचा महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं विचार करून ती, जरूर वाटत असतील त्या तपशिलांतील फेरफारांसह, शक्य तितक्या लवकर कार्यवाहींत आणावी अशी आमची त्यांस विनंती आहे.

वरीलप्रमाणें व्यवस्था प्राथमिक सहकारी संस्थांचे बाबतींत सुरू झाल्यावर तिचा काय अनुभव येतो तें पाहून मग त्याच धर्तीवर इतर सहकारी संस्थांच्या नोकरांची नेमणूक करण्याचे कामींहि व्यवस्था केली जावी अशी आमची सूचना आहे.


दातांच्या स्वच्छतेसाठी

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरेंटी' मुळें,

सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेलें पुण्यांतील अग्रेसर कापडदुकान

ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स

'होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी'

पेरूगेट रोड, पुणें २.

फोन नं. ७३१८

कोल्हापुरांतील एक अग्रगण्य अर्बन बँक

श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

[स्थापना सन १९३३] —:::— [फोन नं. २३७]

| | | | |
|---|---|---|---|
| सभासद संख्या | ३,५१२ | रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,४०,६५० |
| भाग भांडवल | रु. २,००,००० | ठेवी | रु. २१,३१,५०३ |
| वसूल भांडवल | रु. १,५४,९२० | खेळतें भांडवल | रु. २५,५६,७०४ |

★ बँक व्यापार व लहान उद्योगधंद्यांना अल्प व मध्यम मुदतीचीं कर्जें देते.

★★ शिवाजी उद्यमनगरमध्यें बँकेनें शाखा उघडली आहे.

कृ. स. आराध्ये
प्रेसिडेंट

# अमेरिकेंतील बँकिंगच्या धंद्यांतील बदल

## ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी सेवेची स्पर्धा

अमेरिकेच्या गुन्हेगारीच्या जगांत बँकांवरील दरोड्यांचें प्रमाण कांहीं कमी नाहीं. भरदिवसा पिस्तुलांच्या साह्यानें अगर रात्रीं स्फोटक द्रव्याच्या साह्यानें तिजोऱ्या फोडून गुन्हेगारांनीं अमेरिकन बँकांवर दरोडे घातलेले आहेत. अमेरिकेंतील बँकांवर घालण्यांत येणाऱ्या धाडशी दरोड्यांची अगर चोऱ्यांची संख्या वाढतच आहे. त्याचें एक कारण म्हणजे अमेरिकेंतील बँकांची वाढत चाललेली संख्या. पण, बँकांवर दरोडे घालून पैसे मिळविण्याचा हा मार्ग कांहीं सर्वांना साधणारा नाहीं. बँकांकडील पैशाची मागणी करणारा सामान्य नागरिक तरी त्या मार्गाचा अवलंब करूं शकत नाहीं. अशा सुसंस्कृत नागरिकाला बँकांजवळील पैसा सुलभ रीतीनें मिळावा म्हणून अमेरिकेंतील बँकांनीं अलीकडे एकमेकाशीं स्पर्धाच चालविली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रुकलिन मधील एका बँकेनें बाबा गाडी ढकलत नेणाऱ्या मातांना रोख पैसे मिळण्याची खास सोय केली आहे. रस्त्याच्या पदपथावर बँकेनें आपल्या खिडक्या उघडलेल्या आहेत. त्यामुळें मातांना अगदीं रस्त्यावर पैसे मिळूं शकतात. विमानतळावर अगर बंदरांच्या धक्क्यावर उतारूंना ताबडतोब रोख पैसे मिळण्याची व्यवस्था कांहीं बँकांनीं केली आहे. अमेरिकेंतील बँकिंगच्या व्यवसायांत अलीकडे जी विलक्षण क्रांति झाली आहे, तिच्यांतील किरकोळ वैशिष्ट्यें वरील सोयींत दिसून येतात. तथापि ह्या व्यवसायांतील बदलाचा खरा प्रभाव अमेरिकन बँकांच्या इमारतींच्या बाबतींत विशेष दिसून येतो. पूर्वी बँकांच्या इमारती संगमरवरी दगडाच्या, प्राचीन काळच्या इमारतीसारख्या असत. पण अलीकडे बांधण्यांत येणाऱ्या बँकांच्या इमारतींत कांच व धातु ह्यांचा अधिक वापर करण्यांत येतो. बँकांतील कौंटर्सची उंची कमी झालेली आहे; आणि गिऱ्हाइकांना दिसेल अशा रीतीनें पैशाचे अगर नोटांचे गठ्ठे ठेवण्याची पद्धतहि बंद झालेली आहे. बँकांचे अधिकारी, लोकांना सहज भेटूं शकतील अशा ठिकाणीं बसूं लागले आहेत.

### गिऱ्हाइकांकडे बघण्याचा दृष्टिकोण

पण, हा बदल वरवर दिसणारा असा आहे. अमेरिकन बँकिंगच्या स्वरूपांतच मूलभूत बदल झालेला आहे. एक काळ असा होता कीं, बँक हें पैसे ठेवण्याचें ठिकाण म्हणून ओळखलें जाई. पण आतां अमेरिकन बँका पैसे मिळण्याचें ठिकाण म्हणून मानल्या जाऊं लागल्या आहेत. आधुनिक अमेरिकन बँकर हा गिऱ्हाइकाकडून पैशाची मागणी येण्याची वाटच पाहात नाहीं. तो होऊनच गिऱ्हाइकांना पैसे देतो. कित्येक बँका तर ठेवीदारानें बँकेत पैसे ठेवण्याच्या आधीसुद्धा त्यानें चेक देण्यास उत्तेजन देतात. अधिक धंदा मिळावा म्हणून बँका आपल्या ग्राहकांना सकाळची कॉफी देतात, अगर दुपारचा चहा देतात. कधीं कधीं भेटीदाखल वस्तुहि देतात. एका काळीं अमेरिकन बँकर आपल्या गंभीर व भीतिप्रद चेहऱ्यामोहऱ्याचा अभिमान धरीत असे. त्याच्याभोंवतीं रागीट चेहऱ्यांच्या कॅशिअर्सचें कडें असे. कर्ज देणाऱ्या खात्यांतील लोक कर्ज मागणाऱ्या गिऱ्हाइकाकडे उपहासानें बघत असत. बँकरची मूठ घट्ट मिटलेली असे. मार्क ट्वेन ह्या सुप्रसिद्ध अमेरिकन ग्रंथकारानें आपल्या विनोदी शैलींत बँकरचें वर्णन असें केलेलें आहे. :—" चांगलें स्वच्छ ऊन पडलें असतांना जो मनुष्य आपली छत्री तुम्हांला देतो; पण पाऊस पडायला लागला रे लागला कीं जो ती परत मागून घेतो, तो बँकर." आज कित्येक अमेरिकन बँका आपल्या गिऱ्हाइकांना अगर जरूर पडल्यास एखाद्या वाटसरूलाहि पावसांत देतां याव्या म्हणून छत्र्यांचे साठे जवळ बाळगतात. बँकेचे अधिकारी आपण प्रेमळ व मोकळ्या मुठीचे आहों असें दाखविण्याचा प्रयत्न करतात. मिसिसिपी येथील एका बँकेनें आपल्या अधिकाऱ्यांना मर्तिकाला जाण्याचीसुद्धा परवानगी एकदा दिलेली आहे. मर्तिकाला पुरेशीं माणसें नसल्यानें ही ' सोय ' बँकेनें उपलब्ध करून दिली ! बँकेत येण्याचे वेळीं नोकरांचा नीटनेटका पोषाख असला पाहिजे अशी पूर्वी बँकांची अपेक्षा असे. पण आतां नोकर अधिक मोकळेपणानें बँकांत जाऊं शकतात. न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन सेव्हिंग्ज बँक नाताळाच्यावेळीं बर्फावरील घसरगुंडीचा खेळ मोफत दाखविते. नंतर ह्याच ठिकाणीं साफसफाई करून कुत्र्यांचें प्रदर्शन भरविण्यांत येतें. अधिक ग्राहक मिळविण्यासाठीच हें सर्व करण्यांत येतें. कांहीं बँका मुलांच्या सौंदर्यस्पर्धा भरवितात, तर कांहीं गुलाबांच्या फुलांचें प्रदर्शन भरवितात.

### बँकांचीं नवीं गिऱ्हाइकें

एकंदरीनें, बँक ह्या संस्थेंतील गंभीरपणाचें वातावरण जितकें कमी करतां येईल तितकें करण्याचा कल दिसून येतो. पुष्कळ बँकांत नाणीं मोजतांना येणारा आवाज ऐकूं येऊं नये म्हणून चिवचिवणारे पक्षी ठेवण्यांत येतात अगर ऑर्गन वाजविला जातो. नाताळाच्या सणांत एखादा बँकेचा अध्यक्ष स्वतःच सामुदायिक गायनाचें संचालन करतांनाहि दिसतो. कौंटर्सवर पुष्कळदा फुलांचे गुच्छ ठेवलेले आढळतात. बँकेतील रक्षक अजूनहि पिस्तुलें जवळ बाळगतात; पण ती सभ्य पोषाखांत दडवलेली असतात. असें असलें तरी अमेरिकन बँकर्सनीं तारतम्य सोडलें आहे असा मात्र अर्थ नाहीं. अधिक अनौपचारिक रीतीनें वागण्यास तशीं कारणें आहेत; त्यांना ' मोठ्या ' गिऱ्हाइकाशीं व्यवहार करावयाचा आहे. हें मोठें गिऱ्हाइक म्हणजे सामान्य अमेरिकन नागरिक. हा आतां पूर्वीपेक्षा पुष्कळ सधन झालेला आहे. त्याला दोन मोटारींची गरज वाटते. त्याला युरोपची सफर करावीशी वाटते. ह्यासाठी लागणारा पैसा तो बँकांकडून कर्जाऊ घेत आहे. अशा गिऱ्हाइकाशीं व्यवहार करण्यांत बँकांना धोका वाटत नाहीं. १७७५ पासून अमेरिकेंत बँकांकडून जितकीं कर्जें घेण्यांत आलीं त्याच्यापेक्षा अधिक कर्जें गेल्या १४ वर्षांत बँकांनीं दिलेलीं आहेत. ह्या काळांत धंदेवाईक कर्जें तिपटीपेक्षा अधिक वाढलीं आहेत तर व्यक्तिगत कर्जें ९ पट वाढलीं आहेत. घरें विकत घेण्यासाठी घेण्यांत येणारीं गहाणावरील कर्जें ५·५ पट वाढलीं आहेत.

### गिऱ्हाइकें मिळविण्यासाठी स्पर्धा

बँकिंगच्या धंद्यांत नवें युग सुरू होण्याचें दुसरें एक कारण म्हणजे स्पर्धा. बँकिंगचा धंदा तसा विलक्षण आहे. त्यामधील कच्चा माल म्हणजे पैसा; हा लोकांकडून ठेवींच्या स्वरूपांत मिळविला जातो, व तोच कच्चा माल लोकांना कर्जाच्या रूपानें पुरविला जातो. ह्या धंद्यांत अमेरिकेंत तीन प्रकारच्या संस्था आहेत. ( १ ) व्यापारी बँका; त्यांची संख्या सुमारें १३,५०० आहे. ( २ ) सेव्हिंग्ज बँका; त्यांची संख्या ५१८ असून त्या नफ्यासाठी चालविल्या जात नाहींत. त्यांची मालकी म्हणजे ठेवीदारांची संयुक्त मालकी होय.

(३) सेव्हिंग्ज व लोन असोसिएशन्स्; ह्यांची संख्या ६,२०० आहे. ह्यांहि संस्थांची मालकी ठेवीदारांची असते. १९३२ सालापासून त्या तिसऱ्या प्रकारच्या संस्थांची संख्या फार वाढली आहे व त्यांनीं व्यापारी बँकांचा बराच धंदा काबीज केला आहे. तिन्ही प्रकारच्या बँका एकमेकांशीं स्पर्धा करीत असतात व गिऱ्हाइकाला आपल्याकडे आकृष्ट करण्यासाठी नाना प्रकारच्या युक्त्या योजीत असतात. गेल्या १० वर्षांत व्यापारी बँकांच्या विकास-योजनांचें व जाहिरातींचें अंदाजपत्रक ३०० टक्क्यांनीं वाढलेलें आहे. ज्या काळांत पैसा दुर्मिळ झालेला आहे त्याच काळांत बँकांनीं कर्जे घेणारीं गिऱ्हाइकें मुद्दाम शोधावीं हें चमत्कारिक वाटतें. पण बँकांच्या दृष्टीनें तेंच बरोबर आहे. कारण पैसा दुर्मिळ असला कीं व्याजाचे दर वाढतात. ह्याचा अर्थ असा कीं, बँका ज्या वेळीं कर्जे देतात त्यावेळीं त्यांचें उत्पन्नहि वाढतें. शिवाय दुसरें असें कीं, बँकेचा आजचा ऋणको हा उद्यांचा ठेवीदारहि होण्याची शक्यता असते.

### मुलें व स्त्रिया ह्यांना आकर्षण

ठेवीदारांच्या सामान्य बाजारपेठेकडे तर बँका लक्ष पुरवितातच; पण, त्याशिवाय कांहीं विशिष्ट लक्ष्यावरहि आपले प्रयत्न केंद्रित करतात. डेनव्हर येथील एक बँक डावखोऱ्यांकरितां व आंधळ्यांकरितां ब्रेल लिपींतील, अशी दोन प्रकारचीं चेकबुकें पुरविते. कॅन्सास सिटी बँकेने बहिऱ्यामुक्यांची हस्तपल्लवी जाणणारा एक खास माणूस ठेवलेला आहे. फिलेडेल्फिया सेव्हिंग फंड सोसायटीनें अत्यंत आकर्षक अशी १३ निरनिराळ्या प्रकारचीं पासबुकें छापलीं आहेत. लग्नाकरतां, कॉलेजच्या शिक्षणाकरतां, नव्यानें जन्मास येणाऱ्या मुलांसाठी, मोटारीसाठी, अशी निरनिराळी खास बचत करण्याकरितां त्यांचा उपयोग करण्यांत येतो. अमेरिकेंतील बँका स्त्री-गिऱ्हाइकांकडे खास लक्ष पुरवितात. अमेरिकेंतील स्त्रियांजवळ स्वतःच्या मालकीचा असा बराच पैसा असतो; शिवाय कुटुंबाच्या खर्चावर तिचीच हुकमत असते. त्यामुळें कांहींहि करून स्त्रियांचा बँकेशीं संबंध आणण्याची स्पर्धा एकसारखी चालू असते. क्लीव्हलँड कॉंटिनेंटल बँक स्त्रियांच्या पोषाखाशीं जुळतील अशीं चार रंगांचीं चेकबुकें छापते. दुसऱ्या एका बँकेनें स्त्रियांसाठी खास वेगळा नोकरवर्ग नेमला आहे. शहराच्या अगर गांवाच्या एखाद्या भागांत नवीन कुटुंबें राहण्यास आलीं कीं, त्यांच्या याद्या हा नोकरवर्ग तयार करतो. मग कोणाला बाजार दाखव, कोणाला धर्मगुरूचें नांव पुरव, कोणाला मुलें संभाळण्यास माणूस दे, अशीं कामें हा नोकरवर्ग करतो; आणि मग संधि सांपडतांचे चटकन् बँकेंत खातें उघडण्याचा फॉर्म भरून घेण्यांत येतो. दुसरें एक लक्ष्य म्हणजे मुले. त्यांच्याजवळील चिल्लर बँकेंत ठेवण्यास त्यांना खास उत्तेजन देण्यांत येतें. मुलांची चिल्लर गोळा करणाऱ्या एका बँकेंत मुलांचीं १४ लाख खातीं आहेत. ही बँक दर आठवड्याला मुलांजवळील पैसे गोळा करण्याकरतां आपला प्रतिनिधि शाळांतून पाठविते. एखाद्या ठेवीदारानें बँकेंत खातें उघडलें म्हणजे बँकेकडून आपल्याला कांहीं लभ्यांश होईल अशी त्याची आशा असणें शक्य असते. पण, किरकोळ देणग्यांनीं त्याचें समाधान होत नाहीं. एका बँकेनें कांहीं वर्षांपूर्वी हॉलिवुडजवळ आपली एक शाखा उघडली. त्या प्रसंगीं बँकेनें, चिठ्ठ्या टाकून एक मोटार, एक रंगीत दूरदर्शकयंत्र व १२ नवीन रेडिओ सेटस् ह्यांची खैरात ठेवीदारांत केली. शिवाय त्यांना खाना दिला व नंतर मनोरंजक कार्यक्रम केले. आतां अमेरिकेंत ही साथ पसरत चालली आहे.


साखर ........ कांहीं ठळक विशेष

(१) —साखर— या शब्दाचा पहिला उल्लेख इ. स. पूर्वी तीनशें वर्षे सम्राट् अलेक्झांडर भारतांत आला, त्या वेळीं करण्यांत आला आहे.

(२) —साखर— हे प्रत्यक्ष सूर्याचेंच चूर्ण असल्यानें जगांतील कोणत्याहि वस्तूपेक्षां अधिक मौल्यवान् आहे, असे प्राचीन चीनचे राजे मानीत व मांडलिकांकडून साखरेच्या रूपांतच खंडणी घेत.

(३) —साखर— ही एक जीवनास अत्यावश्यक व आरोग्यदायी वस्तु आहे. साखरेचा खप स्वीडनमध्यें दर माणशीं सर्वांत अधिक आहे. तेथें दर माणशीं दर साल १२६ पौंड साखर खपते, ब्रिटनमध्यें ९४ पौंड खपते तर भारतांत दर माणशी सहा पौंड साखर खपते.

दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर

तर्फे प्रकाशित

या कारखान्यांतून उत्कृष्ट शुभ्र साखर, डिनेचर्ड स्पिरिट, फर्निचरसाठीं उपयुक्त फ्रेंच पॉलिश व ऑईल मिल्स विभागांतील येशेल तेलाचा पुरवठा नियमितपणें व मोठ्या प्रमाणावर केला जातो.

मॅनेजिंग एजंटस्,

दि युनायटेड एजन्सीज प्रायव्हेट लि., कोल्हापूर.

# भारतामधील वृत्तपत्रांची सद्यःस्थिति

## बोलक्या आंकड्यांतील प्रतिबिंब

भारतामधील पत्रव्यवसायाच्या दृष्टीनें गेलीं दहा वर्षे घडामोडींनीं भरलेलीं आहेत. वृत्तपत्रांच्या खपांत जी वाढ झालेली आहे त्यावरून ही गोष्ट लक्षांत येण्यासारखी आहे. ह्या कालखंडांत लोकांच्या राजकीय जाणिवेंत वाढ झाली. त्याचबरोबर देशांतील साक्षरतेचें प्रमाणहि वाढलें. ह्या दोन गोष्टींचा परिणाम म्हणून वृत्तपत्रांना येणाऱ्या मागणींत खूप मोठी वाढ होणें अपरिहार्यच होतें. १९५९ सालचा प्रेस रजिस्ट्रारचा अहवाल या दृष्टीनें पाहण्यासारखा आहे. अहवालांत वृत्तपत्र व्यवसायासंबंधीं भरपूर आंकडेवार माहिती देण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें भारतामधील ह्या व्यवसायाचीं प्रमुख वैशिष्ट्येंहि अहवालांत नमूद करण्यांत आलीं आहेत. लोकमताला वळण देण्याचें एक प्रमुख साधन म्हणून वृत्तपत्रांनीं केलेल्या कार्याचा आढावाहि घेण्यांत आला आहे. भारतांत साक्षरता जसजशी वाढत चालली आहे, तसतशी वृत्तपत्रें वाचण्याची सवयहि वाढत चालली आहे. त्यामुळें वाचकांच्या संख्येंत वाढ होत चालली असून त्या वाढीचा दाब वृत्तपत्रांवर वाढत चालला आहे. वृत्तपत्रांना येणाऱ्या मागणीच्या स्वरूपांतहि बदल होत चाललेला आहे.

### दैनिकांत इंग्रजी वृत्तपत्रांचें महत्त्व

प्रेस रजिस्ट्रारच्या अहवालाप्रमाणें भारतामधील पत्रव्यवसाय हा मुख्यतः विविधभाषी आहे. त्यांतहि हिंदी व इंग्रजी ह्या दोन भाषांतील वृत्तपत्रांचें व्यवसायावर अधिक वर्चस्व आहे. संख्या व खप ह्या दोन्ही दृष्टींनीं इंग्रजी वृत्तपत्रें अजूनहि मानाचें स्थान टिकवून आहेत. हिंदी वृत्तपत्रें इंग्रजी वृत्तपत्रांच्या पातळीपर्यंत पोंचण्याचा प्रयत्न सतत करीत आहेत. देशी भाषांमधून निघणाऱ्या महत्त्वाच्या वृत्तपत्रांत उर्दू, बंगाली, गुजराती, तामीळ व तेलगू ह्या भाषांत निघणारीं वृत्तपत्रें आहेत. इंग्रजी वृत्तपत्रांत दैनिकांना विशेष महत्त्वाचें स्थान आहे. इंग्रजी भाषेंतून निघणाऱ्या दैनिकांचा बुद्धिजीवी वर्गाच्या मनावर खूप मोठा परिणाम होतो असें समजलें जातें. ज्या वृत्तपत्रांचा खप ५०,००० पेक्षा अधिक आहे अशा महत्त्वाच्या दैनिकांचे, साप्ताहिकांचे व नियतकालिकांचे १९५८ व १९५९ मधील खपाचे तौलनिक आंकडे पुढें दिलेल्या कोष्टकांत दिले आहेत. वाढीची टक्केवारीहि दिलेली आहे. त्या आंकड्यांवरून असें दिसून येईल कीं, दैनिकांत निदान चार तरी दैनिकें अशीं आहेत कीं, त्यांचा प्रत्येकीं खप एक लाख प्रतींपेक्षा अधिक आहे. चारांपैकी तीन दैनिकें इंग्रजी आहेत. 'इंडिअन एक्सप्रेस,' 'टाइम्स ऑफ इंडिआ' व 'हिंदु' हीं तीं होत. अखिल भारतांत 'थंथी' ह्या तामीळ भाषेंतील दैनिकाचा खपाच्या दृष्टीनें तिसरा क्रमांक लागतो. 'नवभारत टाइम्स' हें हिंदी दैनिक दिल्ली व मुंबई येथून बेनेट कोलमन अँड कंपनीतर्फे प्रसिद्ध केलें जातें. त्याचा क्रमांक खपाच्या दृष्टीनें हिंदी दैनिकांत पहिला लागतो. अखिल भारतीय दृष्टीनें हाच क्रमांक १० वा लागतो. 'इंडिअन एक्सप्रेस' ह्या इंग्रजी दैनिकाचा रोजचा खप 'नवभारत टाइम्स' ह्या हिंदी दैनिकाच्या रोजच्या खपापेक्षा दुप्पट आहे. 'नवभारत टाइम्स'च्या खपाच्या वाढीचें प्रमाण 'इंडिअन एक्सप्रेस'च्या खपाच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा थोडें कमी आहे.

साप्ताहिकांत फक्त दोन साप्ताहिकांचा खप १,००,००० प्रतींपेक्षा अधिक आहे. हीं दोन्हीं साप्ताहिकें तामीळ भाषेंतील आहेत. इतर नियतकालिकांत त्रैमासिकें, पाक्षिकें आणि मासिकें ह्यांची गणना करतां येईल. अशा नियतकालिकांपैकी फक्त तीन नियतकालिकांचा खप एक लाख प्रतींच्यापेक्षा अधिक आहे. 'कुमुदम्' ह्या तामीळ भाषेंतील त्रैमासिकाचा खप सर्वांत अधिक म्हणजे १,६७,१३६ आहे. १९५८ च्या तुलनेनें १९५९ सालीं ह्या नियतकालिकाच्या खपांत एकदम खूप वाढ झालेली दिसते. त्याच्या खालोखाल खप असलेल्या 'कल्याण' ह्या हिंदी भाषेंतील व 'फिल्म फेअर' ह्या इंग्रजी भाषेंतील नियतकालिकाच्या खपांत १९५९ सालीं घट झालेली आहे. एकंदरीनें पाहतां सुमारें १२ वृत्तपत्रांचा व नियतकालिकांचा खप एक लाखापेक्षा अधिक आढळून येतो. इंग्रजी साप्ताहिकांपैकी 'इलस्ट्रेटेड वुइकली' ह्या साप्ताहिकाचा खप कमी झालेला असून 'ब्लिट्झ' व 'स्क्रीन' ह्यांचा मात्र वाढत आहे. गेल्या कांहीं वर्षांत वाचकांच्या अभिरुचींत पडलेल्या फरकाचें हें द्योतक आहे. हा फरक कां पडला, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

### बारा साक्षर माणसांगणिक एक दैनिक

एखाद्या विवक्षित दैनिकाच्या एकूण खपाचे आंकडे लक्षांत येण्यासारखे असले तरी सर्व भाषांतील मिळून दैनिकांच्या खपाचा एकूण आकडा फारसा चांगला ग्रह उत्पन्न करीत नाहीं. देशांतील साक्षर लोकांचें प्रमाण लक्षांत घेतलें तर हा आंकडा विशेषच बेताबाताचा वाटतो. १९५१ सालीं भारताच्या लोकसंख्येची शिरगणति करण्यांत आली होती. त्यावरून असें दिसतें कीं, देशांतील साक्षर लोकांची संख्या ६ कोटींच्या आसपास आहे. कोणतीहि एखादी प्रमुख भाषा लिहितां येणें अगर वाचतां येणें ही साक्षरतेची कसोटी धरण्यांत आली होती. ह्या ६ कोटी लोकसंख्येंत दैनिक वृत्तपत्रांचा एकूण खप ४७ लाख प्रती आहे. हा आंकडा कांहीं फार मोठा नाहीं. त्याचा अर्थ असा आहे कीं, भारतामधील १२ साक्षर माणसांमागें फक्त एक दैनिक पत्र प्रकाशित करण्यांत येतें. तथापि दैनिकांच्या कांहीं प्रती एकापेक्षा अधिक वाचकांकडून वाचल्या जातात ही गोष्ट येथें लक्षांत घेतलेली नाहीं. आणखी असें कीं, देशांत पुष्कळ लोक नुसतेच साक्षर असतात. त्यांना लिहितां अगर वाचतां येत नाहीं. तरी सुद्धां दुसऱ्याकडून वृत्तपत्र वाचवून घेणें त्यांना आवडतें. इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ओपिनिअन ह्या संस्थेनें ह्यासंबंधीं ग्रामीण भागांच्या पाहण्या केल्या होत्या. संस्थेच्या निरीक्षकांनीं सर्व देशभर जी माहिती गोळा केली, तीवरून दिसून आलें कीं, ज्या लोकांना वाचतां येत नाहीं अशा लोकांच्यापैकी पुष्कळांना बातम्या कळण्याची मात्र तीव्र इच्छा असते. ह्यावरून लोकांच्या मनापर्यंत पोंचणाऱ्या साधनांपुढील कार्य व त्याची व्याप्ति ह्यासंबंधीं चांगली कल्पना येते. मग हें साधन वृत्तपत्र असो अगर इतर कांहीं असो.

### ग्रामीण भागाचें वाढतें महत्त्व

ग्रामीण भागांतील वृत्तपत्राचा वाचक मोठा विचक्षण असतो असेंहि आढळून आलें आहे. वृत्तपत्रें वाचणाऱ्या लोकांपैकी सुमारें निम्मे लोक मिळणाऱ्या वृत्तांबद्दल समाधानी दिसले. पण, फक्त एक-तृतियांश वाचकच वृत्तपत्रांत आलेल्या सर्व बातम्यांवर विश्वास ठेवणारे आढळून आले. ग्रामीण भाग आतां पूर्वीसारखा मागासलेला राहिला नाहीं. त्यामुळें वृत्तपत्रांवरील जबाबदारी अधिकच वाढलेली

# दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लिमिटेड

१७९ ब, बुधवार पेठ, पुणें २.

फोन नं. ६७०१ स्थापना : १९४५

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१ श्री. गंगाधर शिवराम आडकर, वकील, चेअरमन
२ श्री. शंकर नारायण वैद्य, बी. ए., एलएल. बी., वकील.
३ श्री. महादेव बाळकृष्ण साळवेकर, व्यापारी
४ श्री. हरकचंद मोतीचंद वाफना, व्यापारी
५ श्री. काशिनाथ बाळकृष्ण साळवेकर.
६ श्री चिंतामण नारायण पटवर्धनकर.

**भांडवल**

अधिकृत : १ लक्ष रु. वसूल : ६५ हजार रु.
रिझर्व्ह फंडस : १६ हजार रु.
खेळतें भांडवल : ११,१५,००० रु. चे वर

अल्प व दीर्घ मुदतीच्या ठेवी, आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मा. का. साळवेकर,
मॅनेजर.



# रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक लि.

'गुरुकृपा', महात्मा गांधी रोड, रत्नागिरी.

स्थापना : १४ मे १९५७

चेअरमन :—श्री. बी. जी. खातु, बी. ए., एलएल. बी., चिपळूण.
व्हाईस चेअरमन :—श्री. एस. एल. पेजे, बी. ए., रत्नागिरी.

शाखा : सावंतवाडी, कुडाळ, दापोली.

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | | |
| भागीदारांतर्फे | रु. | १,७३,००० |
| सरकारतर्फे | रु. | १,००,००० |
| एकूण ठेवी | रु. | २९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ३५,००,००० चे वर |

[१] या बँकेंतील पैसा जिल्ह्यांतील सहकारी संस्था व शेतकरी वर्ग यांचे उपयोगासाठीच आणला जातो.
[२] बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

शर्तीसाठी चौकशी करा वा लिहा.

म. चिं. सांखळकर
मॅनेजर.



रजिस्टर्ड ट्रेड मार्क

सर्व सुगंधी कारखानदारांना लागणारा कच्चा माल, एसेन्शियल ऑइल्स, ॲरोमॅटिक केमिकल्स, रेझिनॉइड्स, इत्यादि हिंदुस्थानांत प्रथमच तयार करणारे कारखानदार

# एस. एच. केळकर आणि कं. प्रायव्हेट लि.

आमचे प्रख्यात व उच्च प्रतीचे 'नाग छाप' सुगंधी अर्क सौंदर्य-प्रसाधनांत सर्वत्र वापरले जातात.

पत्ताः— ३६ मंगळदास रोड, मुंबई नं. २



# सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्टयें —

★ हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
★ टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

आहे. सध्यां शहरांतील लोकांना रुचेल अशा रीतीनें वृत्तपत्रें काढण्यांत येतात. पण, 'त्यांत बदल केला गेला पाहिजे; वृत्तपत्रांतील भाषा अधिक सोपी करण्यांत आली पाहिजे; त्यामधील बातम्या व मतें खेडेगांवांतील लोकांनाहि समजलीं पाहिजेत. ग्रामीण भागांतील लोकांचें जीवन शेतीवर अवलंबून असतें. तेव्हां वृत्तपत्रांनीं शेतीच्या वृत्ताकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

### प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांना उज्ज्वल काळ

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पिढ्यांना हिंदींतून अगर त्यांच्या त्यांच्या प्रादेशिक भाषांतून शिक्षण मिळालेलें आहे. ह्या पिढ्या अजून आर्थिक दृष्ट्या परावलंबी आहेत. म्हणून त्यांच्या आवडीनिवडीचा परिणाम वृत्तपत्रांवर अद्याप झालेला नाहीं. पण, हळूहळू ह्या पिढ्यांच्या आवडी-निवडीकडे वृत्तपत्रांना लक्ष द्यावें लागेल. आणखी पांच-सात वर्षांच्या कालांत हजारों तरुण-तरुणी शाळा-कॉलेजांतून बाहेर पडतील. मग प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांची मागणी आणखीच वाढीला लागेल हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्या मानानें इंग्रजींतील वृत्तपत्रांची थोडीशी पिछेहाट होण्याचा संभव आहे. ह्याच कारणामुळें, बहुतेक दैनिक वृत्तपत्रें आजच आपल्या हिंदी आवृत्त्या प्रसिद्ध करीत आहेत. पुढें मागें इंग्रजी दैनिकांच्या खपांत घट होण्याचा संभव आहे. त्याचा धक्का कमी जाणवावा म्हणून हे प्रयत्न करण्यांत येत आहेत. इंग्रजी दैनिकांचा कमी झालेला खप हिंदी दैनिकें भरून काढतील अशी अपेक्षा ह्या प्रयत्नामागें आहे.

### दैनिकें

| वृत्तपत्राचें नांव | खप १९५८ | खप १९५९ | बदलाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) इंडिअन एक्सप्रेस (इंग्रजी) | १,६२,४९४ | १,७९,७६८ | +१०·६३ |
| (२) टाइम्स ऑफ इंडिआ (इंग्रजी) | १,२१,६६२ | १,३९,२६५ | +१४·४७ |
| (३) थंथी (तामीळ) | १,१७,५१५ | १,३१,०३४ | +११·५० |
| (४) हिंदू (इंग्रजी) | ८८,८८२ | १,१०,९७३ | +२४·८५ |
| (५) स्टेटसमन (इंग्रजी) | ९०,७८२ | ९७,५८९ | + ७५० |
| (६) फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी) | ८१,७०१ | ८७,९६२ | + ७·६६ |
| (७) अमृतबझार पत्रिका (इंग्रजी) | ७७,२६६ | ८६,७२१ | +१२·२४ |
| (८) आनंदबझार पत्रिका (बंगाली) | ७९,३९१ | ८४,०३५ | + ५·८५ |
| (९) युगांतर (बंगाली) | ७६,९१८ | ८०,४०१ | + ४·५३ |
| (१०) नवभारत टाइम्स (हिंदी) | ७२,६१५ | ७९,८९४ | +१०·०२ |
| (११) मलयला मनोरमा (मलायलम्) | ५७,१४४ | ७५,५४८ | +३२·०३ |
| (१२) लोकसत्ता (मराठी) | ६१,५७० | ७३,८२६ | +१९·९१ |
| (१३) हिंदुस्थान टाइम्स (इंग्रजी) | ६३,२३१ | ७०,५१९ | +११·६३ |
| (१४) मातृभूमि (मलायलम्) | ६३,७९४ | ६९,९५२ | +९·०५ |
| (१५) दिनमणी (तामीळ) | २८,२५८ | ६५,२२३ | +१३१·१७ |
| (१६) हिंदुस्थान (हिंदी) | ४७,९०२ | ५१,७८५ | + ८·११ |
| (१७) आंध्र प्रभा (तेलगू) | ५६,३६० | ३७,११० | −३४·१६ |
| (१८) सन्डे स्टँडर्ड (इंग्रजी, रविवारीं) | १,१८,४३३ | १,८२,९६५ | +५४ ४९ |
| (१९) भारत ज्योति (इंग्रजी, रविवारीं) | ५२,५८५ | ५४,६९७ | + ३·९४ |

### साताहिकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) आनंदविकटन (तामीळ) | १,१९,६१९ | १,५६,१३२ | +३२·२० |
| (२) कालकी (तामीळ) | ९५,६४६ | १,०३,६८८ | + ८·४१ |
| (३) ब्लिटझ (इंग्रजी) | ६३,१०४ | ८७,१८६ | +३८·१६ |
| (४) मलयला मनोरमा (मलायलम्) | ५२,८१६ | ७८,३४७ | +४८·३४ |
| (५) सिने चित्रा (हिंदी) | ५४,७४९ | ७७,५्६० | +४१·५६ |
| (६) स्क्रीन (इंग्रजी) | ५१,३५२ | ७३,०९४ | +३७·०० |
| (७) इलस्ट्रेडेट वुइकली (इंग्रजी) | ६३,४०९ | ७१,१५८ | +१२·१० |
| (८) धर्मयुग (हिंदी) | ६१,०२२ | ६४,१९४ | + ५·२७ |
| (९) सिने ॲडव्हान्स (इंग्रजी) | ४८,४५५ | ५५,२०० | +१३·९२ |
| (१०) मातृभूमि (मलायलम्) | ४७,२९१ | ५३,८३२ | +१३·०२ |
| (११) वुइकली न्यूज अँड व्ह्यूज (इंग्रजी) | ७७,२९९ | ५३,३४३ | −२०·९९ |

### इतर नियतकालिकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) कुमुदम् (तामीळ) | १,३१,७६५ | १,६७,१३६ | +२६·८४ |
| (२) कल्याण (हिंदी) | १,१५,००० | १,१४,९४९ | − ०·०४ |
| (३) फिल्मफेअर (इंग्रजी) | १,१८,१७८ | १,०६,५७० | − ९·८३ |
| (४) अस्ताना (उर्दू) | ७४,५४० | ७७,९६७ | + ४·६० |
| (५) मनोहर कहाणिआ (हिंदी) | ७२,१६७ | ६६,३३२ | − ८·०९ |
| (६) राष्ट्रपति (हिंदी) | २१,६२५ | ६३,६३६ | +१९४·२७ |
| (७) माया (हिंदी) | ६९,२५० | ६२,७५० | − ९·३९ |
| (८) पदी पंतलु (तेलगू) | ४५,००० | ६१,३९७ | +३६·४४ |
| (९) चंदामामा (हिंदी) | ५२,००३ | ५७,५७७ | +१०·७२ |
| (१०) शामा (उर्दू) | ५८,५८२ | ५७,१६६ | − २·४२ |
| (११) पेरुम् पदम् (तामीळ) | ५५,७३६ | ५४,२१७ | − २·७३ |
| (१२) बेतार जगत् (बंगाली) | ४७,९७२ | ५०,४३२ | + ५·१३ |

रिगल बेकरी
डेक्कन जिमखाना
गोखले स्मारक चौक
आमचे येथें सँड्विच् व ब्राऊन ब्रेड वगैरे माल मिळेल.
प्रो. एस्. एस्. कुलकर्णी

# व्यापार व उद्योगविषयक कार्य करणाऱ्या कांहीं संघटनांची माहिती

## इंडियन मर्चंटस् चेंबर, मुंबई

सभासदांची एकूण संख्या २,००० पेक्षां अधिक

| उत्पन्नाची बाब | रु. | खर्चाची बाब | रु. |
|---|---|---|---|
| वर्गणी | २,२०,४५० | कचेरीचा पगार | १,५४,६३० |
| सार्वजनिक संस्थांवरील प्रतिनिधींकडून वर्गणी | ३,७०० | टेलिफोन | ३,००० |
| | | पोस्टेज व तारा | ११,००० |
| | | अहवाल छपाई | ३०,००० |
| व्यापारी परीक्षा | १०,१६३ | नियतकालिक | २०,५०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | १५,४६४ | स्टेशनरी | ६,६०० |
| | | प्रवास खर्च | २,००० |
| सर्टिफिकेटस ऑफ ओरिजिन व सर्टिफिकेट फी | १६,४६९ | सभासद वर्गण्या | २,००० |
| | | मोटार खर्च | ३,७०० |
| जाहिरातीचें उत्पन्न | १८,८२५ | नौकराच्या प्रॉव्हिडंट फंडास वर्गणी | ८,००० |
| मेझरमेंट अँड वेमेंट फीज | १,०४,७६० | ग्रॅच्युइटी तरतूद | ८,३०० |
| | | घसारा | ११,००० |
| | | व्यापारी परीक्षा | ६,००० |
| | | मेझरमेंट खातें | १,०४,००० |
| एकूण | ३,८४,००० | एकूण | ३,८४,००० |

सभासदत्वाची वर्गणी रु. १५०

सार्वजनिक संस्थांवरील चेंबरचे सभासद, बैठकांना हजर राहण्यासाठी मिळणारे पैसे चेंबरला देतात. त्यांच्यासाठी खास वर्गणी नाहीं.

## बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, मुंबई

| सभासदांची संख्या ... ... ... | | |
|---|---|---|
| | ऑर्डिनरी | ३१९ |
| | असोसिएट | १६८ |
| | | ४८७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गणी | ऑर्डिनरी सभासद | दरसाल | रु. | ४८० |
| | असोसिएट " | " | रु. | ३६० |
| प्रवेश फी | ऑर्डिनरी सभासद | " | रु. | १,००० |
| | असोसिएट " | " | रु. | १०० |

| उत्पन्नाची बाब | रु. | खर्चाची बाब | रु. |
|---|---|---|---|
| वर्गणी | ३,२०,००० | पगार व बोनस | ५,२५,००० |
| स्टॅटिस्टिकल रिटर्नसाठी व इतर फी | ४,१४,७०८ | दिलेल्या वर्गण्या | ५,००० |
| | | प्रॉव्हिडंट फंडाची वर्गणी | २५,००० |
| सेक्रेटॅरिअल फी | २०,४०० | नौकर हितसंवर्धन फंड | ४,५०० |
| गुंतवणुकीवरील उत्पन्न | १२,००० | भाडें | १६,००० |
| | | ग्रॅच्युइटी तरतूद | १०,००० |
| संकीर्ण | १०,००० | संकीर्ण | १,३१,००० |
| एकूण | ७,७८,६६९ | एकूण | ७,७८,६६९ |

## ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन, मुंबई

सभासदांची वर्गणी भांडवलाच्या अनुरोधानें आकारली जाते.

| | | |
|---|---|---|
| व्यक्ति | रु. | ५० |
| १ लाख रुपयांपेक्षा कमी भांडवल असलेल्या फर्म्स अगर कंपन्या | रु. | १०० |
| १ ते २ लाखपर्यंत भांडवल असलेल्या फर्म्स अगर कंपन्या | रु. | १५० |
| २ लाखावर भांडवल असलेल्या फर्म्स अगर कंपन्या | रु. | २०० |

सभासदांची एकूण संख्या : सुमारें ४००. सेंट्रल कमिटीच्या सभासदाला संघटनेच्या उत्पन्नाला मदत म्हणून आणखी रु. १०० द्यावे लागतात.

## गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स, अहमदाबाद

सभासदांची संख्या ... ... ... सुमारें ९००

| उत्पन्नाची बाब | रु. | खर्चाची बाब | रु. |
|---|---|---|---|
| वर्गणी | ४१,००० | पगार, बोनस प्रॉव्हिडंट फंड इत्यादि | २३,००० |
| रोख्यांवरील व्याज | ६,००० | भाडें | ६,००० |
| जाहिराती | ९,००० | स्टेशनरी, छपाई वगैरे | ९,००० |
| संकीर्ण | ७,००० | पोस्टेज, टेलिग्रॅम्स टेलिफोन, इत्यादि | ३,४०० |
| | | स्वागतसमारंभ | २,५०० |
| एकूण | ६३,००० | एकूण | ६३,००० |

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें

| सभासदांची एकूण संख्या | | |
|---|---|---|
| | आश्रयदाते | ३९ |
| | आजीव सभासद | १५ |
| | असोसिएट सभासद | २ |
| | सामान्य " | २१० |
| | एकूण | २६६ |

| उत्पन्नाची बाब | रु. | खर्चाची बाब | रु. |
|---|---|---|---|
| वर्गणी | १६,००० | | |
| कार्यकरी मंडळाच्या सभासदांची वर्गणी | १५,००० | पगार, बोनस, इत्यादि | ११,००० |
| | | प्रॉव्हिडंट फंडासाठी | १,२०० |
| व्याज | ८०० | पोस्टेज व टेलिग्रॅम्स | २,३०० |
| | | छपाई व स्टेशनरी | ४,५०० |
| | | वृत्तपत्रें | २,३०० |
| | | सभा, स्वागत समारंभ वगैरे | २,५०० |
| | | सभासदत्वाच्या वर्गण्या | २,२०० |
| एकूण | ३२,२८२ | एकूण | ३३,२८३ |

कार्यकारी मंडळाच्या सभासदाला वर्गणी म्हणून रु. २५० द्यावे लागतात.

## निरनिराळ्या संघटनांतील नौकरवर्गासंबंधीं माहिती

**बाँबे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री**

| | |
|---|---|
| सेक्रेटरी, डेप्युटी सेक्रेटरी, सीनिअर असिस्टंट सेक्रेटरी (प्रत्येकीं १) | ३ |
| असिस्टंट सेक्रेटरी | ४ |
| लेबर अॅडव्हॉयझर | १ |
| टायपिस्ट | १० |
| शिपाई | ३६ |
| इतर | ९ |
| एकूण | ६३ |

ह्यांत मेझरमेंट खात्याचा नौकरवर्ग धरलेला नाहीं.

**इंडिअन मर्चंटस चेंबर**

| | |
|---|---|
| सेक्रेटरी | १ |
| सीनिअर असिस्टंट सेक्रेटरी | २ |
| ज्युनिअर ,, ,, | २ |
| टायपिस्टस् | ६ |
| शिपाई | १२ |
| ग्रंथपाल | १ |
| इतर | ५ |
| एकूण | २९ |

**ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन**

| | |
|---|---|
| सेक्रेटरी | १ |
| जॉइंट सेक्रेटरी | १ |
| असिस्टंट सेक्रेटरी | २ |
| अकौंटंट | १ |
| ऑफिस सुपरिंटेंडंट | १ |
| टायपिस्टस् | ३ |
| शिपाई | ४ |
| इतर | ४ |
| एकूण | १७ |

**महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स**

| | |
|---|---|
| सेक्रेटरी, असिस्टंट सेक्रेटरी, अकौंटस असिस्टंट, स्टेनोग्राफर, स्टेनो टायपिस्ट, जनरल क्लार्क, टेलिफोन ऑपरेटर (प्रत्येकीं १) | ७ |
| शिपाई | ३ |
| एकूण | १० |

**आंध्र चेंबर ऑफ कॉमर्स, हैदराबाद**

सभासदांची संख्या ... ... ... ... ८२०

| उत्पन्नाची बाब | रु. | खर्चाची बाब | रु. |
|---|---|---|---|
| प्रवेश फी | ३,५०० | कचेरी | १७,८३५ |
| वर्गणी | ३४,००० | छपाई | २,००० |
| सर्व्हिस अँड | | स्टेशनरी | २,००० |
| सर्टिफिकेट चार्जेस | ३,००० | पोस्टेज | १,५०० |
| भाड्याचें उत्पन्न | १२,००० | स्वागत | १,५०० |
| | | दिलेल्या वर्गण्या | १,२०० |
| | | दुरुस्त्या वगैरे | ३,५०० |
| | | शाखांचा खर्च | ४,००० |
| एकूण | ५०,९२५ | एकूण | ५०,९२५ |

५

## कांहीं संघटनांच्या उपयुक्ततेचें स्वरूप

**बाँबे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री**

विक्रीकर, उत्पन्नावरील कर, आयात, निर्यात, व्यापारनियंत्रणें इत्यादि बाबतींतल्या कायदेकानूंची माहिती सभासदांना पुरविण्यांत येते. त्याचप्रमाणें ह्या बाबतींतील बदलहि परिपत्रकाद्वारें कळविण्यांत येतात. पाहिजे असल्यास ह्या बाबतींत सल्लाहि दिला जातो. दरमहा होणाऱ्या कामकाजाची माहिती पत्रकाद्वारें दिली जाते. वार्षिक अहवाल व महत्त्वाच्या कायद्यांच्या प्रती मोफत दिल्या जातात. चेंबरनें एक लेबर-ऑफिसर नेमलेला आहे. मजूरविषयक प्रश्नाबाबत तो उत्तम सल्ला व माहिती देतो. त्यासाठी दरमहा रु. २५० द्यावे लागतात. सल्ला किमान १ वर्षभर तरी घ्यावा लागतो. असा सल्ला नको असेल तर विशिष्ट प्रश्नापुरता तासाला रु. ३० देऊन सल्ला घेतां येतो. सर्टिफिकेटस ऑफ ओरिजिन व सर्टिफिकेटस ऑफ अॅनॉलिसिस सभासदांना सवलतीच्या दरानें देण्यांत येतात. लवादाचीं व पाहणीचीं कामेंहि अशींच केलीं जातात. निर्यात व्यापाऱ्यांसाठी वेमेंट व मेझरमेंट सर्व्हिस दिली जाते. सभासदांच्या अडचणी चेंबरच्या सार्वजनिक संस्थांवरील प्रतिनिधींच्या मार्फत मध्यवर्ती सरकारला व राज्यसरकारला कळविण्यांत येतात. मुंबई बंदरांतील बोटींची व त्यांच्या हालचालींची माहिती पुरविणारी एक पत्रिका चेंबरतर्फे प्रसिद्ध करण्यांत येते. ही माहिती अल्पवार्षिक वर्गणी घेऊन संबंधितांना पुरविली जाते. चेंबरतर्फे हिंदी वर्ग चालविले जातात व हिंदीच्या परीक्षा घेतल्या जातात. इतर संस्थांच्या चिटणिसाचें काम चेंबर करतें.

**इंडिअन मर्चंट्स चेंबर**

सरकारतर्फे निघणारीं पत्रकें, सरकारी धोरणांतील बदल, इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन व्यापारी व औद्योगिक घडामोडींबद्दल सभासदांना जरूर ती माहिती देण्यासाठी चेंबरतर्फे माहितीपत्रकें काढण्यांत येतात. व्यापार व उद्योग ह्या विषयासंबंधीं मध्यवर्ती सरकार व राज्यसरकार ह्यांच्या निरनिराळ्या कायद्यांविषयीं सभासदांना माहिती पुरविण्यांत येते. चेंबरतर्फे एक मासिक चालविलें जातें. त्यांत व्यापारी जगतासंबंधीं माहिती देण्यांत येते. त्याचप्रमाणें मॅनेजिंग कमिटीच्या कामकाजाची व तिमाही सभांची माहिती देण्यांत येते. सभासदांच्या अडचणींची दखल घेऊन योग्य त्या सरकारी खात्यांकडे त्यांची बाजू मांडण्यांत येतें. सर्टिफिकेट्स ऑफ ओरिजिन देण्यांत येतात. सभासदांनीं विचारल्यास विक्रीकर, प्राप्तीवरील कर, आयात-निर्यात, इत्यादींबाबत सल्ला देण्यांत येतो. व्यापारी परीक्षा घेऊन प्रमाणपत्रें दिलीं जातात.

**ऑल इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन**

संघटनेची एक मध्यवर्ती कमिटी असून शिवाय प्रादेशिक कमिट्या आहेत. निरनिराळ्या बाबींसंबंधीं १७ कमिट्यांच्या साह्यानें मध्यवर्ती कमिटी काम करते. त्यांतील कांहीं अशा:— इंडस्ट्रिअल फिनान्स डेव्हलपमेंट, पार्लमेंटरी अफेअर्स, औद्योगिक कच्चा माल, औद्योगिक संबंध, परदेशी व्यापार, ग्रामीण औद्योगीकरण, दळणवळण व वाहतूक, छोटे उद्योगधंदे, इत्यादि. संघटनेतर्फे 'औद्योगिक भारत' ह्या नांवाचे एक मासिक प्रसिद्ध करण्यांत येतें. औद्योगिक विकास व नियोजन ह्यासंबंधीं प्रतिनिधित्व करते. महत्त्वाचे उद्योगधंदे व उद्योगधंद्यांतील महत्त्वाचे प्रश्न ह्यासंबंधीं परिसंवाद भरविण्यांत येतात व प्रकाशनें काढण्यांत येतात. इंडिअन मॅन्युफॅक्चरर्सची एक डायरेक्टरी व इंडिअन एक्सपोर्ट गाइड हीं प्रसिद्ध केलीं जातात. परदेशांत प्रतिनिधी-मंडळें पाठविण्यांत येतात.

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

वसूल शेअर भांडवल : रुपये दहा लाख
खेळतें भांडवल : रुपये एक कोट
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर : ( १ ) तीन वर्षे मुदत ठेवींकरितां व्याज दर ४ टक्के. ( २ ) पांच वर्षे मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन. पी. कानिटकर, ॲडव्होकेट, चेअरमन.
के. डी. शिराळकर, मॅनेजर.



# दि इसलामपूर को-ऑ. पीपल्स बँक लि.

स्थापना १९१६ ] [ रजिष्टर नं. ५५८४

मुख्य कचेरी – उरुण इसलामपूर, जि. द. सातारा.

अधिकृत भांडवल शेअर रु. ५०,०००
वसूल मांडवल रु. ३७,०७५
रिझर्व्ह फंड रु. २५,५०५

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. एम. डी. पवार, ( चेअरमन )
श्री. ए. बी. रोटे, ( व्हा. चेअरमन )
श्री. के. एम. पोटे, ( समासद )
श्री. एफ. एस. वाकळे ,,
श्री. एस. ए. वाकळे, ,,
श्री. एस. बी. फले ,,
श्री. एस. ए. इतुशे ,,

बँकिंगचे सर्व व्यवहार किफायतशीरपणें केले जातात.

विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

ही दीपावलि आमचे भागीदारांस व ग्राहकांस सुखावह जावो.

डी. डी. लाटकर,
मॅनेजर.



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

मुख्य कचेरी : पुणें शहर.

स्थापना : १९३५

वसूल भांडवल : रु. ३१,००,००० चे वर
गंगाजळी व इतर निधि : रु. १४,६०,०००
खेळतें भांडवल : रु. १५ कोटींचे वर

★ महाराष्ट्र, आंध्र आणि म्हैसूर राज्यांत बँकेच्या ५२ शाखा.
★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात.
★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात.

## आमचे परदेशांतील प्रतिनिधि

( १ ) मिडलंड बँक लि, लंडन
( २ ) बँकर्स ट्रस्ट कंपनी, न्यूयॉर्क
( ३ ) डाइश ट्रस्ट बँक, पश्चिम जर्मनी

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

# तिसरी पंचवार्षिक योजना व लघुउद्योग

[ लेखक : प्रा. बलराम वनमाली, वर्धा ]

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे पांच प्रमुख उद्देश आहेत:—राष्ट्रीय उत्पन्नांत वार्षिक ५% ची वाढ करणें (पहिल्या योजनेंत ती ३½% योजिली होती व दुसऱ्या योजनेंत ४%), अन्नधान्याबाबत स्वावलंबन, बुनियादी उद्योगांची एवढी वाढ कीं साधारणत: दहा वर्षांत देशांतील औद्योगिक गरजा देशांतील उत्पादनांतूनच भागविता याव्यात, मानवशक्तीचा संपूर्णत: उपयोग आणि काम देण्याच्या शक्यतेचा भरपूर विकास, मिळकतीमधील व संपत्ती-मधील विषमता कमी करणें आणि आर्थिक शक्तीचें जास्त समसमान वितरण.

शेवटल्या दोन उद्देशांशीं लघु-उद्योगांचा अगदीं जवळचा संबंध आहे. मानवशक्तीचा संपूर्णत: उपयोग तेव्हांच होऊं शकेल, कीं जेव्हां त्यांच्या निवासस्थानाशेजारीं त्यांना काम मिळेल. तें काम पूर्ण समयाचें असूं शकतें किंवा जोडधंद्याचें असूं शकतें. आजचा शेतकरी जोडधंद्याशिवाय जगूंच शकत नाहीं, आणि पहिल्या उद्देशांत नमूद केल्याप्रमाणें त्याच्या उत्पादनांत जोडधंद्याशिवाय वाढहि होऊं शकत नाहीं. शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या खेड्यांत उद्योग स्थापन करावयाचे म्हणजे ते गृह-उद्योग आणि लघु-उद्योगच होऊं शकतात.

मिळकतीमधील विषमता नष्ट करण्यासाठी उत्पादनाचीं साधनें विकेंद्रित करून तीं कामगारांच्या मालकीचीं झालीं पाहिजेत. त्यासाठी सहकारी पद्धतीवर शेती आणि कारखाने चालविणें आवश्यक आहे. भारत सरकारचा 'सहकारी साम्ययोगाचा' प्रयत्न सफल करण्या-साठी आणि 'समाजवादी अर्थरचना' अंमलांत आणण्यासाठी लघु-उद्योगांचा विकासहि अत्यंत आवश्यक आहे.

## तृतीय योजनेंत लघु-उद्योगासाठी तरतूद

तृतीय पंचवार्षिक योजनेंत लघु-उद्योगासाठी विशेष तरतूद करण्यांत आली आहे. या योजनेंत लहान प्रमाणावर व छोट्या पुंजीवर चालणारे कारखाने जास्त सुरू व्हावयाचे आहेत. सहकारी पद्धतीनें चालणारे ५० जीन, ५० भाताचे कारखाने, ३०० भात सडीचे कारखाने, २० तागाच्या गांठी बांधण्याचे कारखाने, २५ तेलघाण्या, ५० सोलण्याचे कारखाने, १३० फळांच्या पदार्थांचे कारखाने, २० साखरेचे कारखाने व ४ पिठाच्या गिरण्या निर्माण करण्याचें नियोजन समितीच्या कार्यकारी पक्षानें सुचविलें आहे.

तृतीय पंचवार्षिक योजनेंत सरकारी क्षेत्रांत ६,२०० कोटी रुपये व खासगी क्षेत्रांत ४,००० कोटी रुपये असे एकूण १०,२०० कोटी रुपये विनियोजित होणार आहेत. त्यापैकी लघु-उद्योगासाठी व ग्रामोद्योगासाठी सरकारी क्षेत्रांत २५० कोटी रुपये विनियोजित होणार आहेत. तेवढीच रक्कम खाजगी क्षेत्रांत देखील विनियोजित होण्याची अपेक्षा आहे. या तृतीय योजनेंत वस्त्र-लघु-उद्योगाचे अपेक्षित आंकडे खालीलप्रमाणें आहेत.

| उद्योग | द्वितीय पंचवार्षिक योजना | तृतीय पंचवार्षिक योजना |
|---|---|---|
| हातमाग, पावरलूम व खादी व अंबर खादीचें वस्त्र | २६१ लाख गज | ३५० लाख गज |
| कच्चे रेशीम | ३७ लाख पौंड | ५० लाख पौंड |

## कर्जाची हमी व आधुनिक यंत्रसामग्री

ग्रामोद्योगाच्या व लघु-उद्योगाच्या विकासासाठी बँकांमधून जें कर्ज मिळेल त्याची हमी सरकारनें देण्याचें ठरविलें आहे. खादी व ग्रामोद्योग कमिशनच्या देखरेखीखाली चालणाऱ्या ग्राम व लघु-उद्योगासाठी इतर संस्थांमधून स्वस्त दरानें पैसा मिळवून देण्याचा सरकार प्रयत्न करील व त्याची हमी देईल.

खेड्यांतील वाढत्या लोकसंख्येचा विचार करतां ग्रामीण व लघु-उद्योगाचें उत्पादन प्रमाण वाढवणें अत्यावश्यक आहे. त्यासाठी आधुनिक व जलद चालणारी यंत्रसामग्री वापरणेंहि आवश्यक आहे. खादी व ग्रामोद्योग कमिशननें अनेक लघु-उद्योगांत विजेच्या व इतर प्रकारच्या शक्तीचा वापर सुरू केला आहे. ताडगूळ, ताडसाखर, कागद व तेलघाण्यासाठी तिचा वापर फारच उपयुक्त ठरला आहे.

तसेंच मोठ्या उद्योगांच्या जोडीला लघु-उद्योग खेडीमेळीनें जगावे व विकसित व्हावेत म्हणून शेतकी अवजारें व साधनें, सायकली व त्यांचे सुटे भाग, मोटारीचे सुटे भाग, डिझेलचीं इंजिनें व सुटे भाग, रेडियो व ध्वनिक्षेपक, कातडी कमावणें व चपला-जोडे तयार करणें, फळांचीं शीतागारें, कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामग्री, इलेक्ट्रिक मोटारी, पंखे, रंग, वैद्यकीय अवजारें, प्लास्टिक, इत्यादि वस्तु लघु-उद्योगामार्फत निर्माण करण्याचें ठरलें आहे.

द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या यंत्रणेप्रमाणें भारताची लोकसंख्या १९६६ सालीं ४३·४ कोटी अपेक्षित होती. परंतु आतां नवीन अंदाजाप्रमाणें ती ४८·० कोटी होऊं घातली आहे. तृतीय पंचवार्षिक योजनेंत शेतीशिवाय इतर व्यवसायांत एकूण १०५ लाख नवीन लोकांना काम मिळणार आहे. पण त्या काळांत काम मागणारांची संख्या १५० लाखांनीं वाढणार आहे. बाकीच्या लोकांना चौथ्या पंचवार्षिक योजनेची वाट पाहावी लागणार आहे. अशा परिस्थितींत लघु-उद्योगाचें क्षेत्र आणखी वाढवून सर्वांना काम देण्याची व्यवस्था करणें शक्य आहे काय, या गोष्टीचा सरकारनें विचार केला पाहिजे. अर्धबेकारीचा प्रश्न लघु व ग्रामीण उद्योगामार्फत पूर्णत्वानें मिटविण्याची सोय या तृतीय योजनेंत आहे ही आनंदाची गोष्ट होय.

## मिळकतीमधील असमानता

नियोजन समितीनें मिळकतीमधील आणि संपत्तीमधील विषमता दूर करण्यासाठी अनेक उपाययोजना योजिल्या आहेत. त्यापैकी महत्त्वाची योजना म्हणजे ग्रामीण व लघु-उद्योगाला सरकारी आर्थिक पाठबळ देण्याची आहे. या प्रोत्साहनाचा ग्रामीण उद्योगांनीं भरपूर फायदा घेतला पाहिजे व संपत्तीच्या समान वितरणास मदत केली पाहिजे.

तृतीय पंचवार्षिक योजनेप्रमाणें १९६३ च्या शेवटीं संपूर्ण देशभर सामूहिक विकास गट निर्माण होतील. त्या गटांमध्यें ग्रामपंचायतींमार्फत ग्रामीण उत्पादनाच्या योजना तयार होतील व अंमलांत येतील. ही योजना पूर्णपणें यशस्वी करण्यासाठी ग्रामीण विकास कार्यांत ज्यांना खरोखर रस आहे असेच अधिकारी नेमले पाहिजेत व स्थानिक कच्च्या मालाचा भरपूर फायदा घेऊन खेडोंपाडीं ग्रामीण उद्योग उभारले पाहिजेत. संघटन व्यवस्थित असेल तर ते ग्रामीण उद्योग कारखान्यांत निर्माण होणाऱ्या उत्पादनाशीं सुद्धां स्पर्धा करूं शकतील.

## लघु-उद्योगाचा बृहत-उद्योगाशीं समन्वय

मोठे उद्योग व लघु उद्योग यांच्यामध्यें भ्रातृभाव निर्माण

झाल्याशिवाय आपल्या योजना सफल होणार नाहींत व आपलीं उद्दिष्टें साध्य होणार नाहींत. लघु-उद्योगासाठीं कांहीं क्षेत्रें सुरक्षित ठेऊन त्यांत मोठ्या उद्योगांनीं अतिक्रमण करावयाचें नाहीं अशी योजना असली पाहिजे. भारतीय उत्पादन परिषदेचें एक लघु-उद्योग उत्पादन मंडळ स्वीडन, जर्मनी, अमेरिका व जपान या देशांमध्यें अध्ययनासाठीं गेलें होतें. त्यानें केलेल्या निवेदनांत स्पष्ट नमूद केलें आहे कीं, त्या देशांमध्यें मोठे उद्योग व ल्हान उद्योग यांचा गोड समन्वय व सहकार आहे. ल्हान उद्योग मोठ्या उद्योगाच्या आसपास ग्रामीण विभागांत स्थापन करण्यांत येतात व त्यांना मोठे उद्योग काम देतात. मोठा कारखाना मोठें कंत्राट घेतो व त्याचे ल्हानल्हान भाग करून आपल्या सहकारी ल्हान कारखान्यांना वांटून देतो. त्यांचा माल गोळा करून तो कंत्राट पुरें करतो. पश्चिम जर्मनींतील मोठे कारखाने आपला ४०% माल ल्हान सहकारी कारखान्यांतून तयार करून घेतात. अमेरिकेंत तें प्रमाण ३०% व जपानमध्यें ३८% आहे.

भारतांतहि लघु-उद्योग स्थापन करून यंत्रांचे सुटे भाग ल्हानल्हान कारखान्यांतून निर्माण करावयाचे व मग मोठ्या कारखान्यांत त्यांचें एकत्रीकरण करण्याचें कार्य दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासूनच सुरू झालें आहे. पण त्याची प्रगति अतिशय मंद व असमाधानकारक आहे. या तिसऱ्या योजनेंत त्या कार्यावर विशेष भर देण्यांत आला पाहिजे.

### सरकारी खरेदींमध्यें लघु-उद्योगांना प्राधान्य

अमेरिकेंत सैनिकी गरजांचा बराचसा भाग लघु-उद्योगांकडून खरेदी केला जातो. त्याच आधारावर भारतांतहि सरकारी धोरण अंगिकारलें आहे. तिसऱ्या योजनेंत त्याबाबत किती पाठबळ मिळेल याचा स्पष्ट असा उल्लेख नाहीं. तरी देखील, दुसऱ्या योजनेपेक्षा तें प्रमाण खचितच वाढेल.

### भांडवल, प्रशिक्षण व अन्वेषण

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत ५८ कोटी रुपयांचें आर्थिक साहाय्य लघु-उद्योगांना देण्यांत आलें आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत लघु-उद्योगांवर अचल सम्पत्ति व स्कंध यांच्या आधारावर ३०० ते ३५० कोटी रुपयांचें भांडवल पुरविण्यांत येईल. अमेरिकेंत लघु-उद्योगांसाठी भांडवल पुरविणारीं प्रमंडळें स्थापन होत आहेत. त्याच धर्तीवर भारतांतहि व्यवस्था करावी असें लघु-उद्योग कार्यकारी मंडळानें तिसऱ्या पंचवार्षिक योजना आयोगाला सुचविलें आहे. स्टेट बँकेमार्फत व सहकारी बँकांमार्फत सहकारी आर्थिक मदत व कर्जाची हमी देण्याबाबतच्या माहितीचा उल्लेख या लेखांत पूर्वी आला आहेच.

लघु-उद्योगांसाठी व्यक्तींना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करण्यासाठीं वरील कार्यकारी मंडळानें शिफारशी केल्या आहेत. मोठ्या कारखान्यांत या कार्यकर्त्यांना अनिवार्य व निःशंक प्रशिक्षण देण्याची जी तरतूद या तृतीय पंचवार्षिक योजनेंत करण्यासाठीं कायदा प्रस्तावित करण्यांत आला, तो प्रशंसनीय होय. त्यामुळें लघु-उद्योगांना तिसऱ्या योजनेंत भरपूर प्रशिक्षित व दक्ष कर्मचारी मिळतील.

नवीन डिसाइनस्, गुणांमध्यें वाढ व उत्पादनखर्चांत मितव्ययता या गोष्टी उपलब्ध करण्यासाठीं तृतीय पंचवार्षिक योजनेच्या अन्वेषण कामासाठीं राखून ठेवलेल्या रकमेंतून लघु-उद्योगासाठीं योग्य खर्च व्हावा अशी अपेक्षा आहे.

---


रेखा फर्निशर्स
३२४, सदाशिव, पुणें.
(टेलिफोन नं ६५१३)

उत्कृष्ट फर्निचरसाठी सुप्रसिद्ध;
घरांची व दुकानांची शोभा वाढविणें
हें आमचें वैशिष्ट्य आहे.

कुटुंबाचें आरोग्य व सुखशांतीकरितां
'नैसर्गिक' जीवनसत्त्वें असलेलें
शुद्ध व साजूक तूप
अवश्य वापरा.
म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, पुणें २.
(फोन नं. ६४३०)

नवीन जरीचीं लुगडीं, साड्या,
सुंदर बनारसी पातळें
व
सर्व मिलचा माल
यांकरितां
शहाडे आठवले
प्रा. लि., दादर
मुंबई २८.
टे. नं. ६०५५४

# सहकारी क्षेत्राला असें नेतृत्व हवें

## श्री. विठ्ठलराव विखे ह्यांच्या असामान्य कामगिरीचा परिचय

[ लेखक : डॉ. र. गो. काकडे ]

श्री. विठ्ठलराव एकनाथ विखे पाटील यांना कांहीं आठवड्यांपूर्वी ६० वर्षे पूर्ण झालीं म्हणून त्यांचा सार्वजनिक रीत्या सत्कार करण्यांत आला. भारतांतील जीवनमान सुधारत असल्यामुळें षष्ट्यब्दि-पूर्तिसमारंभाचें आतां पूर्वीइतकें महत्त्व अगर असामान्यत्व राहिलेलें नाहीं. तथापि सर्वसाधारण लोकांना स्फूर्ति देणारे असे कांहीं लोक असतात. त्यांचा षष्ट्यब्दिपूर्तिसमारंभ हा त्यांच्या कामगिरीचा परामर्श घेण्याच्या दृष्टीनें एक चांगली संधि निर्माण करून देतो व त्या दृष्टीनें अशा प्रसंगाचें महत्त्व मानावें लागेल. श्री. विखे पाटील हे अशा थोड्या असामान्य लोकांपैकी एक होत.

श्री. विठ्ठलराव यांचा जन्म लोणी बुद्रुकसारख्या एका लहान खेड्यांत शेतकऱ्याच्या कुटुंबांत झाला. त्या परिस्थितींतील मुलांवर लहानपणीं ज्या प्रकारचे शालेय व इतर संस्कार होतात तसेच विठ्ठलराव यांचेवरहि झाले. त्यांचें शालेय शिक्षण प्राथमिक शिक्षणाचे पुढें झालें नसलें तरी कुंटुबांतील वडीलधाऱ्या मंडळींच्या देखरेखीखालीं त्यांना जगाच्या विस्तीर्ण व्यावहारिक शाळेंत बरेच पाठ मिळाले व विठ्ठलरावांच्या पुढील आयुष्याचा पाया भरला गेला.

विठ्ठलरावांनीं स्वतः घरची शेती करीत असतांना सार्वजनिक कामाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यांनीं आपल्या गांवांत सहकारी सोसायटी काढून तिच्यामार्फत गांवाची सेवा करणेस सुरुवात केली. त्यांनीं आपल्या चिकाटीनें, स्वार्थनिरपेक्षतेनें, व्यवहारज्ञानानें व परिश्रमानें गांवांतील सोसायटीचा व्याप इतका वाढविला, कीं ती सोसायटी त्या भागांतील एक चांगल्यापैकी सोसायटी गणली जाऊं लागली. हें सर्व करीत असतांना त्यांनीं प्रसिद्धीचा प्रकाशझोत जाणूनबुजून टाळला, तरुण व होतकरू मंडळींना पुढें करून त्यांनीं त्यांचेकडून सर्व काम करविलें.

१९३०–३१ च्या जागतिक मंदीचा तडाखा ऊस पिकविणाऱ्या बागायतदारांना फार जोरांत बसला. लोणीच्या आसमंतांतील भाग हा त्यास अपवाद नव्हता. बऱ्याच सोसायट्यांना आपलें कर्ज सभासदांकडून वसूल करतां येईना व सभासदांना आपल्या कर्ज-फेडीपोटीं आपल्या जमिनी गमावण्याचा प्रसंग आला. अशा वेळीं श्री. विठ्ठलराव विखे यांनीं मुंबई प्रांतिक सहकारी बँक व सरकारी अधिकारी यांना शेतकऱ्यांची बाजू चांगल्या रीतीनें पटवून दिली व शेतकऱ्यांच्या देण्यांत सूट मिळवून त्यांच्या जमिनी सावकारां-पासून वांचविल्या. त्यांच्या ह्या व अशाच इतर सार्वजनिक स्वार्थ-निरपेक्ष कामगिरीमुळें त्या भागांतील शेतकऱ्यांचा त्यांचेवर विश्वास बसला व तो त्यांच्या पुढील कामगिरीचा पायाभूत ठरला.

श्री. विठ्ठलराव विखे पाटील यांची सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे प्रवरा सहकारी साखर कारखान्यासाठीं त्यांनीं केलेले परिश्रम हे होत. आधुनिक यंत्रसामग्रीनें सुसज्ज व भारी भांडवलाचा साखरेचा कारखाना काढणें व चालविणें हें तज्ज्ञ व वाकबगार अशा लोकांचें काम. तें शेतकऱ्यांसारख्या अनभिज्ञ लोकांना जमेल असें कधीं कोणाच्या स्वप्नांतहि आलें नसेल. दुसऱ्या महायुद्धा-नंतरच्या काळांत खाजगी भांडवलदारांनीं लोणी भागांत साखर कारखाना काढण्याच्या दिशेनें हालचाल करण्यास सुरुवात केली होती. ह्याच सुमारास ( १९४५ ) बागायतदारांची एक परिषद् श्रीरामपूर येथें भरली असतां तींत श्री. विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळें महाराष्ट्रांत सहकारी पद्धतीवर साखर कारखाने काढण्यास सरकारनें साहाय्य करावें असा ठराव पास होऊन अशा कारखान्यांसाठीं एक–दोन ठिकाणांचा मुद्दाम उल्लेख त्या ठरावांत करण्यांत आला. हा ठराव म्हणजे श्री. विखे यांच्या कामाची सुरुवात ठरली. शेतकऱ्यांचा साखर कारखाना काढण्याचे दृष्टीनें त्यांनीं शेतकऱ्यांपासून भाग-भांडवल जमा करण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांनीं आपल्या हितासाठी चालवावयाचा साखर कारखाना काढण्याचा विचार हा त्या वेळीं मृगजळासारखा वाटत होता. त्यामुळें भाग-भांडवल जमा करण्याच्या कामांत त्यांना शंकेखोर लोकांची चेष्टामस्करी, उपहास व निंदा-नालस्तीहि सहन करावी लागली. पण साखर कारखान्याचा प्रश्न हा जणू आपल्या जीवनमरणाच्या प्रश्नाइतका महत्त्वाचा मानल्यामुळें त्यांनीं आपला धीर खचूं दिला नाहीं. अविश्रांत परिश्रम करून, लोकांची उपहासगर्भ निंदा सहन करून विठ्ठलरावांना दोन वर्षांच्या आंत सोसायटी रजिस्टर करणेस जरूर तितकें भांडवल जमा करतां आलें. कारखान्यासाठी गरीब शेतकऱ्यांमधून २–३ लाख रु. जमा करणें व तेंहि अशक्य वाटणाऱ्या अशा योजनेसाठी, हें सोपें व एकट्याचें काम नव्हतें. त्या कामीं मुंबई प्रांतिक सहकारी बँक व इतर कार्यकर्ते यांची भरीव मदत विठ्ठलरावांना झाली हें जरी खरें असलें तरी त्यांचें स्थानिक पुढारीपण त्या वेळीं जर तोकडें पडलें असत, जर त्यांची सहकारावरील निष्ठा लेचीपेची असती, तर कारखान्याची कल्पना कदाचित् बाल्यावस्थेंतच मृतप्राय झाली असती.

कारखाना रजिस्टर झाल्यानंतर विठ्ठलरावांची जबाबदारी वाढली. पण कोपरगांव श्रीरामपूरच्या परिषदांपासून अध्यक्ष या नात्यानें मिळणारें प्रा. गाडगीळ यांचें मार्गदर्शन त्यांना वाढत्या प्रमाणावर व दैनंदिन कामासाठी मिळूं लागलें. सहकारी साखर कारखान्याची सुरुवातीची व कारखाना रजिस्टर झालेपासून गळितापर्यंतची सर्व तात्त्विक घडण-जुळण प्रा. गाडगीळ व श्री. आर. जी. सुळे यांनीं केली. श्री. सुळेसाहेब यांचा उपयुक्त पूर्वानुभव, लौकिक, गोड मनमिळाऊ स्वभाव व विशिष्ट कार्यपद्धति यांमुळें कारखान्यास एक महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें व त्याचें यश निश्चित झालें. पण कारखान्याच्या उभारणीस ह्यापेक्षा अधिक हवें होतें. तें म्हणजे स्थानिक पुढारीपण. विठ्ठलरावांनीं कारखान्याच्या अगदीं कल्पनेपासून तों चालू होईपर्यंत सभासदांची व इतर लोकांची आघाडी उत्तम रीतीनें सांभाळली. त्यांनीं सभासदांकडून हवें त्याप्रकारचें सहकार्य मिळवून दिलें व त्यांच्यांतील उत्साह व एकी कायम टिकविली. ज्यांना ग्रामीण परिस्थितीची थोडीफार माहिती आहे अशांना ही कामगिरी केवढी मोठी बिकट व प्रशंसनीय आहे तें निराळें सांगण्याची गरज नाहीं. कारखाना रजिस्टर झाल्यावरहि निरनिराळ्या अडचणींच्या वेळीं त्यांचें पुढारीपण सिद्ध झालें. ह्या बाबतींत दोनतीन प्रसंगांचा येथें उल्लेख करणें युक्त ठरेल.

कारखाना उभारणीच्या कामांत एक वेळ अशी आली कीं, कारखान्याजवळ पैसे उभे करण्यासाठी तारण शिल्लक राहिलें

नाहीं. अशा वेळीं श्री. विठ्ठलरावांनीं आपली स्वतःची जिंदगी तारण म्हणून देऊं केली; एवढेंच नव्हें तर आपल्या सहकारी डायरेक्टरांनाहि तसें करण्यास प्रवृत्त केलें व कारखान्याची सांपत्तिक अडचण निभावून नेली. कारखाना सुरू झाल्यानंतर दुसरा प्रसंग उद्‌भवला. कारखाना सुरू झाला त्या सुमारास गुळाचे भाव भरमसाट वाढले. त्यामुळें कारखान्यास साखरेसाठी ऊस देण्यापेक्षा त्याचा गूळ करून विकणें हें अतिशय फायद्याचें झालें. पण अशा फायद्याच्या प्रसंगींहि सभासदांनीं विठ्ठलरावांच्या शब्दावर विश्वास ठेवून, त्यांचा सल्ला मानून, गूळ करण्याचें टाळलें. स्वतःच्या हितापेक्षा सार्वजनिक हितावर त्यांनीं भर दिला. तिसरी गोष्ट येथें उल्लेखिल्याशिवाय राहवत नाहीं. ती म्हणजे प्रवरा कारखान्यांत सुरुवातीस कित्येक वर्षी बोर्डातील सभासदांच्या निवडणुकीचा प्रसंग उद्‌भवला नाहीं. ह्याचेंहि बहुतेक सर्व श्रेय विखे पाटलांच्या पुढारीपणाला द्यावें लागेल.

निरनिराळ्या प्रसंगांतून तावून-सुलाखून निघालेलें व लोकांच्या विश्वासावर आधारलेलें असें विठ्ठलरावांचें हें पुढारीपण आज अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी क्षेत्रांत प्रकर्षानें चमकत आहे. सहकारी साखर कारखान्यापुरतें बोलावयाचें झाल्यास, आज सबंध महाराष्ट्रांत तें असामान्य ठरलें आहे. तेंच पुढारीपण आज नगरच्या उत्तर भागांतील औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रांत पदार्पण करीत असून तें सहकारी क्षेत्रांतल्या इतकेंच तेथेंहि प्रभावी होईल हें निःसंशय आहे.

सर्वसाधारण शेतकऱ्याच्या कुटुंबांत जन्मलेल्या व पाश्चात्त्य शिक्षणाचे अगर नागरी संस्कृतीचे विशेष परिणाम न झालेल्या अशा माणसाकडून चिकाटी, सततोद्योग, स्वार्थनिरपेक्षता, आत्मविश्वास व व्यावहारिक दृष्टि या भांडवलाच्या बळावर केवढी असामान्य कामगिरी होऊं शकते ही गोष्ट विठ्ठलरावांच्या जीवन-परिचयावरून स्पष्ट उठून दिसते. कोठल्याहि प्रश्नाचे परिणाम शेतकऱ्यांवर काय व कसे होतील हें विठ्ठलराव जितकें लवकर व अचूकपणें उमगूं शकतात तितकें आकलन इतर लोकांना होत नाहीं ही वस्तुस्थिति आहे. अचूक व्यवहारज्ञान हें त्यांचें मोठें भांडवल आहे. ग्रामीण भागांत श्री. विठ्ठलराव विखे यांच्यासारखे स्थानिक पुढारी लाभले तर महाराष्ट्राचा उत्कर्ष दूर नाहीं हें निःसंशय. आज महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी अशा लोकहितदक्ष ग्रामीण पुढारीपणाची नितांत गरज आहे.

ही दिवाळी आमच्या असंख्य ग्राहकांस व हितचिंतकांस सुखसमृद्धीची जावो.

फक्त ज्योति समईतूनच तेल बाहेर ओघळत नाहीं



रजि. डि. ने.
नं. ७९९३०

आणि एक वात सतत २४ तास तेवते. ज्योति समई ९ विविध आकारांत, पितळी व क्रोमियम प्लेटिंगमध्यें मिळते. तिचे तीन भाग सुटे होतात. तसेंच निरंजनाएवढ्या छोट्या आकारातहि ज्योति समई सर्वत्र मिळूं शकते.

भारतांतील एकमेव निर्माते:
दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड
१४८ कसबा पेठ, पुणें-२
अधिक माहितीसाठीं मोफत माहिती-पत्रक मागवा.

# महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखाने

## क्रांतिकारक सामाजिक परिवर्तन

महाराष्ट्रांतील सहकारी साखर संघटना ही २४० खेड्यांतील अंदाजें १,५०० ऊस–बागाईतदारांची वैशिष्ट्यपूर्ण अशी संघटना आहे. दरसाल ही संघटना अदमासें ४,००० एकरांतून अंदाजें १,४०,००० टन उसाचें पीक काढतें. या पिकापासून तिच्या सभासदांना दरसाल रोख ५७ लक्ष रुपये मिळतात. तसेंच, सदर संघटना अदमासें ३,००० कापणी करणारे व गाडीवान या-व्यतिरिक्त अंदाजें ३५० इसमांना कायमचा रोजगार व ४५० इसमांना हंगामी रोजगार पुरविते.

ऊस हें महाराष्ट्रांतील रोख पैसा देणारें एक महत्त्वाचें पीक असून, साखर, गूळ व खांडसरी यांच्या उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून उसाचा उपयोग करण्यांत येतो. कोंकणांतील तीन जिल्हे वगळल्यास इतर सर्व जिल्ह्यांत उसाची लागवड करण्यांत येते. परंतु अहमदनगर, कोल्हापूर, पुणें, नाशिक, द. सातारा, उत्तर सातारा, सोलापूर व औरंगाबाद हे जिल्हे उसाच्या लागवडीच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत. ऊस लागवडीखालीं अदमासें २ लक्ष एकर जमीन आणण्यांत आली आहे.

### दर एकरीं अधिक उत्पादन

राज्यामध्यें उसाच्या लागवडीखालील एकूण क्षेत्र अगदीं कमी असलें तरी भारतांत दख्खनमध्यें होणाऱ्या उसाचें दर एकरीं उत्पादन व उसापासून मिळणाऱ्या साखरेचें प्रमाण सर्वांत अधिक आहे. त्यामुळें रोख पैशाचें पीक म्हणून उसाच्या पिकास विशेष महत्त्व आहे. ऊस पिकविणाऱ्या राज्यांतील उत्पादनाचे आंकडे पुढीलप्रमाणें :—

| राज्य | दर एकरीं उत्पादन | साखरेचें टक्के प्रमाण |
|---|---|---|
| महाराष्ट्र | २८·२ | ११·७० |
| मद्रास | २८·० | ९·१६ |
| आंध्र | २७·० | ९·२० |
| म्हैसूर | २५·० | ९·१० |
| पंजाब | १३·९ | ९·०१ |
| उत्तर प्रदेश | ११·० | ९·६८ |
| बिहार | ८·५ | ९·३६ |

दख्खनच्या प्रदेशांत साखर उद्योगधंद्याची वाढ झाल्यामुळें येथें बऱ्याच लोकांना कामधंदा मिळूं लागला आहे. या धंद्यास सरकारचें संरक्षण मिळाल्यापासून त्याचा फार जलद गतीनें विकास झाला. राज्यांत एकूण २८ साखर गिरण्या असून या गिरण्यांची ऊस गाळण्याची क्षमता दर दिवसाला ३०,००० टन एवढी आहे. यांपैकी १५ गिरण्या सहकारी पायावर संघटित करण्यांत आल्या आहेत.

### लोणी येथील साखर कारखाना

महाराष्ट्रांत पहिला सहकारी साखर कारखाना हा अहमदनगर येथील लोणी बुद्रुक या गांवीं सुरू करण्यांत आला. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचें खास असें वैशिष्ट्य आहे. तें म्हणजे, आपल्या राज्यांतील कारखाने स्वतः ऊस पिकवितात व आपली बहुंशीं गरज स्वतःच भागवितात. त्यामुळें लोणी येथील ऊस–बागायतदारांना स्वतःचा साखर कारखाना सुरू करण्याची संधि मिळाली व सहकारी प्रयत्नांद्वारें त्यांचें स्वप्न प्रत्यक्षांत येऊं शकलें. त्यांच्या मार्गांत सर्वांत मोठी अडचण पैशाची होती. परंतु सुदैवानें प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या मदतीनें पैशाच्या व इतर अडचणी दूर झाल्या. या नवीन प्रयत्नांना राज्यसरकारकडून भाग भांडवला-च्या रूपानें मदत मिळाली. या प्रकारें पहिल्या सहकारी साखर कार-खान्याची स्थापना झाली व या संस्थेस बागायतदार सहकारी साखर उत्पादक संस्था हें नांव देण्यांत आलें. या साखरेच्या कारखान्यां-तून १९५० सालापासून साखरेचें उत्पादन होऊं लागलें. लोणी कारखान्यास मिळालेल्या यशापासून प्रेरणा घेऊन याच पद्धतीवर कोळपेवाडी येथें कोपरगांव सहकारी साखर कारखाना नांवाची दुसरी एक संस्था काढण्यांत आली. या कारखान्याच्या उत्पादनास १९५६ मध्यें सुरुवात झाली.

### सरकारची भूमिका

मध्यवर्ती सरकारनें नवीन साखर कारखान्यांना परवाने देण्याचा जो निर्णय घेतला त्याचा फायदा घेण्यासाठी राज्य सरकारनें राज्यामध्यें नवीन साखर कारखाने सहकारी पायावर उभारण्याचें ठरविलें आहे. या साखर कारखान्यास लागणारें आवश्यक भांडवल सहकारी पद्धतीनें कसें उभारलें जाऊं शकतें हें लोणी या संस्थेनें दाखवून दिलें आहे. ऊस–बागायतदारांनीं कारखाना सुरू करण्याच्या दृष्टीनें आवश्यक असणाऱ्या एकूण भांडलापैकी थोडें-फार भांडवल गोळा केलें तर राज्य सरकार अंशतः भाग भांडवलाच्या व अंशतः इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनकडून दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या स्वरूपांत उरलेली रक्कम देईल. सरकारनें या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर भाग घेण्यास कॉर्पोरेशनला प्रवृत्त केलें असून या संस्थेनें दिलेल्या कर्जाबद्दल हमी घेण्याचें मान्य केलें आहे. यामुळें आज राज्यांत ऊस पिकविणाऱ्या जिल्ह्यांत १५ सहकारी साखर कारखाने असून १३ कारखान्यांतून साखरेचें उत्पादन सुरू आहे. साखरेच्या कारखान्यांतील एकूण भाग भांडवल १५० लक्ष रुपयांचें असून फायनान्स कॉर्पोरेशनमार्फत मिळविलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जाची रक्कम ६९७·५० लक्ष रुपये आहे. मुंबई राज्य सहकारी बँकेनें रु. ८४५ लक्ष रकमेचें हंगामी साहाय्य दिलें आहे व भांडवली खर्च भागविण्यासाठी ३४९·४९ लक्ष रुपयांची रक्कम मध्यम मुदतीचें कर्ज म्हणून दिली आहे. या सहकारी साखर कारखान्यांनीं वरील संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची हमी केंद्र सरकार व राज्य सरकार यांनीं घेतली आहे.

### योजनेखालील उद्दिष्टांक

कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री, बाहेरून कमींत कमी सुटे भाग आयात करून, देशांतच तयार करण्यास आवश्यक त्या सवलती देण्याची तयारी भारत सरकारनें दाखविली आहे. त्यानुसार राज्य सरकारनें आणखी ५ कारखान्यांची शिफारस केली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत आणखी ५ कारखाने स्थापन करण्यांत यावयाचे आहेत.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर महाराष्ट्र राज्यांत २५ सहकारी साखर कारखाने सुरू होण्याची शक्यता असून त्यामुळें दरसाल एकूण ४ लक्ष टन साखरेचें उत्पादन होऊं शकेल. म्हणजे देशामध्यें उपयोगांत येणाऱ्या प्रत्येक ६ शेरांपैकी एक शेर साखरेचें उत्पादन महाराष्ट्रांतील सहकारी साखर गिरण्यातर्फे होऊं लागेल.

### किफायतशीरपणा

हे सहकारी साखर कारखाने आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरतील काय, असा प्रश्न मनांत निर्माण होण्याचा संभव आहे. सहकारी साखर संस्थेच्या सदस्यांना या कारखान्यांकडून आपल्या मालाचा

योग्य तो मोबदला मिळतो कीं नाहीं ही गोष्ट विचारांत घेतली तर या प्रश्नाचें उत्तर मिळूं शकेल आणि तें होकारार्थी असेंच आहे. कारण, खाजगी साखर कारखान्यांनीं विकत घेतलेल्या उसाचा किमान भाव दर टनाला ४७ रु. याप्रमाणें सरकारनें ठरविला असतांना या सहकारी कारखान्यांनीं १९५८–५९ मध्यें आपल्या सदस्यांना ५८ रु. टनांपर्यंत भाव दिला आहे, अशी वस्तुस्थिति आहे. महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखान्यांच्या यशाची ग्वाही देणारी दुसरी गोष्ट म्हणजे या कारखान्यांनीं बाहेरून घेतलेल्या कर्जापैकीं बऱ्याचशा कर्जाची परतफेड केली आहे, ही होय. उदाहरणार्थ, प्रवरा सहकारी साखर कारखान्यानें ब्लॉक कॅपिटलवरील संपूर्ण कर्जाची परत-फेड केली आहे. या सहकारी साखर कारखान्यांनीं आपल्यावरील कर्जाचा बोजा कमी केला, एवढेंच नव्हें तर त्यांनीं नोकरवर्गासाठी घरें, कचेऱ्यांच्या इमारती, गोदामें, यंत्रसामग्री, यांसारख्या भांडवली स्वरूपाच्या मालमत्तेतहि बराच पैसा गुंतविला आहे ही गोष्ट त्यांच्या आर्थिक सुस्थितीची निदर्शक आहे यांत शंका नाहीं.

### सामाजिक व मानवी बाजू

आर्थिक बाजूपेक्षाहि सहकारी प्रयत्नांच्या सामाजिक व मानवी बाजू या अतिशय महत्त्वाच्या आहेत. ऊस पिकविणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांचे प्रतिनिधि हे सरकारी प्रतिनिधींबरोबर साखर कारखान्यांशीं संबंधित असलेल्या अनेक प्रश्नांवर विचार करण्यासाठी एकत्र बसतात, ही क्रांतिकारक अशी बाब आहे. सहकारी साखर कारखान्यांत कांहीं दोष दिसून येत असले तरी सहकारी उत्पादनाच्या क्षेत्रांत विशुद्ध अशा परंपरा हळूहळू निर्माण करण्यांत येत आहेत. राज्यांतील सर्व सहकारी साखर संस्थांचा पुणें येथें एक राज्य सहकार कारखाना संघ स्थापन करण्यांत आला असून त्या संघामार्फत निरनिराळ्या साखर कारखान्यांना भेडसाविणाऱ्या प्रश्नांबाबत मार्गदर्शन व मदत करण्यांत येते. राज्यांत सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यांत आले एवढेंच नव्हें तर त्यांनीं यापुढें देशांत साखर उत्पादन वाढविण्यासाठी भक्कम अशी सहकारी पद्धतीहि निर्माण केली आहे.

---

**तेलासाठी आणखी शोध**—गंगेच्या खोऱ्यांत तेलाचा शोध करण्याचें काम जर्मन व भारतीय एंजिनिअर्सनीं व तज्ज्ञांनीं चालविलें होते. हें काम ४ महिने चालू होतें. भारतीय एंजिनिअर्सना मदत करण्यासाठी पश्चिम जर्मनींतील ११ एंजिनिअर्सची एक तुकडी आली होती. संशोधनांत गोळा केलेल्या माहितींची छाननी करण्यांत येत आहे.


ओगले
प्रभाकर
सेफ्टी स्टोव्ह




नवी वैशिष्टे
१) अखंड बेस प्लेट. २) प्रत्येक भाग एनॅमल्ड केलेला.
३) आकर्षक रंग. ४) उत्कृष्ट रचना व कार्यक्षमता.
५) तेल टाकीचें संरक्षणात्मक आच्छादन.
६) नित्योपयोगी करड्या रंगात व अन्य आकर्षक रंगात.

मिळण्याचें ठिकाण
कुठल्याही मोठ्या दुकानीं
अगर लिहा

तयार करणार:
ओगले ग्लास वर्क्स लि., ओगलेवाडी. (जि. उत्तर सातारा)

# केरोसीन, पेट्रोल व डिझेल तेल

## केरोसीनचा खप वाढतच जाणार

### डिझेल तेलावर चालणाऱ्या मोटारींची वाढती संख्या

१९६५-६६ अखेर भारताला लागणाऱ्या औद्योगिक शक्तीसाठी जी तरतूद तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आली आहे, तो योजनेंतील सगळयांत कच्चा दुवा आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सर्व उद्दिष्टें पूर्ण करण्यासाठी औद्योगिक शक्तीसाठी येणाऱ्या मागणीचा अंदाज करण्यांत आलेला आहे. भारतांत उत्पन्न होऊं शकणारी वीज, कोळसा व तेल ह्या रूपानें उपलब्ध होणाऱ्या शक्तींच्या उद्दिष्टांची बेरीज केली तरी सुद्धां मागणीच्या मानानें ही शक्ति बरीच कमी पडेल अशी टीका करण्यांत आलेली आहे. ज्या ज्या देशांतून आर्थिक विकासाचा वेग वाढत आहे त्या त्या देशांतून औद्योगिक शक्तीची मागणी व संभाव्य पुरवठा ह्यांच्यामधील तफावत तेलाच्या इंधनाच्या साह्यानें सहज भरून काढतां येतें. १९६५-६६ सालीं भारताला १ कोटी टन पेट्रोलिअमचे पदार्थ लागतील असा अंदाज नियोजन समितीनें केला आहे. पण हा अंदाज बऱ्याच प्रमाणांत चुकलेला असण्याची शक्यता, नव्हे संभव आहे. ह्या सुमारास भारताला १·४ कोटी टन तेल लागेल असा पुष्कळ तज्ज्ञ संस्थांनीं अंदाज केलेला आहे.

### केरोसीन तेलाच्या खपांत झालेली वाढ

केरोसीन अथवा रॉकेल हें गरिबांचें इंधन आहे; निदान तें त्याला प्रकाश तरी खासच देतें. शहरांत काय अगर ग्रामीण भागांत काय, रॉकेल तेल प्रकाशासाठी नेहमींच वापरण्यांत येतें; इतकें तें लोकप्रिय झालेलें आहे. ग्रामीण विभागांत तरी अजून कित्येक दशकें रॉकेलची जागा घेऊं शकेल असें प्रकाशासाठी जळण उपलब्ध होण्याची शक्यता फारच कमी आहे. तेव्हां रॉकेलला असणाऱ्या मागणीपैकी बरीच मोठी मागणी ग्रामीण भागांतून येते व येत राहणार आहे. अलीकडे रॉकेलचा उपयोग अन्न शिजविण्यासाठी लागणारें जळण म्हणून अधिक प्रमाणांत करण्यांत येऊं लागलेला आहे. तथापि असा उपयोग मुख्यत: शहरी अगर निमशहरी भागांतूनच करण्यांत येतो. त्यामुळें ह्या भागांतील रॉकेलची मागणी मर्यादित प्रमाणांतच वाढली आहे. शिवाय शहरी अगर निमशहरी भागांत वीज व गॅस ह्यांचा उपयोग स्वयंपाकाला लागणारें जळण म्हणून अधिक प्रमाणांत केला जाण्याची शक्यता आहे. हिंदुस्थानांत होणाऱ्या रॉकेलच्या खपाची परिस्थिति १९४८ पासून पुढें अशी होती :—

| वर्ष | टन (आंकडे हजारांचे) | मागील वर्षांच्या मानानें वाढ अगर घट |
|---|---|---|
| १९४८ | ५६० | — |
| १९४९ | ७३५ | + ३१·३% |
| १९५० | ८८५ | + २०·४% |
| १९५१ | १,०४२ | + १७·७% |
| १९५२ | १,०४८ | + ०·६% |
| १९५३ | १,१५३ | + १०·०% |
| १९५४ | १,२२१ | + ५·९% |
| १९५५ | १,३८१ | + १३·१% |
| १९५६ | १,५०० | + ८·६% |
| १९५७ | १,५९९ | + ६·६% |
| १९५८ | १,५८३ | − १·०% |
| १९५९ | १,८२४ | + १५·२% |
| १९६० (अंदाज) | १,९१६ | + ५·०% |

केरोसीन तेलाची मागणी वाढण्यांत, वाढती लोकसंख्या व वाढतीं उत्पन्नें ह्यांचा वाटा बराच आहे. खप वाढण्यांत रॉकेल तेलाच्या करण्यांत येणाऱ्या विविध उपयोगांना फारसें श्रेय नाहीं. मागील वर्षाच्या मानानें होणाऱ्या खपाच्या वाढीचें दरसाल प्रमाण नियमबद्ध आढळून येत नाहीं. १९४९ सालीं खपांत ३१·३ टक्के वाढ झाली तर १९५८ सालीं १ टक्का घट झाली. १९४८ सालानंतर वार्षिक वाढीचें सर्वांत कमी प्रमाण १९५२ सालीं दिसून येते. पण ह्या दोन वर्षांत दरसाल खपाचें प्रमाण कमी होण्याचीं कारणें वेगवेगळीं आहेत. १९५२ सालीं शेतीच्या उत्पन्नांत घट झाल्यामुळें रॉकेलचा खप घटला तर १९५८ सालीं रॉकेलच्या आयातीवर कडक निर्बंध घालण्यांत आल्यानें तो घटला. अपवादात्मक परिस्थितीनें रॉकेलच्या खपावर परिणाम होणें कसें शक्य आहे तें वरील दोन वर्षांतील परिस्थितीवरून दिसून येतें. सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, लोकांच्या उत्पन्नांत झालेली वाढ व त्यामुळें राहणीच्या मानांत झालेली सुधारणा ह्या दोन कारणांमुळें रॉकेलच्या खपांत वाढ होत असलेली दिसून येते.

[ स्थापना १९२१ ]
गरगट्टी अँड सन्स
शहापूर-बेळगांव
धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस
हें वर्ष सुखाचें
जावो !

कार्यक्षमता,
विश्वसनीयता,
आणि शुध्दता
यांचें प्रतीक...

शास्त्रशुद्ध औषधींपासून बनविलेल्या प्रत्येक औषधाची गुणपरिक्षा पाहिल्या-नंतरच 'सांडू' ब्रदर्सचीं औषधें बाजारांत विक्रीस ठेवण्यांत येतात.

औषधांच्या उत्कृष्टतेबद्दल व शुद्धतेबद्दल निरनिराळ्या प्रदर्शनांतून सुवर्णपदकें व प्रशस्तीपत्रकें मिळालीं आहेत. त्यामुळेंच जनतेच्या विश्वासास तीं पात्र आहेत.

सांडू ब्रदर्स ब्राह्मी तेलाचे कल्पक, व संशोधक.

प्रेग-युटेरो, बाळंत काढा नं. १, २ व ३, कुमारी आसव नं. ३, व बाळकडू आदि ७५० आयुर्वेदिक औषधांचे प्रमुख उत्पादक.

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि.
चेंबूर – मुंबई ३८

बँक ऑफ पूना, लिमिटेड
( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. २५,००,०००
वसूल भांडवल ... रु. ११,५०,०००

—: संचालक मंडळ :—
१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...
पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.
हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५९ रविवार पेठ, पुणें
गो. गं. साठे मॅनेजर

## ग्रामीण भागांतील वीजपुरवठ्याचा परिणाम

ग्रामीण भागांतून येणारी मागणी हा रॉकेलच्या खपाचा मुख्य आधार आहे. कारण तेथें रॉकेलचा उपयोग दिव्यासाठी केला जातो. रॉकेलचा हा उपयोग व शेतीच्या उत्पन्नांत गेल्या कांहीं वर्षांत झालेली वाढ ह्यांच्यांत अन्योन्यसंबंध असल्याचें निश्चितपणें दिसून येतें. पण ह्या नियमाला एक पुरवणी जोडणें आवश्यक आहे. शेतीच्या उत्पन्नांत घट झाली म्हणजे त्या घटीच्या प्रमाणांत रॉकेलच्या खपांतहि घट होते असा मात्र अर्थ नाहीं. ह्याचें कारण ग्रामीण भागांतील लोकांचें दरडोई रॉकेलच्या खपाचें प्रमाण फार कमी असतें. अर्थातच रॉकेलच्या मागणीचें प्रमाण कमीअधिक होण्याची शक्यताच नसते. ग्रामीण भागांत विजेचा पुरवठा होऊं लागला तर रॉकेलच्या खपावर कितपत परिणाम होईल असा प्रश्न पुष्कळदा विचारण्यांत येतो. शक्तीच्या मागणीविषयीं अलीकडे जो अभ्यास करण्यांत आलेला आहे त्यावरून विजेच्या पुरवठ्याच्या शक्यतेला गैरवाजवी महत्त्व देण्यांत आल्याचें दिसून येतें. ग्रामीण भागांतलि विजेच्या पुरवठ्याची गति अतिशय मंद असून येत्या २० वर्षांच्या कालांत तरी रॉकेलच्या खपावर तिचा परिणाम अत्यल्पच होईल. देशांतील खेड्यांची एकूण संख्या ५,५६,५६५ आहे. १९५१ सालीं त्यांपैकीं अवघ्या २,८०० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्यांत आला. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत विजेचा पुरवठा होऊं लागलेल्या खेड्यांची संख्या ५,३०० पर्यंत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस सुमारें १५,००० खेड्यांना विजेचा पुरवठा होऊं लागेल. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खेड्यांना होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत ८९·२९ टक्के वाढ झाली. दुसऱ्या योजनेंत वाढीची टक्केवारी २०० असेल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आणखी २९,५०० खेड्यांना विजेचा पुरवठा करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. १९७५ च्या सुमारास, म्हणजे आणखी १५ वर्षांनीं अंदाजें ६०,००० खेड्यांना विजेचा पुरवठा होऊं लागेल असें समजण्यास हरकत नाहीं. खेड्यांच्या ५ लाखांवरील संख्येच्या मानानें हा आंकडा फार मोठा नाहीं हें उघडच आहे. तथापि ग्रामीण भागांतील वीज-पुरवठ्याचें केवळ आंकड्यांच्या दृष्टीनें केलेलें हें मापन दिशाभूल करणारें ठरेल. ग्रामीण भागांत वीज-पुरवठा झाला तरी तो घराघरापर्यंत पोंचत नाहीं व इतर प्रकारच्या शक्तीवर अगर जळणावर त्याचा परिणाम होत नाहीं. शहरी अगर निमशहरी भागांतील वीजपुरवठ्याचें तसें नाहीं. शेतीच्या व उद्योगधंद्यांच्या उत्पादनाला उत्तेजन देण्याचें कार्य ग्रामीण भागांतील वीजपुरवठा करील. म्हणजे, औद्योगिक शक्ति म्हणून विजेचा खप वाढेल. परंतु खेड्यांतील प्रकाश पुरवठ्याच्या बाबतींत ह्या वीजपुरवठ्यामुळें फारसा फरक पडणार नाहीं. ग्रामीण भागांत विजेचा उपयोग औद्योगिक शक्ति म्हणून होऊं लागला कीं घरगुती वापरासाठीं होणारा रॉकेलचा खप वाढूं लागेल. कारण खेड्यांतील लोकांचीं उत्पन्नें वाढतील. खेड्यांत ज्या प्रकारचीं घरें असतात त्यांचा विचार करतां विजेचा उपयोग प्रकाशासाठी होण्यावर तेथें आपोआपच मर्यादा पडते. हीं घरें प्रकाशासाठीं वीज वापरतां येण्यासारखीं नसतात, आणि नजीकच्या भविष्य-कालांत त्यांची फार सुधारणा होण्यासारखीहि नाहीं.

## अन्न शिजविण्यासाठीं रॉकेलला वाढती मागणी

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीला ५ हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांत व गांवांत विजेचा पुरवठा होऊं लागेल. ह्याचा परिणाम असा होईल कीं शहरी व निमशहरी

भागांत घरांत प्रकाश पुरविण्यासाठी रॉकेलच्या ऐवजीं विजेचा उपयोग होऊं लागेल. शहरांतील अगर गांवांतील फारच थोडे भाग विजेच्या पुरवठ्याच्या कक्षेंत येणार नाहींत. अन्न शिजविण्यासाठी लागणाऱ्या जळणाचा विचार करतां रॉकेलची मागणी वाढतच जाण्याचा संभव आहे. जळणाच्या वाढत्या मागणींत विजेलाहि थोडासा हिस्सा मिळेल. पण तो बेताचाच असेल. हल्लींच रॉकेल जाळणाऱ्या स्टोव्हची रचना साधी करण्यांत येत आहे आणि मध्यम व कमी उत्पन्नाचे लोक जळण म्हणून रॉकेलचा अधिक उपयोग करूं लागले आहेत. सोय आणि राहण्याच्या जागांची टंचाई ह्या कारणांमुळें रॉकेल वापरण्याची प्रवृत्ति वाढतच आहे. अन्न शिजविण्यासाठी इतर प्रकारच्या जळणांचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. पण अशा उपयोगाचें प्रमाण फार वाढण्यासारखें नाहीं. पूर्व व उत्तर भारतांतील कांहीं शहरांतून दगडी कोळशाचा उपयोग स्वयंपाकाचें जळण म्हणून मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतो. पण दगडी कोळसा पोलाद कारखान्यांसाठी व इतर उद्योगधंद्यांत लागतो. त्यांच्या मागणीला प्राधान्य देण्यांत येणें स्वाभाविक आहे. अर्थातच दगडी कोळशाच्या, स्वयंपाकासाठी होणाऱ्या उपयोगावर स्वाभाविक मर्यादा पडतात. तेलशुद्धीच्या कारखान्यांत उपलब्ध होणारा जळाऊ वायु स्वयंपाकाचें जळण म्हणून कांहीं वर्गांत लोकप्रिय झाला आहे. पण, हा वायु थोड्या ठिकाणींच मिळण्यासारखा आहे. रॉकेलचा खप आणि पर्यायी शक्तींची स्पर्धा ह्यांचा जो आढावा घेण्यांत आला आहे त्यावरून रॉकेलच्या संभाव्य मागणीबाबत खालील कोष्टक तयार करण्यांत आलें आहे.

**संभाव्य मागणी**

| कालखंड | खपाचे आंकडे (हजार टनांचे) | पंचवार्षिक वाढीची टक्केवारी |
|---|---|---|
| १९५० | ८८५ | — |
| १९५५ | १,३८१ | + ५६·०५ |
| १९६० | १,९१६ | + ३८·७४ |
| १९६१ | २,३६० | + २४·२१ |
| १९६६ | ३,७२० | + ५७·६३ |
| १९७१ | ५,८६० | + ५७·५३ |
| १९७६ | ९,२३० | + ५७·५१ |

१९६० अखेर संपलेल्या पांच वर्षांच्या कालांत रॉकेलच्या खपाच्या वाढीची टक्केवारी अगदीं कमी आहे. ह्या कालांत शेतीच्या उत्पन्नांत बरेच चढउतार झाले आणि रॉकेलच्या आयातीसाठी परदेशीय चलनहि कमी देण्यांत आलें. त्यामुळें रॉकेल-तेलाची खरी मागणी दबली गेली.

## पेट्रोलच्या खपाची वाढ होत जाणार

सध्या भारताची वहातूक-व्यवस्था मुख्यत: रेल्वेमार्गांवर अवलंबून आहे. पण भविष्यकालांत ती तशीच राहील असें मानण्यास




स्थापना १९१६

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,८८,९२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,१५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे | दहा वर्षे |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन

भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

)—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—(

श्री. म. व्यं. शिंगरे अध्यक्ष

न. मू. ना. पां. थोपटे उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले

श्री. गो. बा. देवी

श्री. बा. ग. धंडुके

जागा नाहीं. भारतामधील रस्त्यांवरून होणारी वहातूक एकसारखी वाढत चाललेली आहे. देशाचे अनेक भाग आतां मोटारींच्या वहातुकीच्या कक्षेंत आले आहेत अगर येत आहेत. तेव्हां दिवसेंदिवस देशांतील एकूण वहातुकीपैकी बरीच वहातूक ह्यापुढें मोटारीनें होणार ह्यांत कांहीं शंका नाहीं. अर्थातच पेट्रोलचा खप हा पेट्रोल वापरणाऱ्या मोटारींच्या वाढत्या संख्येवर व त्यांच्या परिणामकारक उपयोगावर अवलंबून आहे. १९४८ मध्यें मोटारींना लागणाऱ्या पेट्रोलचा खप ४,६८,००० टन होता, तो १९५१ सालीं ८,०७,००० टनापर्यंत आला. त्यानंतर मात्र खप कांहींसा स्थिर राहिला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत तर तो घटलाच आहे हें खालील कोष्टकावरून दिसून येईल.

| वर्ष | खप (आंकडे हजार टनांचे) |
|---|---|
| १९४८ | ४६८ |
| १९४९ | ५३९ |
| १९५० | ५९७ |
| १९५१ | ८०७ |
| १९५२ | ८०३ |
| १९५३ | ७६५ |
| १९५४ | ७७१ |
| १९५५ | ८०७ |
| १९५६ | ८१९ |
| १९५७ | ८०९ |
| १९५८ | ७५८ |
| १९५९ | ७६५ |

## वेगवेगळे अंदाज

गेल्या कांहीं वर्षांत डिझेलवर चालविण्यांत येणाऱ्या मोटारींच्या संख्येंत वाढ झाल्याचा हा परिणाम आहे असें म्हणतात. भविष्य-कालांत होणाऱ्या खपासंबंधी अनेक अंदाज तज्ज्ञ संस्थांकडून करण्यांत आले आहेत. त्यांपैकी एक अंदाज पुढील कोष्टकांत दिला आहे.

| वर्ष | अंदाजी खप आंकडे हजार टनांचे |
|---|---|
| १९६० | ७८० |
| १९६१ | १,०७० |
| १९६६ | १,४०० |
| १९७१ | १,८३० |
| १९७६ | २,५०० |

दुसऱ्या एका अंदाजाप्रमाणें १९६६ सालीं पेट्रोलचा खप ९,५०,००० टन होईल. निरनिराळ्या प्रकारच्या मोटारगाड्यांचें उत्पादन किती होईल आणि त्यांना पेट्रोल किती लागेल ह्यावर हा अंदाज बसविला आहे,

| | टन |
|---|---|
| टूरिंग गाड्या / जीप्स / टॅक्सीज | ४,५१,००० |
| बसेस / ट्रक्स | ३,९९,००० |
| मोटारसायकली / ऑटोरिक्षा, वगैरे | ९५,००० |
| एकूण | ९,४५,००० |

भारताच्या नियोजन समितीनें केलेल्या अंदाजाप्रमाणें १९६५ च्या सुमारास हिंदमधील तेलशुद्धीच्या सर्व कारखान्यांत मिळून १७,००,००० टन पेट्रोलचें उत्पादन होईल. खप सुमारें

१३,००,००० टन होईल व ४,००,००० टन पेट्रोल शिलकी राहील. भारताच्या शेजारच्या देशांत असलेल्या तेलशुद्धीच्या कारखान्यांचा विस्तार करण्याच्या योजना आखण्यांत येत आहेत. त्या लक्षांत घेतल्या तर चार लाख टन शिलकी पेट्रोल कसें खपवावें असा प्रश्न भारतापुढें उभे राहण्याचा संभव आहे.

नॅशनल कौन्सिल ऑफ अ‍ॅप्लाइड रिसर्च ह्या संस्थेनें अगदीं अलीकडे असा अंदाज केला आहे कीं १९६५–६६ च्या सुमारास भारतांत १६,००,००० टन पेट्रोलला मागणी येईल. रस्त्यावरून मोटारींच्या साह्यानें प्रवाशांची व मालाची जी वाहतूक केली जाते, तीसाठी वापरल्या जाणाऱ्या मोटारींची पेट्रोलची मागणी लक्षांत घेऊन वरील अंदाज केला आहे. पुढील कोष्टक पाहा.

### निवडक मोटारगाड्यांसाठी येणाऱ्या पेट्रोलची अंदाजी मागणी

| वर्ष | मोटारगाड्या व टॅक्सीज | बसेस | ट्रक्स | एकूण | पेट्रोलचा खप दशलक्ष टन |
|---|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ३९·७५ | ६६·०० | १२३·०० | २२८·७५ | ०·७३६ |
| १९५५-५६ | ४९·७५ | ६०·०० | १५३·०० | २६२·७५ | ०·८४५ |
| १९६०-६१ | ६५·७५ | ८०·०० | २०२·०० | ३४७·७५ | १·१२० |
| १९६५-६६ | ८८·२५ | ९८·०० | २७५·०० | ४६१·२५ | १·४९० |
| १९७०-७१ | ११४·७५ | १०६·०० | ३८६·०० | ६०६·७५ | १·९६० |
| १९७५-७६ | १४८·२५ | ११२·०० | ५१२·०० | ७७२·२५ | २·५०० |

इतर प्रकारच्या वाहनासाठी लागणारें पेट्रोल जमेस धरलें तर एकूण मागणीचें कोष्टक असें देतां येईल.

पेट्रोलसाठी अपेक्षित मागणी : १९६०–६१ ते १९७५–७६

| वर्ष | पेट्रोल (आंकडे दशलक्षांचे) |
|---|---|
| १९६०–६१ | १·२३२ |
| १९६५–६६ | १·६४० |
| १९७०–७१ | २·१५६ |
| १९७५–७६ | २·७५० |

ह्यावरून निरनिराळ्या अंदाजाप्रमाणें १९६५–६६ च्या सुमारास पेट्रोलची मागणी १० लाख टनांपासून १६ लाख टनांपर्यंत असेल असें दिसतें. पेट्रोलचा खप मोटारींसाठी ज्या प्रमाणांत वाढूं लागेल त्या प्रमाणांत डिझेल तेलाचा मोटारींसाठी करण्यांत येणारा उपयोग कमी होऊं लागेल हें उघडच आहे.

### डिझेल तेलाच्या खपांत झालेली विलक्षण वाढ

हाय स्पीड डिझेल तेलाच्या खपांत १९४८ ते १९६० च्या दरम्यान झालेली विलक्षण वाढ ही जळणाच्या तेलांच्या खपांत सर्वांत अधिक वेगानें झालेली आहे. ह्या १२ वर्षांच्या कालांत डिझेल तेलाच्या खपांत जवळ जवळ १२ पट वाढ झालेली दिसून येते. १९४८ सालीं डिझेल तेलाचा खप ६५,००० टन होता तो १९६० सालीं ११,८५,००० टनांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. १९४८ पासून सालोसाल झालेल्या खपांतील फरकाची टक्केवारी पुढील कोष्टकांत दिली आहे.

| वर्ष | डिझेलचा खप (आंकडे हजार टनांचे) | फरकाची टक्केवारी |
|---|---|---|
| १९४८ | ६५ | — |
| १९४९ | १५७ | + १४१·५ |
| १९५० | १८२ | + १५·९ |
| १९५१ | २६७ | + ४६·७ |
| १९५२ | २५६ | − ४·१ |
| १९५३ | २९४ | + १४·८ |
| १९५४ | ३४६ | + १७·७ |
| १९५५ | ४२५ | + २२·८ |
| १९५६ | ५३३ | + २५·४ |
| १९५७ | ७१२ | + ३३·६ |
| १९५८ | ९०२ | + २६·८ |
| १९५९ | १०४६ | + १५·२ |
| १९६० (अंदाज) | ११८५ | + १३·२ |

रस्त्यांवरून होणाऱ्या व्यापारी वहातुकीच्या मोटारींसाठी डिझेल तेल मुख्यतः वापरण्यांत येतें. अंदाज असा आहे कीं, एकूण खपापैकीं तीनचतुर्थांश खप व्यापारी वहातूक करणाऱ्या ट्रक्ससाठी होत असावा. बाकीचे तेल शेतीच्या कामासाठी, रेल्वेवर आणि उद्योगधंद्यांत खपते. तेव्हां रस्त्यावरील वहातुकींत भविष्यकालांत होणाऱ्या संभाव्य वाढीवरून डिझेल तेलाच्या भविष्यकालीन मागणीची कल्पना करतां येण्यासारखी आहे. रस्त्यावरील मालवहातुक व प्रवाशांची वहातूक हीं दोन्हीं भारतांत झपाट्यानें वाढत जाणार ह्यांत कांहीं शंका नाहीं. इतर औद्योगिक देशांत अशा वहातुकीची ज्या प्रकारानें वाढ झाली आहे त्याचा अभ्यास केला तर भारतामधील वाढीचा अंदाज बांधता येण्यासारखा आहे. ब्रिटन, जर्मनी, अमेरिका, इत्यादि देशांतून कोळसा, खनिजें इत्यादींसारखा भारी वजनाचा कच्चा माल रेल्वेच्या साह्यानेंच बहुधा वाहून नेण्यांत येतो. पक्का माल मात्र बहुधा मोटार ट्रक्सच्या साह्यानें वाहून नेण्यांत येतो. पक्क्या मालाच्या बाबतींत माल एका जागेपासून दुसऱ्या जागेपर्यंत नेण्याच्या कामीं जी त्वरा दाखविली जाऊं शकेल तिला फार महत्त्व असतें. भारतामधील रस्त्यांवरून होणारी वहातूक ही रेल्वेनें होणाऱ्या वहातुकीपेक्षा जवळजवळ तिपटीच्या वेगाची आहे. त्यामुळें वनस्पति, साबण, इत्यादि माल निर्माण करणाऱ्या पुष्कळ मोठ्या कारखान्यांनीं रस्त्यावरील वहातूकच पसंत केली आहे. एकतृतियांशापेक्षा अधिक लॉऱ्या व बसेस डिझेल तेलावर पळविल्या जातात. पण हें फक्त भारतांतच होत आहे असें नव्हें. सर्वच जगांत रस्त्यावरील वहातूक डिझेल तेलाच्या साह्यानें करण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली आहे. पेट्रोलवर चालणाऱ्या एंजिनापेक्षा डिझेलवर चालणारें एंजिन अधिक कार्यक्षम असतें हें त्याचें कारण आहे. शिवाय पेट्रोलच्या प्रत्येक गॅलनमागें जें अंतर तोडलें जातें, त्यापेक्षा डिझेल तेलाच्या गॅलनवर कापला जाणारा रस्ता निदान ४० टक्के तरी अधिक असतो. १९७५–७६ पर्यंत रस्त्यावरून होणाऱ्या वहातुकीच्या संभाव्य पातळीबद्दल नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संस्थेनें केलेल्या अंदाजाप्रमाणें येत्या १५ वर्षांत रस्त्यावरील वहातूक चौपट होईल. कार्यक्षमतेच्या दृष्टीनें चांगल्या म्हणून डिझेलवर चालणाऱ्या ट्रक्सच्या संख्येंत पेट्रोलवर चालणाऱ्या ट्रक्सच्या संख्येपेक्षा अधिक वेगानें वाढ होईल. १९६०–६१ सालीं पेट्रोलवर चालणाऱ्या ट्रक्सची संख्या १,३५,००० च्या आसपास आहे. ती १९७५–७६ च्या सुमारास ३,६३,००० पर्यंत जाईल. म्हणजे १५ वर्षांत २०० टक्क्यांपेक्षा थोडी कमी वाढ होईल. डिझेलवर चालणाऱ्या ट्रक्सची मागणी मात्र ह्याच कालांत १० पटीनें वाढेल. १९६०–६१ सालीं अशा ट्रक्सची संख्या ४५,००० च्या आसपास आहे, ती १९७५–७६ च्या सुमारास ४,८०,६०० पर्यंत जाईल.

# दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. १३,९४,५७० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. २,९५,९७७ |
| ठेवी | रु. ८८,५७,७३४ |

खेळतें भांडवल रु. १ कोटी, ६८ लाखांचे वर

दक्षिण सातारा जिल्ह्यांत बँकेच्या १० शाखा कार्य करीत आहेत.

सरकारनें या बँकेचे रु. ६ लाख, ५० हजार किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.

सहकारी संस्थांना शेतीचे गरजेसाठी प्रामुख्यानें कर्जे दिलीं जातात.

पी. बी. टाकवेकर. — मॅनेजर.
गुलाबराव आर. पाटील. — चेअरमन.

# रत्नागिरी अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., रत्नागिरी

शाखा : (१) संगमेश्वर (२) देवरुख

तारेचा पत्ता—' Urbanbank '
टेलिफोन नं.—९१

गेलीं अनेक वर्षे रत्नागिरी शहरांतील जनतेच्या विश्वासाला पात्र असलेली एक सहकारी बँक

—★—

बँकेची सांपत्तिक स्थितीदर्शक कांहीं ठळक आंकडे

| | |
|---|---|
| खपलेले भागाचे भांडवल | १। लक्षाचेवर |
| रिझर्व्ह व इतर फंड | २॥ लक्षांचेवर |
| ठेवी | २२ लक्षांचेवर |

★ सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणूक ★
९ लक्षांचेवर

कायम ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दर

३ महिने ३।% ९ महिने ३॥% १४ महिने ४।%
६ महिने ३॥% ११ महिने ४।%

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा.

वि. वि. भाटवडेकर
मॅनेजर.

# जनता सहकारी बँक लिमिटेड

[ हेड ऑफिस — पुणें शहर ]

शाखा :—भवानी पेठ व शिवाजीनगर, पुणें.

: संचालक मंडळ :

श्री. म. रा. मिठापेल्ली अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. गो. प्र. भागवत (चेअरमन) | श्री. बा. गो. ठकार (व्हा. चेअरमन) |
| श्री. ना. र. ओक | डॉ. वा. ग. परांजपे |
| श्री. मु. रा. किराड | श्री. वि. य. पाटणकर |
| श्री. पं. ग. बनवारी | श्री. स. ज. राऊत |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

द. शं. जमदग्नि
मॅनेजिंग डायरेक्टर

दीपावली व नूतन वर्ष बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुखाचें जावो.

# दि विटा मर्चंटस्

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटा.

जि. द. सातारा

स्थापना १९३६ ] [ ऑडिट वर्ग "अ"

नूतन वर्ष आमचे भागदार व ठेवीदार यांना सुखाचें जावो !

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. १,२४,८०० |
| रिझर्व्ह फंड | रु. ५३,४८१ |
| इमारत फंड | रु. ७०,२२५ |
| इतर फंड | रु. २६,८७० |
| ठेवी | रु. १०,४५,४०५ |
| खेळतें भांडवल | रु. १४,२०,४०० |

सेव्हिंग्ज, चालू व मुदत ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

अधिक माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

पं. म. विडकर — मॅनेजर
रा. ब. द्रविड, — चेअरमन
स. वि. कोरे — प्रेसिडेंट.

# परदेशी प्रवाशांना आकर्षण्याची योजना

## हुंडणावळीच्या मिळकतीचें साधन

भारतांत येणाऱ्या प्रवाशांकडून होणाऱ्या मिळकतीमुळें परदेशी हुंडणावळीची प्राप्ति सालोसाल वाढत आहे. परदेशी प्रवाशांपासून १९५० मध्यें ४·२ कोटी रुपये मिळाले होते; १९५५ मध्यें १०·३ कोटी रुपये मिळाले आणि १९५९ मधील प्राप्ति १५·५ कोटी रुपयांवर गेली. भारतीयांच्या परदेशी प्रवासासाठी द्याव्या लागणाऱ्या रकमेंत घट होत गेल्यामुळें, येण्या-देण्यांत वाढावा उरूं लागला आहे. पूर्वी मिळकतीपेक्षा खर्चच जास्त होत असे. १९५९ मध्यें अशा रीतीनें १२·९ कोटी रुपयांचा वाढावा उरला.

### परदेशी प्रवासाचा हिशेब

| वर्ष | उत्पन्न कोटी रु. | खर्च कोटी रु. | वाढावा+तूट— कोटी रु. |
|---|---|---|---|
| १९५० | ४·२ | १४·६ | —१०·४ |
| १९५१ | ७·७ | २५·० | —१७·३ |
| १९५२ | ९·८ | ९·९ | — ०·१ |
| १९५३ | ७·१ | १३·६ | — ६·५ |
| १९५४ | ८·४ | १२·० | — ३·६ |
| १९५५ | १०·३ | १२·३ | — २·० |
| १९५६ | १५·५ | १३·४ | + २·१ |
| १९५७ | १६·० | ६·८ | + ९·२ |
| १९५८ | १७·५ | ७·२ | + १०·३ |
| १९ ९ | १५·५ | २·६ | + १२·९ |

ज्या मानानें भारतांत परदेशी प्रवासी आले, त्या मानानें मात्र त्यांचेपासूनची प्राप्ति वाढलेली नाहीं. आलेल्या प्रवाशांचे तुलनात्मक आकडे येथे दिले आहेत:—

| | |
|---|---|
| १९५६ | ६५,८८७ |
| १९५७ | ८०,५४४ |
| १९५८ | ९२,९०२ |
| १९५९ | १,०९,४६४ |

ह्या आंकड्यांत पाकिस्तानांतून आलेले उतारू समाविष्ट नाहींत. २४ तासांपेक्षा कमी नाही, आणि ६ महिन्यांपेक्षा जास्त नाही, इतका काळ ज्यांनीं भारतांत व्यापार, सुट्टी, चैन, अभ्यास, आरोग्य, घरगुती कारण, सभांना उपस्थिति, इत्यादींसाठी घालवला त्यांचा समावेश वरील आंकड्यांत केलेला आहे. १९५६ च्या मानानें १९५९ सालीं ६६% जास्त प्रवासी भारतांत आले, पण प्राप्तींत फरक पडला नाहीं.

### "शुद्ध" प्रवासी

कॅनडा, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, ग्रेटब्रिटन, ह्या देशांतून आलेल्या प्रवाशांची संख्या १९५६ चे मानानें १९५९ मध्यें ४८% नीं वाढली. श्रीमंत देशांच्या प्रवाशांपासूनच प्राप्तीची आशा; त्यांचेकडून ५०% पेक्षा ज्यास्त रकम मिळते. ह्या प्रवाशांपैकी किमान ५०% तरी 'शुद्ध' प्रवासी असतात; म्हणजे ते हौसेनें सुट्टी घालविण्यासाठी, देश पहाण्यासाठी, आलेले असतात.

सुट्टी घालविण्यासाठी व देश पहाण्यासाठी येणाऱ्या श्रीमंत परदेशी प्रवाशांची संख्या वाढविणें, हाच त्यांच्यापासून मिळणारी परदेशी हुंडणावळ वाढविण्याचा मुख्य मार्ग आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचे अखेरीस ह्या मार्गानें दरसाल ४० कोटी रुपयांची प्राप्ति करता येणें अशक्य नाहीं. भारतासारख्या प्रचंड, निसर्गरमणीय स्थानांनीं समृद्ध, ऐतिहासिक, सांस्कृतिक, शिल्पविषयक, धार्मिक, इत्यादि दृष्टींनीं आकर्षक अशा देशांत पांच वर्षांनीं दरसाल २,५०,००० पाश्चिमात्य 'शुद्ध प्रवासी' आकर्षित करतां येणें अगदी शक्य आहे. तेथील ज्या ज्या लोकांचे जवळ फुरसत आहे, आरामांत वेळ घालवण्याला पैसे आहेत, त्या सर्वांना येथें यावयास उत्तेजन मिळेल, असें सरकारचें धोरण हवें.

पाश्चात्य देशांतहि अति श्रीमंत लोक कमीच आहेत. तेव्हा त्यांना आकर्षित करणारें धोरण प्रवाशांच्या संख्येंत वाढ करण्यास फारसें उपयोगी पडणार नाहीं. बहुसंख्य प्रवाशांना आवाहन करणारें धोरण असायला हवें. प्रवासाच्या सवलती दिल्या, तर अधिकाधिक प्रवासी येथें येण्यास उद्युक्त होतील आणि भारताच्या मिळकतींत भर घालतील.

प्रवासी आकर्षण्याच्या कामीं कवडीचुंबकपणाची वृत्ति चालणार नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्या कामीं पांच कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ह्या उपक्रमामुळें परदेशी हुंडणावळ मिळण्यास मदत होते, हे लक्षांत घेऊन, प्रवासाच्या वाढीस अग्रस्थान दिलें पाहिजे, असें तिसऱ्या योजनेच्या खर्चामध्यें नमूद करण्यांत आलें आहे. ह्या पांच कोटी रुपयांपैकी कांही भाग अंतर्गत प्रवासवाढीवरहि खर्च व्हावयाचा आहे. वास्तविक तो विषय राज्य सरकारांच्या कक्षेतला आहे. विमान वाहतुकींत वाढ, आगबोट वाहतुकींत सुधारणा, रेल्वे वाहतुकींत प्रगति, उतरण्याच्या जागांची वाढ, प्रचार खर्च, करमणुकीच्या साधनांच्या सोई, इत्यादि मार्गांनीं परदेशी प्रवाशांना येथें यावयास आकर्षित करावे लागेल आणि त्यासाठीं पांच कोटी रुपयांची तरतूदहि अपुरी पडेल. ह्यासाठीं केलेल्या तरतुदीचा विनियोग खालीलप्रमाणें करणें हितावह होईल.

### सुधारणेच्या दिशा

(१) सध्या अमेरिकेंत आपल्या दोन टूरिस्ट कचेऱ्या आहेत; एक न्यूयॉर्क मध्यें आणि एक सॅन फ्रॅन्सिस्को येथें. त्या देशांत आणखी दोन कचेऱ्या, शिकॅगो व न्यू ऑर्लिअन्स येथें, उघडायला हरकत नाहीं.

(२) कॅनडांत, मॉन्ट्रिअल येथें, एक टूरिस्ट कचेरी उघडणें श्रेयस्कर ठरेल.

(३) ह्या टूरिस्ट कचेऱ्या, त्याचप्रमाणें लंडन, पॅरिस, फ्रँकफूर्ट मेन आणि मेलबर्न येथें भारताच्या प्रवासासंबंधी माहिती देण्याची व्यवस्था तर असावीच; पण त्याबरोबर तेथें भारत-भेट चित्रित करणारीं प्रदर्शनेंहि मांडण्यांत यावींत; सध्यां जीं मांडण्यांत येत असतील, तीं अधिक पद्धतशीर करण्यांत यावीत.

(४) माहिती देणाऱ्या पुस्तिका आकर्षक रीतीनें छापण्यांत याव्यात. त्यांतील रंगीत चित्रांची संख्या वाढविण्यांत यावी. त्यांतील मजकूर अधिक पकड घेणारा असावा; भाषाशैली वर्ण्य विषयाच्या तोडीची असावी.

(५) सर्वसाधारण प्रवाशाला भारताच्या प्रवासासाठी दोन हजार डॉलर्स खर्च येतो. एअर इंडिया इंटर नॅशनल, इंडियन

एअर लाइन्स आणि हिंदी रेल्वेज ह्यांनीं सवलती दिल्या, तर ह्या सर्वांत बरीच बचत होऊं शकेल. निवडक ठिकाणीं जेवण्याचा व रहाण्याचा खर्च आणि प्रवासखर्च ह्या सगळ्यांचा मिळून एक ठराविक चार्ज ( उदाहरणार्थ, १,५०० किंवा १,००० डॉलर ) घेण्याची योजना टूरिस्ट खात्यानें आखायला हरकत नाहीं. युरोपियन पद्धतीच्या होटेलांना कांहीं मदत देण्यानेंहि प्रवाशांची सोय आणि आपल्या परदेशी हुंडणावळीच्या मिळकतींत वाढ होईल.

( ६ ) कांहीं केंद्रांतील सुखसोयी वाढवाव्या लागतील. जुन्या ऐतिहासिक स्मारकांना जिवंतपणा आणतां आला, तर बरें होईल. उदाहरणार्थ, फत्तेपूरसिक्री ( अकबराची सोडून दिलेली राजधानी ) येथें टूरिस्ट मोसमाचे कालांत मोगल दरबाराची प्रतिकृति निर्माण करतां येईल; मोगल बादशहा, वजीर, दरबारी मानकरी, इत्यादींचीं सोंगें घेणाऱ्यांची योजना आकर्षक ठरेल.

( ७ ) भिकेकरी आणि फसवे लोक ह्यांचेपासून प्रवाशांचें संरक्षण करण्यांत आलें पाहिजे. भिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळें परदेशी प्रवासी पिसाळून जातात ! आपआपल्या देशांत परतल्यानंतर ह्यासंबंधींचे अनुभव त्यांनीं इतरांना सांगणें स्वाभाविक आहे; त्याचा प्रवाशांच्या संख्येवर विपरीत परिणाम होणें अगदीं शक्य आहे.

( ८ ) नवी दिल्ली येथील टूरिस्ट खातें आणि संबंधित कचेऱ्या एकाच चांगल्या इमारतींत आणण्यांत आल्यानें सोय होणार आहे. सध्यां, टूरिस्ट खातें जनपथावरील ताज बराकींत आहे, ती जागा घोड्यांच्या तबेल्याजोगीच आहे ! अमेरिका आणि पश्चिम युरोप येथील प्रवासी दिल्लीला आल्यानंतर टूरिस्ट खात्यास भेट देणारच, हें लक्षांत असायलें हवें.

( ९ ) परदेशी प्रवाशांना दारुबंदी जाचक होणार नाहीं, दारूचे परवाने त्यांना सहज मिळूं शकतील, हें गृहीत आहे.


# दि फलटण बँक लि., फलटण.

स्थापना १९१८ ] [ टेलिफोन नं. ७७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ६३,६५० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ५७,२३० |
| रिझर्व फंड | रु. २९,९१८ |

★ बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

★ आकर्षक अशा व्याजाच्या दरानें ठेवी स्वीकारल्या जातात.

★ शिवाय ३ व ५ वर्षे मुदतीची अनुक्रमें ५ व ६ टक्के व्याजाची जनता सेव्हिंग्ज सर्टीफिकेटची योजना.

★ व्यापाऱ्यांच्या हरएक प्रकारच्या दैनंदिन गरजा भागविण्यांत तत्पर.

— बँकेचें संचालक मंडळ —

श्री. माणिकचंद मलुकचंद दोशी, बी ए.,एल्एल्.बी.प्लीडर चेअरमन

श्री. महादेव गणेश दाते, बी एससी., जमीनदार, फलटण.
श्री. गंगाराम कामचंद दोशी, व्यापारी, फलटण.
श्री. कोंडीराम कृष्णाजी बोरावके, जमीनदार, फलटण.
श्री. हिराचंद केवळचंद दोशी, व्यापारी, फलटण
श्री. आनंदलाल तलकचंद दोशी, व्यापारी, फलटण.
श्री. आनंदलाल जीवराज दोशी, व्यापारी, फलटण.
श्री. माणिकचंद वीरचंद गांधी, सराफ, फलटण.

बँकेनें शेअरहोल्डर्सना सन १९५८ व १९५९ वर्ष अखेरचे नफ्यांतून ५½ टक्के करपात्र डिव्हिडंड दिलें.

अ. द. दोशी, अकौंटंट र. अ. तांबे, मॅनेजर

स्थापना १९४१ ] [ फोन क्रमांक ५३५

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,५०,००० |
| वसूल भांडवल | रु. ९७,००० |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १,४६,००० |
| एकूण ठेवी | रु. १२,००,००० |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. ४,३१,०१८ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १४,५०,००० |

★ या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ निरनिराळ्या प्रकारच्या तारणावर आणि लायक जामिनावर सवलतीचीं कर्जें दिलीं जातात.

★ व्याजाचे दर आकर्षक आहेत; तरी याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.

★ भारतांतील सर्व प्रमुख शहरीं चेकस्, बिलें,हुंड्या, रेल्वे-रशीदी, इत्यादींची माफक कमिशनवर वसूली केली जाते.

★ ही बँक आरंभापासून "अ" वर्गांत आहे.

जी. एम्. दळवी, चेअरमन.



रुचकर जेवणाकरितां प्रसिद्ध

# जनसेवा भोजनालय

लॉजिंग बोर्डिंग

डेक्कन जिमखाना पोस्टाजवळ पुणें ४.

प्रोप्रा. डी. जी. गोरे

# कंपनी व भागीदारी ह्यांतील फरक

## मोठा धंदा करण्यासाठी मर्यादित ज़बाबदारीची कंपनी-संघटना अधिक उपयुक्त कां ?

कंपनी ह्या शब्दाचा काटेकोर अर्थ करावयाचा झाल्यास, एखादा व्यापार अगर धंदा चालविण्याच्या सर्वसामान्य हेतूनें भांडवल व श्रम ह्यांचें एकत्रीकरण केलेली व्यापारी संस्था, असा करतां येईल. एखाद्या समान हेतूनें प्रेरित होऊन त्याच्या सिद्धीसाठी पैसे देणाऱ्या लोकांची ती एक संघटना असते. अशा रीतीनें जो पैसा गोळा करण्यांत येतो त्याला भांडवल म्हणण्यांत येतें आणि जे लोक पैसे देतात त्यांना सामान्यतः सभासद असें संबोधण्यांत येते. एखाद्या व्यक्तीनें दिलेले पैसे हे त्या व्यक्तीच्या कंपनीच्या भांडवलांतील — तिचें भागभांडवल असलें तर — भाग समजण्यांत येतो.

### संघटनांचे प्रकार

अशा संघटनांचे तीन प्रकार होऊं शकतात :—(१) भागीदारी (२) इन्कॉर्पोरेटेड कंपन्या व (३) इतर संघटना. तिसऱ्या प्रकारचे आणखी प्रकार असूं शकतात. ते असेः—

(अ) १९२६ च्या ट्रेड युनिअन ॲक्टप्रमाणें स्थापण्यांत आलेली संघटना. ही संघटना एखाद्या समान उद्दिष्टासाठीं स्थापन करण्यांत आलेली असली, तरी नफा मिळविण्याच्या उद्देशानें व्यापार अगर धंदा चालविण्यासाठी ती उभारण्यांत आलेली नसते. म्हणून तिची नोंद ट्रेड युनिअन ॲक्टप्रमाणें होते; कंपन्यांच्या कायद्याप्रमाणें होत नाहीं.

(ब) १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टप्रमाणें स्थापन करण्यांत आलेली संघटना. अशा प्रकारच्या संघटना सार्वजनिक उपयोगासाठी वाचनालयें व शाळा स्थापन करण्यासाठी अगर अशा संस्था चालविण्यासाठी मुख्यतः उभारण्यांत येतात. वाङ्मयीन, शास्त्रीय अगर धर्मादाय स्वरूपाचें कार्य करणाऱ्या संस्था, तसेंच कलांच्या व ज्ञानाच्या प्रसारासाठी स्थापन करण्यांत आलेल्या संघटना असें त्यांचें वर्णन करण्यांत येतें. म्हणून अशा संघटना सामान्यतः वरील कायद्याखाली नोंदण्यांत येतात.

(क) स्टॅट्युटरी कॉर्पोरेशन्स ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या संघटना पार्लमेंटचे अगर राज्य कायदेमंडळाचे खास कायदे करून स्थापन करण्यांत येतात. कंपनी कायद्याप्रमाणें स्थापन करण्यांत येणाऱ्या संघटनांच्या स्वरूपाच्याच जवळ जवळ वरील संघटना असतात. एखादी विशिष्ट गरज भागविण्यासाठी त्या स्थापन करण्यांत येतात. उदा. एकापेक्षा अधिक राज्यांच्या प्रदेशांत पसरलेल्या योजना किंवा ज्या मोठमोठ्या कामासाठी कंपनीकायद्याप्रमाणें मिळणारे अधिकार व सवलती अपुऱ्या पडतात अशीं सार्वजनिक मालकीचीं कामें, देशाच्या आर्थिक विकासाच्या योजना पार पाडण्यासाठी, अगर औद्योगिक कारखान्यांना भांडवल पुरविण्यासाठी अगर सार्वजनिक दृष्ट्या महत्वाच्या इतर कामासाठी अशा प्रकारची कॉर्पोरेशन्स स्थापन करण्यांत येतात. प्रत्येक कॉर्पोरेशनसाठी स्वतंत्र कायदा करण्यांत येतो व त्यांत सरकार व कॉर्पोरेशन ह्यांच्यांतील संबंध स्पष्ट केले जातात. अशा प्रकारची कांही कॉपारेशन्स पुढीलप्रमाणें आहेत:—

| | |
|---|---|
| (१) दि दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन | १९४८ |
| (२) दि इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन | १९४८ |
| (३) दि रीहॅबिलिएशन फायनॅन्स ॲडमिनिस्ट्रेशन | १९४८ |
| (४) दि एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन | १९४८ |
| (५) दि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ | १९३४ |
| (६) दि एअर ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन | १९५३ |
| (७) दि स्टेट बँक ऑफ इंडिआ | १९५५ |
| (८) दि लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन | १९५६ |

(ड) क्लब, चेंबर्स ऑफ कॉमर्स, ट्रेड असोसिएशन्स, ह्या बिगर-इन्कॉर्पोरेटेड संस्था आपले नियम व विधिनिषेध स्वतःच तयार करतात. अशा संस्था व त्यामधील व्यक्ती ह्यांचे कायदेशीरदृष्ट्या तादात्म्यच असतें. संस्था जरी कंपनी कायद्याप्रमाणे नोंदलेल्या नसतील, तरी त्या बहुधा कंपनी कायद्यांतील नियम व नियमनें पाळतात. म्हणून त्यांची नोंदणी सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली अगर कंपनी कायद्याखाली हमीनें मर्यादित कंपन्या, अशी केली जाते.

### भागीदारी फर्म्स व कंपन्या

व्यापार अगर धंदा चालविण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या संघटनांचे दोन प्रकार असूं शकतातः—

(१) अन्-इन्कॉर्पोरेटेड कंपन्या; कायद्याच्या दृष्टीनें त्या भागीदारी फर्म्स असतात.

(२) कंपनी कायद्याप्रमाणें स्थापन करण्यांत आलेल्या कंपन्या.

कंपनी कायद्याप्रमाणें स्थापन झालेल्या कंपन्यांचे सभासदांची कंपनीच्या देण्याबद्दलची जबाबदारी सामान्यतः मर्यादित असते. हा तिचा मुख्य फायदा आहे. भागीदारी स्वरूपाच्या फर्म्सच्या सभासदांची कंपनीच्या देण्याबद्दलची जबाबदारी व्यक्तिशः व सर्व सभासद मिळून सर्व देण्याला लागूं होते म्हणून कोणत्याहि मोठ्या धंद्यांत मर्यादित जबाबदारी असलेली कंपनीची संघटना ही अमर्यादित जबाबदारी असलेल्या भागीदारी फर्मपेक्षा अधिक सोयीची असते. कंपन्यांच्या संघटनेमुळें खूप मोठें भांडवल असलेल्या औद्योगिक अगर व्यापारी कंपनींत मालकी हक्क मिळविण्याची संधि लोकांना मिळते. त्याची जबाबदारी मात्र त्यांनीं द्यावयाच्या कबूल केलेल्या भांडवलापुरतीच मर्यादित राहते. मर्यादित जबाबदारीच्या कंपन्या सिद्ध झालेल्या गरजेपोटीं जन्माला आलेल्या संघटना आहेत. एखाद्या व्यापारी व्यवसायांत आपल्या जवळचें सर्व धन न गुंतवितां भाग घेतां येण्याची संधि ही अशीच एक गरज आहे. भागीदारी स्वरूपाच्या फर्ममध्यें सभासदांची संख्या फार असूं शकत नाहीं. २० पेक्षा अधिक सभासद असतील तर कंपनी कायद्याप्रमाणें किंवा हिंदमधील इतर कायद्याप्रमाणें संघटनेची नोंद करणें जरूर आहे. मात्र एखादें संयुक्त कुटुंब कुटुंबाचा संयुक्त धंदा अगर व्यापार चालवीत असेल तर त्याला वरील नियम लागूं नाहीं. कंपनी कायद्याप्रमाणें जरूर ती नोंद न करतां एखादा धंदा अगर व्यापार चालविण्यांत येत असेल तर तसें करणारी संघटना बेकायदा ठरते. अशा बेकायदा संघटनेचा प्रत्येक सभासद तिच्या सर्व कर्जाबद्दल व्यक्तिशः जबाबदार असतो. व तो १,००० रुपये दंडाच्या शिक्षेसहि पात्र होतो. ह्यावरून हें स्पष्ट होईल कीं व्यापारी संघटना फक्त दोन प्रकारच्या असूं शकतात. (१) भागीदारी फर्म्स व (२) इन्कॉर्पोरेटेड कंपन्या. भागीदारी फर्म स्थापन करण्यांत असलेल्या गैरसोयी व कंपनी स्थापन करण्यांत असलेले फायदे लक्षांत घेऊन व्यापारधंदा करणारे लोक कंपन्या स्थापन करण्यासच जास्त अनुकूल असतात.

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

रजिस्टर नं. पी ६५८ ] स्थापना १९४९ [ फोन नं. ६०२

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ३,३१,२०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,३९,४३५ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २२,४०,२२२ |

बँक आकर्षक व्याजाच्या दरानें मुदत ठेवी स्वीकारते.

बँकिंगची सर्व तऱ्हेची कामें करण्यांत येतात. जिल्ह्यांतील इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह सोसायटीज व व्यक्तीगत आर्टिझन्स अशांना कर्जे दिलीं जातात.

के. व्ही. नाईक, B. Sc. (Agri), G. D. C. & A. मॅनेजर

आर. व्ही. बेत, बी. ए., एल. एल. बी. चेअरमन

---

★ बँकेच्या ग्राहकांना नवीन वर्ष सुखाचे जावो ★

## दि बँक ऑफ कराड लि.

हेड ऑफीसः—कराड

शाखाः—सातारा, इस्लामपूर, तासगांव आणि विटे

चेअरमनः—श्री. ना. धा. बुधकर, वकील

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | २,३२,००० |
| रिझर्व्ह फंड वगैरे | रु. | १,०९,००० |
| ठेवी | रु. | ४१,००,००० |

### ठेवींवरील व्याजाचे दर

सेव्हिंग्ज ठेव २½

मुदत ठेव ३½ ते ४½

कॉल डिपॉझिट्स वगैरे आकर्षक दराने स्वीकारली जातात. हेड ऑफिस कराड येथें अद्यावत पद्धतीच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे. त्याचा ग्राहकांनीं फायदा घ्यावा. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

***********************************

कऱ्हाड, ३-१०-१९६० }

म. वि. खंडकर, मॅनेजर

---

## दि कोल्हापूर मराठा को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

स्थापना : १९३३

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. | १,१०,७८५ |
| रिझर्व्ह फंड | रु. | ६७,८६८ |
| इतर फंडस् | रु. | ४१,८०९ |
| खेळतें भांडवल | रु. | ५,५६,६१४ |
| समासद संख्या | | २,७७२ |
| चालू सालचा निव्वळ नफा | रु. | १८,७८५ |
| जाहीर केलेले डिव्हिडंड | रु. | ६·२५% |

डी. के. पाटील, मॅनेजर

जे. डी. भोसले, प्रेसिडेन्ट

---

ही दिवाळी बँकेच्या समासद-हितचिंतकांना सुखाची जावो !

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी

चें एकविसाव्या वर्षांत यशस्वी पदार्पण !

दीड लाखावर रक्कम, डिव्हिडंड दाखल आजवर वांटली गेली। भाग भांडवल व राखीव निधींचा आंकडा पांच लाखांवर गेला!! खेळते भांडवल तीस लाख!!

—अध्यक्ष व संचालक मंडळ—

(१) श्री. व्यं. श्री. फडके B. SC. LL. B. (अध्यक्ष)
(२) श्री. एस. एम्. अथणी (चेअरमन)
(३) श्री. एम्. ए. शहा (व्हाइस चेअरमन)
(४) श्री. जी. के गाडगीळ B. A., LL. B. (डायरेक्टर)
(५) श्री. टी. के. लाहोटी ,,
(६) श्री. आर. एन्. पडसाली ,,
(७) श्री. जे. व्ही. आनीखिंडी ,,
(८) श्री. एन्. एम्. जोगीमर्डी ,,
(९) श्री. आर. बी. आंबली ,,
(१०) श्री. बी. जी. कटगी ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एस. के. जंवगी, अकौंटंट.

म. द. खाडिलकर, मॅनेजर.

# इन्कॉर्पोरेटेड कंपनी व भागीदारी फर्म ह्यामधील फरक

## स्थापना

| इन्कॉर्पोरेटेड कंपनी | भागीदारी फर्म |
|---|---|
| १९५६ च्या अगर त्यापूर्वीच्या कंपनी कायद्याप्रमाणें. | भागीदारांच्या करारानें. |

## कायदेशीर स्थान

| इन्कॉर्पोरेटेड कंपनी | भागीदारी फर्म |
|---|---|
| (१) कंपनी ही कॉर्पोरेट संस्था असते; तिला सातत्य असतें. तिचें एक सील असतें; तिला आपल्या नांवानें दावा लावतां येतो व तिच्यावरहि दावा लावतां येतो. तिला सभासदाव्यतिरिक्त वेगळें अस्तित्व असतें. | (१) भागीदारी फर्मला कायद्याच्या दृष्टीनें वेगळें अस्तित्व नसतें. फर्मचे हक्क व जबाबदाऱ्या ह्या फर्मच्या व्यक्तिशः सभासदांच्या असतात. |
| (२) एखाद्या सभासदाचा मृत्यु अगर दिवाळें कंपनीच्या सातत्याला बाध आणूं शकत नाहीं. | (२) तशी व्यवस्था केलेली नसेल तर एखाद्या सभासदाची निवृत्ति, मरण अगर दिवाळें फर्म संपुष्टांत आणूं शकते. |

## सभासदांची संख्या

| इन्कॉर्पोरेटेड कंपनी | भागीदारी फर्म |
|---|---|
| (१) सार्वजनिक कंपनी असेल तर किमान ७; खाजगी असेल तर किमान २; सार्वजनिक कंपनींत वाटेल तेवढे सभासद असूं शकतात. खाजगी कंपनींत जास्तींत जास्त ५० पर्यंत सभासद. | (१) बँकिंग कंपनी असेल तर १० पेक्षा अधिक नाहीं. इतर प्रकारच्या नफ्यासाठी चालविण्यांत येणारा धंदा असेल तर २० पेक्षा अधिक नाहीं. |

## सभासदांची जबाबदारी

| इन्कॉर्पोरेटेड कंपनी | भागीदारी फर्म |
|---|---|
| (१) कंपनीचे सभासद कंपनीला जबाबदार असतात; कंपनीच्या धनकोला व्यक्तिशः नसतात. | (१) धनकोंना भागीदारांविरुद्ध व्यक्तिशः कायदेशीर इलाज करण्याचा हक्क असतो. |
| (२) सभासदांनी घेतलेल्या भाग-भांडवलाच्या अगर हमीच्या दर्शनी रकमेचा जो भाग दिलेला नसतो तेवढ्यापुरतीच जबाबदारी. | (२) भागीदारी फर्मच्या सर्व देण्याला भागीदार व्यक्तिशः जबाबदार असतो. |

## सभासदांचे अधिकार

| इन्कॉर्पोरेटेड कंपनी | भागीदारी फर्म |
|---|---|
| कंपनीच्या व्यवस्थेंत सर्व सभासद सक्रिय भाग घेत नाहींत. ही व्यवस्था सभासदांनीं निवडून दिलेल्या एका छोट्या मंडळाकडे सोपविण्यांत येतें. निवडलेल्या प्रतिनिधींना डायरेक्टर्स म्हणतात. | (१) भागीदारीच्या सभासदांना व्यवस्थेंत भाग घेण्याचा अधिकार असतो.<br>(२) प्रत्येक सभासद हा फर्मचा एजंट असतो. भागीदारीच्या कामासाठी तो इतर भागीदारांचाहि एजंट असतो. एखाद्या सभासदानें केलेला करार सर्व सभासदांवर बंधनकारक असतो. |

## भागांची ट्रॅन्स्फर

